
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय इतिहास
सं. क्र. ३३४



REFBK-0003132

॥ श्री ॥

इ-संशोधक-मंडळ-स्वीयग्रंथमाला क्रमांक २

शिवचरित्र-साहित्य.

खंड १ ला.

(शिरवळकर देशपांडे वगैरेंचे कागद)

संपादक

कृष्णाजी वासुदेव पुरंदरे

प्रकाशकः—

दत्तो वामन पोतदार, बी. ए.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

पुणें येथें

'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन

यानीं छापिलें.

शके १८४८] सन १९२६

REFBK-0003132

॥ श्री ॥

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-स्वीयग्रंथमाला क्रमांक ३०

शिवचरित्र-साहित्य

खंड १ ला

(शिरवळकर देशपांडे वगैरेंचे कागद)

:o:

संपादक

कृष्णाजी वासुदेव पुरंदरे

प्रकाशकः—

दत्तो वामन पोतदार, बी. ए.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.


पुणें येथें

'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन

यानीं छापिलें.

शके १८४८] किंमत दीड रुपया. [इ. स. १९२६

श्री.



प्रस्तुतचें पुस्तक भा. इ. सं. मंडळाच्या स्वीय-ग्रंथ--मालेंतील २० वें पुष्प प्रसिद्ध करण्यांत संतोष वाटतो. या ग्रंथाचें सर्व श्रेय रा. पुरंदरे व रा. आपटे या दोघां आस्थेवाईक संशोधकांस आहे. श्रीशिवचरित्रसाहित्यमालेचे असेच भाग किंवा खंड पुढें प्रसिद्ध करण्याचा मंडळाचा हेतु आहे. सकल शिवचरित्र-जिज्ञासूंच्या प्रोत्साहनानें तो सफल होईल अशी आशा आहे.

रा. पुरंदरे व रा. दत्तोपंत आपटे यांनीं आजचा हा खंड तयार करून मोठ अनुकरणीय उदाहरण घालून दिलें आहे. त्या बद्दल मंडळ त्यांचें निरंतर ऋणी राहील.

, आश्विन व. ३० शके १८४८ भा. इ. सं. मं. मंदिर.

दत्तो वामन पोतदार.
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार.
चिटणीस.

☞ **टीपः**-प्रस्तुत ग्रंथ शके १८४८ वर्ग ३।४ चे वरील सर्व वर्गाचे वेबाक सभासदांस नियमाप्रमाणें मोबदल्यांत मिळेल. वर्ग ३।४ चे सभासदांस एक प्रत अनुक्रमें निम्या व पाऊणपट किमतीस मिळेल.

चिटणीस.

चुकींची दुरुस्ती.

प्रस्तावना पृ. २, टीप * यांतील सूत्रांत "हिजरी— ५८० " च्या जागीं "हिजरी— ८५० " असें वाचावें.

संपादकीय दोन शब्द.

सासवड हा गांव ऐतिहासिक बाबतींत फार महत्वाचा आहे. तेथें संशोधनास अत्यंत वाव असून संशोधकाचीच काय ती उणीव आहे. मराठेशाहीच्या इतिहासाशीं ज्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचीं संबंध पोहोंचूं शकेल अशीं कित्येक शिवकालीन व पेशवाईतील घराणीं आज सासवडीं हयात आहेत. पैकीं सुप्रसिद्ध पुरंदरे घराण्यांतिल मौल्यवान् कागदपत्र तपासण्याचा योग सासवडीं असतां जुळून आला. सासवडीं अंबाजीपंत पुरंदरे यांच्या दोन शाखा विद्यमान आहेंत. पैकीं वडील घराण्यांतील विद्यमान वंशज श्रीमत रा. मल्हारराव पुरंदरे यांच्या कृपेनें पुरंदरे दप्तरांत एक दोन वर्षें मनमुराद काम करतां आलें; त्यामुळें इतिहाससंशोधनाचें प्राथमिक शिक्षण मिळण्यास पंचाईत पडली नाहीं. करतां प्रथम श्रीमंत रा. मल्हारराव पुरंदरे त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे.

पुरंदरे दप्तरांतून मोकळें झाल्यानंतर पोटाचा व्यवसाय सांभाळून कित्येक ठिकाणीं संशोधनार्थ परिभ्रमण केलें. त्यांत गेल्या फाल्गुनमहिन्यांत मी व माझे मित्र रा. मार्तंड वामन जोशी हे शिरवळास संशोधनार्थं गेलों असतां एक अपूर्व योग जुळून आला. मित्रवर्य रा. जोशी यांच्या ओळखीनें शिरवळ येथें रा. बाबाजी खंडेराव देशपांडे यांजकडे जुने कागद मिळविण्याचें संधान लाविलें. सुशिक्षितांशीं गांठ पडल्यामुळें कागद मिळण्यास कसलीच अडचण पडली नाहीं. रा. देशपांडे यानीं मोकळ्या मनानें, आपला शेंकडों वर्षें जिवाच्या पलिकडे जपून ठेवलेल्या अमुल्य कागदपत्रांचा, ठेवा आमच्या स्वाधीन केला. व या कृत्यानें त्यांनीं महाराष्ट्रास सदैव ऋणी करून ठेविलें आहे. मी, मित्र जोशी व खुद्द मालक ह्यांनीं दोन दिवस अहोरात्र खपून शें सवाशें जुने रुमाल तपासून ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे कागद एकीकडे काढिले. त्यांतिल कांहीं निवडक पत्रें ह्या भागांत मुख्यतः घेतलीं आहेत. शिवाय चांबळी येथील रा. आपाजी पाटील सेंडकर, नाना सरनाईक, बलवंतराव सरनाईक, दत्तोपंत दाणी (सासवड) यांजकडे मिळालेलीं शिवकालीन पत्रें, महजर ह्यांचाहि ह्यांत समावेश केला आहे. शिरवळ व चांबळी येथील कागदांतील विषयांची संगती बरोबर लावण्याकरतां पुण्याचे रा. पिलोबा ठकार, रा. होनप देशपांडे वगैरेंचेहि कागद ह्यांत अंतर्भूत केले आहेत. ह्याशिवाय आणखीहि कांहीं ठिकाणचे कागद ह्यांत आहेत. पत्रांची निवड करतांना उगीच कांहीं तरी कागद छापले जाऊं नयेत ह्याबद्दल शक्य ती खबरदारी घेतली आहे. आपले संग्रहांतील कागद देणाऱ्या वरील सद्गृहस्थांचा मी फार आभारी आहें.

याशिवाय भा. इ. सं. मंडळानें या खंडास **स्वीय ग्रंथमालेंत** स्थान देऊन; रा. शंकरराव जोशी यानीं सूचीचें जिकीरीचें काम करून देऊन आणि रा. दत्तोपंत आपटे यांनीं प्रस्तावना लिहून देऊन मला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे.

या खंडाच्या छपाईच्या खर्चास मदतीदाखल पन्नास रुपये देण्याचे रा. रा. वाग्भट नारायण देशपांडे बी. ए. एल. एल. बी. वकील सातारा यांनीं अभिवचन दिलें आहे. रा. वाग्भटराव देशपांडे हें शिरवळकर देशपांड्यांपैकीं असल्यानें त्यांनीं पितृऋण फेडण्याचे कामीं घालून दिलेलें उदाहरण अनुकरणीय आहे. या मदतीबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

मौंजे पूर (पुरंदर)
कार्तिक शु॥ १ शके १८४८

कृष्णाजी वासुदेव पुरंदरे

३३२

प्रस्तावना.

महाराष्ट्राचा शास्त्रशुद्ध इतिहास लिहिला जावा या हेतूनें ऐतिहासिक कागदपत्र प्रकाशित करण्याची परंपरा गेल्या पन्नास वर्षांपासून अनेक विद्वानांनीं चालविली आहे; तिला अनुसरून शिरवळकर देशपांडे व पुणें आणि सुपें येथील शिवशाहींतील घराणीं यांच्या दप्तरांतिल कांहीं कागद प्रस्तुत खंडांत छापले आहेत. यांपैकीं ४२ कागद शिरवळकर देशपांडे यांच्या दप्तरांतले; २१ चांबळी येथील सरनाईक यांच्याकडचे; ६ पुणे येथील कसब्याच्या गणपतीचे पुजारी रा. नीलकंठराव ठकार यांच्याकडचे; २ पुणें येथील होनप देशपांडे यांच्याकडचे, २ पेठकर पुरंदरे यांच्याकडचे, २ चांबळी येथील सेंडकरांकडले व १ उंबराणी येथील वाळवेकरांकडचा असे असून बाकीचे लेखांक पूर्वी इतरत्र छापलेल्यापैकीं संदर्भासाठीं येथें उध्दृत केले आहेत. बहुतेक सर्व कागद मिळविण्याचा व त्यांच्या नकला करण्याचा उद्योग या खंडाचे संपादक रा. **कृष्णाजी वासुदेव पुरंदरे** यांचा आहे. नकला मुळाशीं रुजू पाहण्याचें व कांहीं टीपा देण्याचें काम मीं केलें असून, मुद्रितें तपासण्यांचें बरेंच काम रा. शंकरराव जोशी वाईकर यांनीं केलें आहे.

२. **मुसलमानांची दक्षिणेंत स्वारी:**— या खंडांत शिवशाहीच्या पूर्वीची महाराष्ट्रांतील परिस्थिति सांगणारे कित्येक लेखांक आहेत. त्यांवरून मुसलमानांचें लक्ष दक्षिणेकडे केव्हां गेलें व त्यांच्या ताब्यांत कोणता प्रदेश केव्हां आला हे दोन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. सामान्यतः असा समज रूढ आहे कीं, शके १२१६ मध्यें अल्लाउद्दीनानें प्रथम देवगिरीवर स्वारी केली त्यापूर्वीं मुसलमानांचें लष्कर दक्षिणेकडे आलें नव्हतें; आणि हसनगंगूनें बहामनी राज्याची स्थापना केल्यापासून महाराष्ट्र यवनांच्या ताब्यांत आला. पण अलीकडच्या संशोधकांनीं प्रकाशित केलेल्या सामग्रीवरून वरील मतांत कांहींसा फरक करावा लागेल असें लक्षण दिसत आहे. कारण ज्ञानेश्वरी लिहिली जाण्यापूर्वी यादवराजांच्या प्रशस्तींत[1] नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशांचाच उल्लेख असला तरी दिल्लीश्वराच्या मनांत दक्षिणेकडील राजांना जिंकण्याची महत्त्वाकांक्षा शके १२१६ च्या पूर्वी उद्भवली होती असें निश्चितपणें म्हणतां येतें. कारण ग्यासउद्दीनाच्या कारकीर्दीत शके १२०२

---

१ तैलङ्गक्षितिपालतूलनिचयप्रक्षेपसञ्जज्वलो
गर्जद्गूर्जरगर्वपर्वताभिदादम्भोलिदोर्विक्रमः ।
हेलोन्मूलितकौंकणक्षितिपतिः कर्णाटलाटोद्भट-
क्षोणीपालविडम्बनः स हि महादेवः कथं वर्ण्यते ॥ १३ ॥

मध्यें पालम येथें कोरलेल्या शिलालेखांत "आगौडाद्वज्जणांन्तं द्रविडजनपदात्सेतुबंधात्समंतात्" म्हणजे बंगाल्यापासून गजनीपर्यंतचें व दक्षिणेस द्रविड देशादि सेतुबंधापर्यंतचे राजे दिल्लीपतीचें अंकितत्व मान्य करीत होते असें म्हटलें आहे इतकेंच नव्हें तर ग्यासुद्दीनाचें सैन्य दिग्विजयार्थ निघालें म्हणजे गौड, केरल, कर्नाट, महाराष्ट्र, गुर्जर व लाट हे देश घाबरून जात असा उल्लेख आहे.[2] यावरून शके १२०२ च्या पूर्वी दक्षिणेंतील राजांना आपले अंकित करण्याची इच्छा दिल्लीच्या बादशहांच्या अंतःकरणांत उद्भूत झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. निदान शके १२१६ मध्यें अल्लाउद्दीन रामराजावर चालून आला तींच काय ती मुसलमानांना दक्षिणेकडची पहिली माहिती असें तरी म्हणतां येणार नाहीं. यापुढें शके १२४० मध्यें हरपाळदेव मारला जाऊन दिल्लीकरांचें ठाणें देवगिरीस पडेपर्यंत व त्यानंतर दिल्लीकरांचें अंकितत्व झुगारून देऊन शके १२७० च्या सुमारास हसन गंगू यानें ब्राह्मणी राज्याची स्थापना करीपर्यंत जो काल लोटला त्याची माहिती सांगणारे विश्वसनीय असे मराठी लेख उपलब्ध नाहींत. मुसलमानी लेखक काय सांगतात तेवढें ऐकून घेऊन ऐतिहासिक जिज्ञासा तृप्त करून घेणें भाग पडतें.

३. मुसलमानी इतिहासकार— केवळ मुसलमानी लेखकांच्या म्हणण्यावर विश्वसून महाराष्ट्राच्या इतिहासाची संगती लावूं पाहणें शास्त्रशुद्ध होणार नाहीं. कारण त्यांच्या इतिहासांत हिंदूंच्या कर्तबगारीचा उल्लेख बहुधा टाळलेला आहे; आणि हिंदूंचा संबंध सांगण्याचा प्रसंगच आला तर तो विकृत अगर भलत्या स्वरूपांत मांडून खरा प्रकार छपविण्याचाहि त्यांनीं प्रयत्न केलेला आहे. त्यांतून बहामनी राज्याची स्थापना झाल्यापासून तो निजामशाहीस स्पष्टपणें उतरती कळा लागेपर्यंतच्या इतिहासास फक्त दोनच मुसलमानी ग्रंथ मुख्यत्वेंकरून आपणास उपयोगी पडण्याजोगें आहेत; एक फेरिस्ताचा म्हणजे **नौरसनामा** अथवा **तारीख-इ-इब्राहिमी** व दुसरा **बुर्हान-इ-मआसिर.** पैकीं फेरिस्ता कांहीं वर्षें अहमदनगर येथें होता व तेथून तो हिजरी ९९८* म्हणजे शके १५११ मध्यें विजापुरास गेला. आणि तेथील इब्राहीम जगद्गुरु या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या बादशहाच्या आश्रयास राहून त्यानें ग्रंथलेखनास सुरुवात केली व पुढें २५ वर्षें

---

२ यस्मिन् दिग्विजयप्रयाणकपरे गौडा निराडंबरा अंध्रा रंध्रपरायणा भयवशान्निष्केलयः केरलाः । कर्णा (टा) अपि कंदराश्रयपरा भ्रष्टा महाराष्ट्रजास्त्यक्तोर्जा किल गूर्जराः समभवन् लाटा किराटा इव ॥ १० ॥ (J. A. S. B. vol. XL III 1874.)

* हिजरी सनावरून शालिवाहन शक काढण्याचें सूत्रः ।

$$\text{शके} = \text{हिजरी} + ५१८ - \frac{\text{हिजरी} - ५८०}{३३\cdot५४}$$ (केतकरकृत कॉनालाजी पृष्ठ ८९ पहा.)

तरी त्यानें इतिहासलेखनाच्या क़ामीं खर्च केलीं. या ग्रंथाची सारांशवजा इंग्रजी भाषांतरें ब्रिग्ज (इ. स. १८२९) व डाऊ यांनीं छापिलीं आहेत. दुसरा ग्रंथ बुऱ्हाण -इ-मासिर. हा सय्यद अलीं बिन अझीझुल्ला तबातबा यानें लिहिला असून त्याच्या लेखनास प्रारंभ हिजरी १००० मध्यें होऊन समाप्ती पुढें चार वर्षांनीं शके १५१७ मध्यें झाली. याच्या पूर्वार्धांत बहामनी राज्याची हकीकत असून उत्तरार्धांत निजामशाहीची माहिती, दुसऱ्या बुऱ्हाण निजामशाहच्या काराकिर्दीपर्यंत, दिलेली आहे. पैकीं पूर्वार्धाचें इंग्रजी भाषांतर मेजर किंग यांनीं इंडियन ऑंटिक्वरीमध्यें क्रमशः छापलें होतें तें पुस्तक रूपानें इ. स. १९०० मध्यें प्रसिद्ध झालें. निजामशाहीची हकीकत देणाऱ्या उत्तरार्धाचें मात्र इंग्रजी भाषांतर कर्नल हेग यांनीं इं. अँ. च्या १९२१-२४ पर्यंतच्या अंकांतून क्रमशःदिलेलें आहे.फेरिस्ता व सय्यदअल्ली यांचे एककल्ली ग्रंथ हिंदुद्वेषानें भरलेले असले तरी त्या काळच्या इतिहासाची एक बाजू तरी (अतिशयोक्ति वगळली असतां) समजून घेण्यास या ग्रंथांचा चांगला उपयोग होण्याजोगा आहे; आणि त्यांतल्या त्यांत सय्यदअल्लीपेक्षां फेरिस्तास कांहीं तरी सत्याची चाड होती असें दिसतें. कारण त्यानें हिंदूंच्या कर्तबगारीचा उल्लेख टाळला असला, व हिंदूच्या कत्तलीचीं वर्णनें रसभरित रीतीनें केलीं असलीं तरी बहमनी हें नांव 'ब्राह्मणी' या शब्दापासून व्युत्पादिलें पाहिजे व निजामशाहींचा संस्थापक हा पाथ्रीच्या कुलकर्ण्याचा मुलगा वगैरे गोष्टी नमूद करण्यास तो कचरला नाहीं; पण सय्यदअल्लीनें मात्र अशा प्रसंगीं पराकाष्ठेचा लपंडाव केला आहे. बहमनी या शब्दाचा संबंध इराणांतील बहमन वंशाशी जोडण्याचा त्यानें प्रयत्न केला आणि बहिरी निजामशहाचें हिंदुत्व झाकण्यासाठीं अशी दंतकथा नमूद केली आहे कीं " बहमनी वंशांतील महमुदशहाच्या अंतःपुरांत एक दासी होती; ती त्यानें मलिक नायब नांवाच्या सरदारास नजर केली; त्यानें तिला घरीं नेली तेव्हां ती गर्भवती असल्याचें त्याच्या नजरेस आलें. ही गोष्ट त्यानें बादशहाच्या कानावर घातली; पण बादशहानें असें ठरविलें कीं भावी अपत्य मलिक नायब यानेंच पत्करावें. यामुळें त्या दासीचा मुलगा अहमद हा मलिक नायबाचा मुलगा अशी समजूत रूढ झाली !" ही काल्पनिक दंतकथा सय्यदअल्लीनें दिली, याचें कारण मलिक नायब हा पाथ्रीचा कुलकर्णी ही गोष्ट त्यावेळीं लपण्याजोगी नव्हती; तेव्हां त्याचा मुलगा म्हणून गणला जाणारा अहमद बीजदृष्ट्या बहामनी वंशांतला होता असें भासविल्यास खपेल असें त्याला वाटलें. परंतु या अहमदशहाच्या नातु बुऱ्हाण निजामशहा यानें अल्लाउद्दीन इमादशहाकडे पाथ्री गांवाची मागणी करतांना 'हा गांव माझ्या पूर्वजांचा आहे यासाठीं तो मला पाहिजे' अशा अर्थाचे शब्द योजल्याचें फेरिस्ता व निजामुद्दीन वगैरे ग्रंथकारांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे. अर्थात सय्यदअल्लीची हकीकत म्हणजे स्वकपोलकल्पित आख्यान होय हें उघड

याशिवाय भा. इ. सं. मंडळानें या खंडास **स्वीय ग्रंथमालेंत** स्थान देऊन; रा. शंकरराव जोशी यानीं सूचीचें टिकीरीचें काम करून देऊन आणि रा. दत्तोपंत आपटे यांनीं प्रस्तावना लिहून देऊन मला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे.

या खंडाच्या छपाईच्या खर्चास मदतीदाखल पन्नास रुपये देण्याचे रा. रा. वाग्भट नारायण देशपांडे बी. ए. एल. एल. बी. वकील सातारा यांनीं अभिवचन दिलें आहे. रा. वाग्भटराव देशपांडे हें शिरवळकर देशपांड्यांपैकीं असल्यानें त्यांनीं पितृऋण फेडण्याचे कामीं घालून दिलेलें उदाहरण अनुकरणीय आहे. या मदतीबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

मौजे पूर (पुरंदर)
कार्तिक शु॥ १ शके १८४८

कृष्णाजी वासुदेव पुरंदरे

ग्रंथ शाखा

प्रस्तावना

महाराष्ट्राचा शास्त्रशुद्ध इतिहास लिहिला जावा या हेतूनें ऐतिहासिक कागदपत्र प्रकाशित करण्याची परंपरा गेल्या पन्नास वर्षांपासून अनेक विद्वानांनीं चालविली आहे; तिला अनुसरून शिरवळकर देशपांडे व पुणें आणि सुपें येथील शिवशाहींतील घराणीं यांच्या दप्तरांतील कांहीं कागद प्रस्तुत खंडांत छापले आहेत. यांपैकीं ४२ कागद शिरवळकर देशपांडे यांच्या दप्तरांतले; २१ चांबळी येथील सरनाईक यांच्याकडचे; ६ पुणे येथील कसब्याच्या गणपतीचे पुजारी रा. निलकंठराव ठकार यांच्याकडचे; २ पुणें येथील होनप देशपांडे यांच्याकडचे, २ पेठकर पुरंदरे यांच्याकडचे, २ चांबळी येथील सेंडकरांकडले व १ उंबराणी येथील वाळवेकरांकडचा असे असून बाकीचे लेखांक पूर्वी इतरत्र छापलेल्यापैकीं संदर्भासाठीं येथें उध्दृत केले आहेत. बहुतेक सर्व कागद मिळविण्याचा व त्यांच्या नकला करण्याचा उद्योग या खंडाचे संपादक रा. **कृष्णाजी वासुदेव पुरंदरे** यांचा आहे. नकला मुळाशीं रुजू पाहण्याचें व कांहीं टीपा देण्याचें काम मीं केलें असून, मुद्रितें तपासण्यांचें बरेंच काम रा. शंकरराव जोशी वाईकर यांनीं केलें आहे.

२. **मुसलमानांची दक्षिणेंत स्वारी:**— या खंडांत शिवशाहीच्या पूर्वीची महाराष्ट्रांतील परिस्थिति सांगणारे कित्येक लेखांक आहेत. त्यांवरून मुसलमानांचें लक्ष दक्षिणेकडे केव्हां गेलें व त्यांच्या ताब्यांत कोणता प्रदेश केव्हां आला हे दोन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. सामान्यतः असा समज रूढ आहे कीं, शके १२१६ मध्यें अल्लाउद्दीनानें प्रथम देवगिरीवर स्वारी केली त्यापूर्वी मुसलमानांचें लष्कर दक्षिणेकडे आलें नव्हतें; आणि हसनगंगूनें बहामनी राज्याची स्थापना केल्यापासून महाराष्ट्र यवनांच्या ताब्यांत आला. पण अलीकडच्या संशोधकांनीं प्रकाशित केलेल्या सामग्रीवरून वरील मतांत कांहींसा फरक करावा लागेल असें लक्षण दिसत आहे. कारण ज्ञानेश्वरी लिहिली जाण्यापूर्वी यादवराजांच्या प्रशस्तींत[1] नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशांचाच उल्लेख असला तरी दिल्लीश्वराच्या मनांत दक्षिणेकडील राजांना जिंकण्याची महत्त्वाकांक्षा शके १२१६ च्या पूर्वी उद्भवली होती असें निश्चितपणें म्हणतां येतें. कारण ग्यासउद्दीनाच्या कारकीर्दीत शके १२०२

---

१ तैलङ्गक्षितिपालतूलनिचयप्रक्षेपझञ्झानिलो
गर्जद्गूर्जरगर्वपर्वताभिदादम्भोलिदोर्विक्रमः ।
हेलोन्मूलितकौंकणक्षितिपतिः कर्णाटलाटोद्भट-
क्षोणीपालविडम्बनः स हि महादेवः कथं वर्ण्यते ॥ १३ ॥

मध्यें पालम येथें कोरलेल्या शिलालेखांत "आगौडाद्रज्जणांन्तं द्रविडजनपदात्सेतुबंधात्समंतात्" म्हणजे बंगाल्यापासून गजनीपर्यंतचें व दक्षिणेस द्रविड देशादि सेतुबंधापर्यंतचे राजे दिल्लीपतीचें अंकितत्व मान्य करीत होते असें म्हटलें आहे इतकेंच नव्हें तर ग्यासुद्दीनाचें सैन्य दिग्विजयार्थ निघालें म्हणजे गौड, केरल, कर्नाट, महाराष्ट्र, गुर्जर व लाट हे देश घाबरूत जात असा उल्लेख आहे.[2] यावरून शके १२०२ च्या पूर्वी दक्षिणेंतील राजांना आपले अंकित करण्याची इच्छा दिल्लीच्या बादशहांच्या अंतःकरणांत उद्भूत झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. निदान शके १२१६ मध्यें अल्लाउद्दीन रामराजावर चालून आला तींच काय ती मुसलमानांना दक्षिणेकडची पहिली माहिती असें तरी म्हणतां येणार नाहीं. यापुढें शके १२४० मध्यें हरपाळदेव मारला जाऊन दिल्लीकरांचें ठाणें देवगिरीस पडेपर्यंत व त्यानंतर दिल्लीकरांचें अंकितत्व झुगारून देऊन शके १२७० च्या सुमारास हसन गंगू यानें ब्राह्मणी राज्याची स्थापना करीपर्यंत जो काल लोटला त्याची माहिती सांगणारे विश्वसनीय असे मराठी लेख उपलब्ध नाहींत. मुसलमानी लेखक काय सांगतात तेवढें ऐकून घेऊन ऐतिहासिक जिज्ञासा तृप्त करून घेणें भाग पडतें.

३. मुसलमानी इतिहासकार— केवळ मुसलमानी लेखकांच्या म्हणण्यावर विश्वसून महाराष्ट्राच्या इतिहासाची संगती लावूं पाहणें शास्त्रशुद्ध होणार नाहीं. कारण त्यांच्या इतिहासांत हिंदूंच्या कर्तबगारीचा उल्लेख बहुधा टाळलेला आहे; आणि हिंदूंचा संबंध सांगण्याचा प्रसंगच आला तर तो विकृत अगर भलत्या स्वरूपांत मांडून खरा प्रकार छपविण्याचाहि त्यांनीं प्रयत्न केलेला आहे. त्यांतून बहामनी राज्याची स्थापना झाल्यापासून तो निजामशाहीस स्पष्टपणें उतरती कळा लागेपर्यंतच्या इतिहासास फक्त दोनच मुसलमानी ग्रंथ मुख्यत्वेंकरून आपणास उपयोगी पडण्याजोगें आहेत; एक फेरिस्ताचा म्हणजे **नौरसनामा** अथवा **तारीख-इ-इब्राहिमी** व दुसरा **बुर्हान-इ-मआसिर.** पैकीं फेरिस्ता कांहीं वर्षें अहमदनगर येथें होता व तेथून तो हिजरी ९९८* म्हणजे शके १५११ मध्यें विजापुरास गेला. आणि तेथील इब्राहीम जगद्गुरु या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या बादशहाच्या आश्रयास राहून त्यानें ग्रंथलेखनास सुरुवात केली व पुढें २५ वर्षें

---

२ यस्मिन् दिग्विजयप्रयाणकपरे गौडा निराडंबरा अंध्रा रंध्रपरायणा भयवशान्निष्केलयः केरलाः। कर्णा (टा) अपि कंदराश्रयपरा भ्रष्टा महाराष्ट्रजास्त्यक्तोर्जा किल गूर्जराः समभवन् लाटा किराटा इव ॥ १० ॥ (J. A. S. B. vol. XL III 1874.)

* हिजरी सनावरून शालिवाहन शक काढण्याचें सूत्रः।

$$\text{शके} = \text{हिजरी} + ५१८ - \frac{\text{हिजरी} - ५८०}{३३ \cdot ५४}$$ (केतकरकृत क्रॉनालाजी पृष्ठ ८९ पहा.)

तरी त्यानें इतिहासलेखनाच्या कामीं खर्च केलीं. या ग्रंथाची सारांशवजा इंग्रजी भाषांतरें ब्रिग्ज (इ. स. १८२९) व डाऊ यांनीं छापिलीं आहेत. दुसरा ग्रंथ बुऱ्हाण -इ-मासिर. हा सय्यद अली बिन अझिझुल्ला तबातबा यानें लिहिला असून त्याच्या लेखनास प्रारंभ हिजरी १००० मध्यें होऊन समाप्ती पुढें चार वर्षांनीं शके १५१७ मध्यें झाली. याच्या पूर्वार्धांत बहामनी राज्याची हकीकत असून उत्तरार्धांत निजामशाहीची माहिती, दुसऱ्या बुऱ्हाण निजामशाहच्या काराकिर्दीपर्यंत, दिलेली आहे. पैकीं पूर्वार्धाचें इंग्रजी भाषांतर मेजर किंग यांनीं इंडियन ऑंटिक्वरीमध्यें क्रमशः छापलें होतें तें पुस्तक रूपानें इ. स. १९०० मध्यें प्रसिद्ध झालें. निजामशाहीची हकीकत देणाऱ्या उत्तरार्धाचें मात्र इंग्रजी भाषांतर कर्नल हेग यांनीं इं. अँ. च्या १९२१-२४ पर्यंतच्या अंकांतून क्रमशः दिलेलें आहे. फेरिस्ता व सय्यदअल्ली यांचे एककल्ली ग्रंथ हिंदुद्वेषानें भरलेले असले तरी त्या काळच्या इतिहासाची एक बाजू तरी (अतिशयोक्ति वगळली असतां) समजून घेण्यास या ग्रंथांचा चांगला उपयोग होण्याजोगा आहे; आणि त्यांतल्या त्यांत सय्यदअल्लीपेक्षां फेरिस्तास कांहीं तरी सत्याची चाड होती असें दिसतें. कारण त्यानें हिंदूंच्या कर्तबगारीचा उल्लेख टाळला असला, व हिंदूच्या कत्तलीचीं वर्णनें रसभरित रीतीनें केलीं असलीं तरी बहमनी हें नांव 'ब्राह्मणी' या शब्दापासून व्युत्पादिलें पाहिजे व निजामशाहींचा संस्थापक हा पाथरीच्या कुलकर्ण्याचा मुलगा वगैरे गोष्टी नमूद करण्यास तो कचरला नाहीं; पण सय्यदअल्लीनें मात्र अशा प्रसंगीं पराकाष्ठेचा लपंडाव केला आहे. बहमनी या शब्दाचा संबंध इराणांतील बहमन वंशाशी जोडण्याचा त्यानें प्रयत्न केला आणि बहिरी निजामशहाचें हिंदुत्व झाकण्यासाठीं अशी दंतकथा नमूद केली आहे कीं " बहमनी वंशांतील महमुदशहाच्या अंतःपुरांत एक दासी होती; ती त्यानें मलिक नायब नांवाच्या सरदारास नजर केली; त्यानें तिला घरीं नेली तेव्हां ती गर्भवती असल्याचें त्याच्या नजरेस आलें. ही गोष्ट त्यानें बादशहाच्या कानावर घातली; पण बादशहानें असें ठरविलें कीं भावी अपत्य मलिक नायब यानेंच पत्करावें. यामुळें त्या दासीचा मुलगा अहमद हा मलिक नायबाचा मुलगा अशी समजूत रूढ झाली !" ही काल्पनिक दंतकथा सय्यदअल्लीनें दिली, याचें कारण मलिक नायब हा पाथरीचा कुलकर्णी ही गोष्ट त्यावेळीं लपण्याजोगी नव्हती; तेव्हां त्याचा मुलगा म्हणून गणला जाणारा अहमद बीजदृष्ट्या बहामनी वंशांतला होता असें भासविल्यास खपेल असें त्याला वाटलें. परंतु या अहमदशहाच्या नातु बुऱ्हाण निजामशहा यानें अल्लाउद्दीन इमादशहाकडे पाथरी गांवाची मागणी करतांना 'हा गांव माझ्या पूर्वजांचा आहे यासाठीं तो मला पाहिजे' अशा अर्थाचे शब्द योजल्याचें फेरिस्ता व निजामुद्दीन वगैरे ग्रंथकारांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे. अर्थात सय्यदअल्लीची हकीकत म्हणजे स्वकपोलकल्पित आख्यान होय हें उघड

आहे. अशा रीतीनें बुर्हान--इ--मआसिर् या ग्रंथांतलि व्युत्पत्या दूषित असल्यामुळें त्याच्या जोरावर स्मिथ वगैरे धोरणी इतिहासकारांनीं 'बहामनी' शब्दाचा संबंध इराणाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे तो ग्राह्य धरतां येत नाहीं. फेरिस्ता व तझकरतुलमलुक आणि मराठी बखरी यांनीं सांगितलेली हसन व मिरजेचा गंगरस ब्राह्मण यांची हकीकत इराणच्या बादरायणी संबंधापेक्षां अधिक ग्राह्य धरणें भाग आहे.

४. बेदरची पादशाही— 'ब्राह्मणी' राज्याच्या नांवाचा विचार झाल्यानंतर महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीनें गुलबर्ग्याची बादशाही व बेदरची बादशाही हा भेद लक्षांत ठेविला पाहिजे. या बादशाहीचें ठाणें पहिल्या आठ सुलतानांच्या कारकीर्दीत (म्हणजे शके १२६९–१३४४ पर्यंत) ७५ वर्षेपर्यंत गुलबुर्गा किंवा कलबुर्गा येथें होतें; आणि अहमदच्या कारकीर्दीपासून पुढें ९६ वर्षेपर्यंत (शके १३४५–१४४०) त्यांच्या राजधानीचें ठिकाण बेदर येथें होतें. या खंडांत शिरवळ, पुरंदर वगैरे प्रांतांतील प्राचीन हकीकत सांगणारे जे कागद छापले आहेत त्यांत देखील बेदरच्या बादशाहीचा उल्लेख आहे, कलबुर्ग्याच्या पादशाहीचा नाहीं. मराठी वाङ्मयात जुनी बादशाही ह्मणजे बेदरची असा जो अर्थ रूढ झाला आहे त्याचें कारण असें दिसतें कीं, बेदरला बादशाही आल्यापासून आजच्या महाराष्ट्राचा अधिकाधिक भाग ब्राह्मणी राज्यांत सामील होऊं लागला. कलबुर्ग्यास राजधानी स्थापन करणाऱ्या हसनाचा खास मुलूख म्हणजे हुक्केरी, बेगळांव, मिरज हे प्रांत होते; आणि त्याच्या राज्याचा विस्तार मुख्यवें करून कर्नाटकाकडे व तेलंगणाकडे होता व महाराष्ट्रापैकीं दौलताबाद वगैरे ठिकाणें ब्राह्मणी राज्यांत अंतर्भूत झालीं असूनहि पश्चिम महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत लहानसहान राजे व पाळेगार स्वतंत्रपणें नांदत असत. कोंकणांतील व गोव्यांतील कांहीं बंदरें मात्र कलबुर्ग्याच्या बादशाहींत मोडत असावीं असें म्हणतां येईल.

५. दुर्गादेवीचा दुष्काळ:– शिरवळच्या इतिहासांतली अगदीं जुनी आठवण म्हणून टिपणकारानें (ले. २) दुर्गादेवीचा दुष्काळ शके १३१८–१३३० पर्यंतच्या १२ वर्षांत पडला असें सांगितलें आहे. त्यानंतर ३० वर्षें चारणकरू याची 'राव' होती; पुढें १३६१ मध्यें बेदरच्या बादशहानें दादो नरसिंह यास रवाना केलें अशी हकीकत या टिपणांत आहे. खटाव येथील एका अप्रकाशित टिपणांत या संबंधींची कांहींशी अधिक माहिती आहे ती अशी:– "बेदरी पादशाही सुलतान बबु करीत असता श्री शके १३१८ वरूषे धाता नाम संवछरे सन ८०६ ते वरुती दुर्गादेवीचा दुकाल पडिला. वारा वरुसें आवर्शण. पाऊस नाही. या करिता मुलूक खराब होऊन खजरा पडिले. मुलकी वस्ती नाहीं यैसे जाहळे.

मुलूक वैरान वरुषें ३०. त्यावर विद्यानगरीहून दादो नरसीह अथर्ववेदी भालंजन गोत्री पा। कराडास आला. जुजवी वस्ती होती. तेथून मुलुकाचे वर्तमान घेता, मुलूक खराब देखोन बचूचे लेक हमशाऊ पादशाही करीत होता त्यास बेदरास जाऊन भेटला. मुलुकाचे अहवाल सांगोन आबादानीबदल कारमुलकी पा। कराड बावन चाहुडीचें करून आला. मुलुकी कोणी वतनदार नव्हते. चारणीस चारण-कर आले होते, त्यास वतनें करून दिल्हीं. " यावरून दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर दादो नरसिंह बेदरच्या बादशहातर्फे कन्नडाकडे आला असें म्हणतां येतें. या दादो नरसिंहाचें आडनाव 'काळे' असें होतें; आणि त्याच्या बरोबर बेदरच्या बादशहानें एक तुर्की खोजा अधिकारी म्हणून दिला होता तो गोरा होता. यामुळें 'काळे' आणि 'गोरा खोजा' यांचा एकत्र उल्लेख करतांना 'काळा खोजा' व 'गोरा खोजा' असे जोडशब्द वापरण्याचा प्रघात लोकांत पडला असावा असा ग्रँडफनें तर्क केला आहे. पण या तर्कापेक्षां महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या दुष्काळाची व्याप्ती केवढी होती हा आहे. ग्रंडफनें आधारास घेतलेला कागद वाईच्या देशमुखाजवळचा होता. आणि या खंडांतला कागद शिरवळच्या देशपाड्यांच्या संग्रहांतला आहे. या खेरीज खटावच्या बाजूस या दुष्काळाचा उल्लेख करणारे कागद आढळतात त्याचाहि मतलब वर सांगितलेल्या प्रकारचाच आहे. लेखांक २ मध्यें 'प्रिथिवीवर दुष्काळ पडला' असे शब्द आहेत. त्यांत 'प्रिथीवीवर' या शब्दांत शिरवळपासून वाई-पर्यंतच्या व खटाव, कऱ्हाड प्रदेशाचा अंतर्भाव करण्यास तर कांहीं हरकत दिसत नाहीं. पण या पलीकडे दुष्काळाच्या व्याप्तीचा प्रदेश केवढा होता हें सांगणें कठिण आहे. फेरिस्ता व सय्यदअल्ली यांनीं आपल्या ग्रंथांत या दुष्काळाचा उल्लेख केला नाहीं. यावरून अनुमान करावयाचें असेल तर ज्या भागांत हा दुष्काळ जाणवला तो भाग ब्राह्मणी राज्यांत मोडत नव्हता किंवा दुष्काळाची व्याप्ती फारशी मोठी नव्हती असें विधान करावें लागेल तथापि अनुल्लेख हा निश्चयात्मक पुरावा नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

६. **दक्षिणी मुसलमान**—दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर व बहामनी सुलतानाची राजधानी बेदर येथें आल्यानंतर शिरवळ, वाई वगैरे महाराष्ट्राच्या पश्चिम भागाकडे बेदरच्या बादशाहाची दृष्टि वळण्यास अनेक कारणें घडलीं असें दिसतें. विशे-षतः अल्लाउद्दीन अहमदशहा (शके १३५७ ते १३७९) याच्या कारकीर्दीत घडलेल्या दोन गोष्टी संस्मरणीय आहेत. उत्तर हिंदुस्थानांत दिल्लीचें तख्त मुसल-मानांच्या ताब्यांत गेल्यापासून मुसलमान सरदार आपसांत भांडत असत. पण तीं भांडणें स्वतः दिल्लीची गादी बळकावण्यासाठीं होत असत; दिल्लीपासून फुटून निराळ्या ठिकाणीं बादशाही स्थापण्याचा प्रयत्न उत्तरेकडील मुसलमानांनीं बहुधा केला नाहीं. परंतु नर्मदेच्या दक्षिणेस वावरणाऱ्या मुसलमानी सरदारांची मनोवृत्ति या

आहे. अशा रीतीनें बुर्हान--इ--मआसिर् या ग्रंथांतलि व्युत्पत्या दूषित असल्यामुळें त्याच्या जोरावर स्मिथ वगैरे धोरणी इतिहासकारांनीं 'बहामनी' शब्दाचा संबंध इराणाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे तो ग्राह्य धरतां येत नाहीं. फेरिस्ता व तझकरतुलमलुक आणि मराठी बखरी यांनीं सांगितलेली हसन व मिरजेचा गंगरस ब्राह्मण यांची हकीकत इराणच्या बादरायणी संबंधापेक्षां अधिक ग्राह्य धरणें भाग आहे.

४. बेदरची पादशाही— 'ब्राह्मणी' राज्याच्या नांवाचा विचार झाल्यानंतर महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीनें गुलबर्ग्याची बादशाही व बेदरची बादशाही हा भेद लक्षांत ठेविला पाहिजे. या बादशाहीचें ठाणें पहिल्या आठ सुलतानांच्या कारकीर्दीत (म्हणजे शके १२६९–१३४४ पर्यंत) ७५ वर्षेपर्यंत गुलबुर्गा किंवा कलबुर्गा येथें होतें; आणि अहमदच्या कारकीर्दीपासून पुढें ९६ वर्षेपर्यंत (शके १३४५–१४४०) त्यांच्या राजधानीचें ठिकाण बेदर येथें होतें. या खंडांत शिरवळ, पुरंदर वगैरे प्रांतांतील प्राचीन हकीकत सांगणारे जे कागद छापले आहेत त्यांत देखील बेदरच्या बादशाहीचा उल्लेख आहे, कलबुर्ग्याच्या पादशाहीचा नाहीं. मराठी वाङ्मयात जुनी बादशाही म्हणजे बेदरची असा जो अर्थ रूढ झाला आहे त्याचें कारण असें दिसतें कीं, बेदरला बादशाही आल्यापासून आजच्या महाराष्ट्राचा अधिकाधिक भाग ब्राह्मणी राज्यांत सामील होऊं लागला. कलबुर्ग्यास राजधानी स्थापन करणाऱ्या हसनाचा खास मुलूख म्हणजे हुकेरी, बेगळांव, मिरज हे प्रांत होते; आणि त्याच्या राज्याचा विस्तार मुख्यत्वें करून कर्नाटकाकडे व तेलंगणाकडे होता व महाराष्ट्रापैकीं दौलताबाद वगैरे ठिकाणें ब्राह्मणी राज्यांत अंतर्भूत झालीं असूनहि पश्चिम महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत लहानसहान राजे व पाळेगार स्वतंत्रपणें नांदत असत. कोंकणांतील व गोव्यांतील कांहीं बंदरें मात्र कलबुर्ग्याच्या बादशाहींत मोडत असावीं असें म्हणतां येईल.

५. दुर्गादेवीचा दुष्काळ:– शिरळवच्या इतिहासांतली अगदीं जुनी आठवण म्हणून टिपणकारानें (ले. २) दुर्गादेवीचा दुष्काळ शके १३१८–१३३० पर्यंतच्या १२ वर्षांत पडला असें सांगितलें आहे. त्यानंतर ३० वर्षें चारणकरू याची 'राव' होती; पुढें १३६१ मध्यें बेदरच्या बादशहानें दादो नरसिंह यास रवाना केलें अशी हकीकत या टिपणांत आहे. खटाव येथील एका अप्रकाशित टिपणांत या संबंधींची कांहींशी अधिक माहिती आहे ती अशी:– "बेदरी पादशाही सुलतान बबु करीत असता श्री शके १३१८ वरूषे धाता नाम संवछरे सन ८०६ ते वरुती दुर्गादेवीचा दुकाल पडिला. वारा वरुसें आवर्शण. पाऊस नाही. या करिता मुलूक खराब होऊन गजरा पडिले. मुलकी वस्ती नाहीं यैसे जाहले.

मुलूक वैरान वरुषें ३०. त्यावर विद्यानगरीहून दादो नरसीह अथर्ववेदी भालंजन गोत्री पाा कराडास आला. जुजवी वस्ती होती. तेथून मुलुकाचे वर्तमान घेता, मुलूक खराब देखोन बचूचे लेक हमशाऊ पादशाही करीत होता त्यास बेदरास जाऊन भेटला. मुलुकाचे अहवाल सांगोन आबादानीबदल कारमुलकी पाा कराड बावन चाहुडीचें करून आला. मुलुकी कोणी वतनदार नव्हते. चारणीस चारण-कर आले होते, त्यास वतनें करून दिल्हीं. " यावरून दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर दादो नरसिंह बेदरच्या बादशहातर्फे कन्नडाकडे आला असें म्हणतां येतें. या दादो नरसिंहाचें आडनाव 'काळे' असें होतें; आणि त्याच्या बरोबर बेदरच्या बादशहानें एक तुर्की खोजा अधिकारी म्हणून दिला होता तो गोरा होता. यामुळें 'काळे' आणि 'गोरा खोजा' यांचा एकत्र उल्लेख करतांना 'काळा खोजा' व 'गोरा खोजा' असे जोडशब्द वापरण्याचा प्रघात लोकांत पडला असावा असा ग्रँडफनें तर्क केला आहे. पण या तर्कापेक्षां महत्वाचा मुद्दा म्हणजे या दुष्काळाची व्याप्ती केवढी होती हा आहे. ग्रंडफनें आधारास घेतलेला कागद वाईच्या देशमुखाजवळचा होता. आणि या खंडांतला कागद शिरवळच्या देशपाड्यांच्या संग्रहांतला आहे. या खेरीज खटावच्या बाजूस या दुष्काळाचा उल्लेख करणारे कागद आढळतात त्याचाहि मतलब वर सांगितलेल्या प्रकारचाच आहे. लेखांक २ मध्यें 'प्रिथिवीवर दुष्काळ पडला' असे शब्द आहेत, त्यांत 'प्रिथीवीवर' या शब्दांत शिरवळपासून वाई-पर्यंतच्या व खटाव, कऱ्हाड प्रदेशाचा अंतर्भाव करण्यास तर कांहीं हरकत दिसत नाहीं. पण या पलीकडे दुष्काळाच्या व्याप्तीचा प्रदेश केवढा होता हें सांगणें कठिण आहे. फेरिस्ता व सय्यदअल्ली यांनीं आपल्या ग्रंथांत या दुष्काळाचा उल्लेख केला नाहीं. यावरून अनुमान करावयाचें असेल तर ज्या भागांत हा दुष्काळ जाणवला तो भाग ब्राह्मणी राज्यांत मोडत नव्हता किंवा दुष्काळाची व्याप्ती फारशी मोठी नव्हती असें विधान करावें लागेल तथापि अनुल्लेख हा निश्चयात्मक पुरावा नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

६. **दक्षिणी मुसलमान**—दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर व बहामनी सुलतानाची राजधानी बेदर येथें आल्यानंतर शिरवळ, वाई वगैरे महाराष्ट्राच्या पश्चिम भागाकडे बेदरच्या बादशाहाची दृष्टि वळण्यास अनेक कारणें घडलीं असें दिसतें. विशेषतः अल्लाउद्दीन अहमदशहा (शके १३५७ ते १३७९) याच्या कारकीर्दीत घडलेल्या दोन गोष्टी संस्मरणीय आहेत. उत्तर हिंदुस्थानांत दिल्लीचें तख्त मुसलमानांच्या ताब्यांत गेल्यापासून मुसलमान सरदार आपसांत भांडत असत. पण तीं भांडणें स्वतः दिल्लीची गादी बळकावण्यासाठीं होत असत; दिल्लीपासून फुटून निराळ्या ठिकाणीं बादशाही स्थापण्याचा प्रयत्न उत्तरेकडील मुसलमानांनीं बहुधा केला नाहीं. परंतु नर्मदेच्या दक्षिणेस वावरणाऱ्या मुसलमानी सरदारांची मनोवृत्ति या

बाबतींत भिन्न होती. त्यांनीं दिल्लीपतीचें अंकितत्व थोड्याच वर्षांत झुगारून दिलें व पुढेंहि ब्राह्मणी सुलतानांशीं राजनिष्ठ राहण्यापेक्षां आपापल्या प्रांतांत स्वतंत्र राज्यें स्थापण्याचीच प्रवृत्ति त्याच्या ठिकाणीं बलवत्तर होती. याचें कारण दक्षिणेंतील मुसलमानी वर्ग एकजात नसून परदेशी व दक्षिणी हा भेद त्याच्या ठिकाणीं तीव्रतेनें जाणवत होता हें होय. इराण, तुर्कस्तान, अरबस्तान येथून आलेले साहसप्रिय मुसलमान आपणास अस्सल वंशांतले व अभिजात समजून येथील बाटे मुसलमानांना तुच्छ लेखीत असत; आणि महत्वाच्या सरकारी जागा परदेशी लोकांना अगर त्यांच्या मुलांनाच मिळाल्या पाहिजेत असा ते आग्रह धरीत. यामुळें ही गोष्ट येथील बाटलेल्या महत्त्वाकांक्षी मुसलमानांना पटण्याजोगी नव्हती.

७. चाकणची कत्तल— अशा रीतीनें मुसलमानांतील ही तेढ विकोपास जाऊन तिचा स्फोट चाकण येथील कत्तलीच्या स्वरूपानें झाला. त्याची हकीकत थोडक्यांत अशी आहे. हिजरी ८४९ (=शके १३६७) मध्यें अल्लाउद्दीन अहमदशहाच्या कारकीर्दीत खल्फ मलिकतुजार यानें संगमेश्वरबंदर हस्तगत करण्याचा विचार केला. याचें कारण त्या बाजूस दाट जंगल असल्यामुळें त्याच्या आश्रयास राहून पुष्कळ चोर व दरवडेखोर छापे घालीत; यामुळें त्या भागांतून जाणाऱ्या येणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंस नेहमीं भय वाटत असे. मलिकतुजारानें प्रथम एक किल्ला घेऊन तेथील किल्लेदार शिर्के यास कैद केलें; तेव्हां शिर्क्यांनें मुसलमानी सैन्याशी गोडी लाऊन असें बोलणें चालविलें कीं "मला इकडील जंगल व प्रदेश याची बारकाईची माहिती आहे. तेव्हां माझ्या बरोबर तुम्ही सैन्यासह याल तर तुम्हांस नेमके संगमेश्वरच्या पायथ्याशीं पोंचवितों; म्हणजे तुम्हास तें बंदर सहज घेतां येईल." मलिकानें शिर्क्यांच्या म्हणण्यास मान्यता दिली; आणि सैन्यांतील लोक नाखुष होते तरी त्यांचें म्हणणें न ऐकतां शिर्क्यानीं दाखविलेल्या वाटेनें निबिड जंगलांतून व डोंगरांच्या दऱ्या खोऱ्यांतून जातांजात हें मुसलमानी सैन्य एका अत्यंत कठिण जागीं येऊन पोंचलें. त्या ठिकाणीं तीस चाळीस हजार हिंदु सैन्य आधींच दबा धरून राहिलें होतें; आणि त्यांच्या तडाक्यांतून या मुसलमानी सैन्याची सुटका होणें अशक्य झालें. शिवाय मलिक तुजार त्याचवेळीं फार आजारी पडला. सारांश हिंदु सैनिकांनीं त्या मुसलमानी सैन्यांतील बहुतेक सैन्याची कत्तल केली. व त्यांत मलिकतुजार व बरेच सय्यद लोक प्राणास मुकले. कांहीं थोडे लोक या प्रसंगांतून निभावले ते मलिकाच्या ठाण्याचें ठिकाण चाकण येथें गेले. इकडे दक्षिणी सरदारांनीं परदेशी सरदारांच्या हेतूविषयीं बादशहाचे मन कलुषित करून शिर्क्यांच्या प्रसंगांतून बचाऊन चाकणास आलेल्या परदेशी सरदारांची कत्तल करावी असा हुकूम मिळविला होता. त्याप्रमाणें निजामुलमुल्क, राजा रुस्तम व मशीरउलमुल्क हमजा यानीं हिंदु व मुसलमान यांचें मिळून एक मोठें

लष्कर चाकणच्या किल्ल्यास वेढा देण्यासाठीं नेलें; त्यावेळीं अस्सल वंशाचे १२०० सय्यद व खेरीज १००० परदेशी मुसलमान चाकणच्या किल्ल्यांत रहात होते. दक्षिणी मुसलमानांचें सैन्य किल्ल्याजवळ आलें तेव्हां तडजोडीचें बोलणें सुरू झालें. त्यांत पहिल्या दिवशीं सुरक्षितपणें जाऊं देण्याचा करार करून व आंतील लोकांना आणा शपथा देऊन बाहेर आणलें व परत किल्ल्यांत जाऊ दिलें. यामुळें विश्वास पटून दुसरे दिवशीं किल्ल्यांतलि सर्व लोक मेजवानीस म्हणून बाहेर आले; आणि त्या प्रसंगीं त्यांची दाक्षिणी मुसलमानांनीं सपशेल कत्तल केली." चाकणच्या कत्तलीचें साल फेरिस्ताच्या मतें शके १३६८; बुऱ्हाण-इ-मासिरच्या मतें १३७६; आणि निजाममुद्दीन अहमदच्या मतें शके १३६७ हें आहे. ही कत्तल झाली त्या वेळीं दक्षिणी व हबशी लोकांचा पक्ष अधिकारारूढ होता; आणि नंतर खरा प्रकार सुलतानास कळून आल्यावर दक्षिणी पक्षाच्या हातून सूत्रें काढून घेण्यांत आलीं. दौलताबाद तेथील चांदमिनारच्या स्तंभावर कोरलेला लेख (ले. ८५) शके १३६७ मधला आहे व त्यात हबशी आमलदार त्याठिकाणीं असल्याचा उल्लेख आहे. यावरून चाकणच्या कत्तलीची मिति हीच असावी असें ठरतें. * परदेशी पक्ष अधिकारारूढ झाल्यावर पुनः शरफशीखान यास मलिक तुजार हा किताब मिळून त्याच्याकडे दाभोळ, जुन्नर, चाकण, पुर्णे, सुपे व शिरवळ या प्रांतांचा हवाला देण्यात आला व याबद्दलचें पत्र (ले. ८६) उपलब्ध आहे. त्या अर्थी शके १३७२ पूर्वी शिरवळ परगण्यास त्याचें ठाणें कायम झालें होतें हें उघड दिसतें. याखेरीज शके १३६८ मध्यें 'विजापूर, भागानगर, देवगिरी व आमदाबाद बेदर अशा चार तरफा होऊन चार सुभ्यांची रवानगी झाली हें ले. २ मधील विधानहि मुसलमानी ग्रंथांतील हकीकतीशीं विसंगत नाहीं.

८. नृसिंह सरस्वतींचा काळ–अल्लाउद्दीन बहामनीच्या कारकीर्दीतील दुसऱ्या एका गोष्टीचा उल्लेख मराठी ग्रंथांतून आढळतो तो नृसिंहसरस्वतींच्या संबंधाचा. गुरुचरित्रांत 'सद्गुरु बैसले निजानंदी' याचा काळ सांगतांना कन्यागत गुरु, बहुधान्य संवत्सर, माघवद्य १ शुक्रवार, उत्तरायण वगैरे योग सांगितले आहेत.

---

* चाकणची कत्तल ही हबशी व दाक्षिणी पक्षाच्या सरशीची निदर्शक होती; व ही कत्तल केवळ चाकण येथेंच तेवढी झाली असा अर्थ नसून ती ठिकठिकाणीं झाली व पर्वीझ हबशानें दौलताबादच्या स्तंभावरील शिलालेखांत 'मुडद्यांवर' या स्तंभाचा पाया उभारला असें (ले. ८५) म्हटलें आहे तें कर्नल हेग याच्या मतें दाक्षिणी पक्षानें परदेशी पक्षावर मिळविलेल्या तात्पुरत्या सरशीचें सूचक आहे. ही विचारसरणी मान्य केल्यास शिर्क्यांच्या शासनार्थ कोकणाच्या जंगलांत कापला गेलेला पहिला मलिकतुजार व हें प्रकरण संपून पुनः परदेशी पक्षातर्फे कासीम बे शफसीखान यास मलिकतुजार हें पद मिळून तो पुनः दौलताबाद येथें कामावर येऊन पोंचेपर्यंत निदान वर्ष दीडवर्ष लोटलें असलें पाहिजे; व या मधल्या अवधींत हा शिलालेख कोरला गेला असें म्हणतां येईल.

त्यावरून गणित करून पाहतां हा योग शके १३८० मध्यें जमतो.*नृसिंहसरस्वतींचा उल्लेख फेरिस्ता अगर सय्यदअल्ली यांच्या ग्रंथांतून आढळत नाहीं. तरी गुरुचरित्रांत वर्णन केल्याप्रमाणें अल्लाउद्दीन पायाच्या व्रणानें पीडित असल्याचा उल्लेख या दोघांच्याहि ग्रंथांतून आहे. ३।४ वर्षें याला ही पीडा होती आणि त्यानें तो मेला अशीहि वार्ता मध्यंतरी उठली आणि यामुळें शत्रू चालून आले; या दुखण्यांतून कांहींसा बरा होऊन सैन्य घेऊन तो चाल करूं शकला वगैरे हकीकत त्यांनीं दिली आहे. त्या अर्थी गुरुचारित्रांत उल्लेखिलेला बेदरचा बादशहा म्हणजे अल्लाउद्दीन बहामनी असें म्हणतां येतें. तो शेवटीं पायाच्या व्रणानेंच वारल्याचा शक या दोघांनींहि १३७९ दिला आहे; तझकरतुलमुलकमध्यें हा मृत्युशक १३८१ सांगितला आहे. नृसिंहसरस्वतींचा समाधिकाल शके १३८० असल्यामुळें त्यानंतर शके १३८१ मध्यें बादशहाचा मृत्यु झालेला असेल अशें अधिक संभवनीय दिसतें. तथापि बादशहाची भेट होऊन तो बरा झाला; नंतर नृसिंहसरस्वतींनीं समाधि घेतली आणि त्यानंतर बादशहा मरण पावला असेंहि मानण्यास फारशी हरकत नाहीं. सुलतान अल्लाउद्दीन दयाळु, उदार, विद्वान व विलासी असून त्यानें आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभीं अनेक देवळें मोडून मशीदी बांधल्या. तो गरीबांचा कैवारी असून दारूचें व्यसन बंद पाडण्यासाठीं त्यानें फार कडक उपाय योजले होते. शुक्रवारीं मशीदींत तो स्वतः खुतबा वाचून कुराणाचें विवेचन करी; आणि त्यावेळीं आपण विद्वान, देवभक्त, न्यायी व दयाळु असल्याचें बोलून दाखवी. परंतु चाकणची कत्तल झाल्यापासून अल्लाउद्दीनाविषयीं तिरस्कार व्यक्त करणारे कांहीं मुसलमान होते. त्यापैकीं सय्यद अजल यानें मशीदींत अल्लाउद्दीनाच्या तोंडून वरील शब्द निघतांच " तूं लबाड आहेस; न्यायी व दयाळु नाहींस; कारण तूं चाकण येथें महमद पैगंबराच्या शुद्ध वंशांतील लोकांची कत्तल करविलीस ! " असा रोखठोक जबाब दिला (बु मा. पृ. ८०). यावरून कडव्या मुसलमानी पक्षास अल्लाउद्दीनाचीं मतें पटत नव्हतीं एवढें स्पष्ट दिसतें.

९. परदेशी पक्षाचा उतरता काळ— अल्लाउद्दीनामागून हुमायून सुलतान गादीवर आला. त्याची तर फेरिस्तानें फारच निंदा केली आहे; व त्याला प्रारंभापासून 'जालीम' म्हणजे क्रूर हें विशेषण दिलें आहे. याचें कारण मुसलमानांना विशेष सवलती देण्याऐवजीं न्यायाच्या बाबतींत तो कोणाचीहि भीडभाड धरीत नसे हें आहे. सय्यदअल्ली म्हणतो " विद्वत्ता, वक्तृत्व व चातुर्य या बाबतींत समकालीन बादशहांत हुमायुनशहाच्या तोडीचा एकहि राजा नव्हता. शौर्य व शरीरसामर्थ्य यांच्या बाबतींत तर तो अनुपमेय होता. पण इतके सद्गुण असून-

---

* मात्र कुंभसंक्रांत असें झटलें आहे तें जमत नाहीं. त्यावेळीं मकर राशींत रवि होता. भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३७ पृ. १२३ पहा.

हि तो स्वभावानें क्रूर होता. अपराधी लोकांना ठार करण्याच्या कामीं अगदीं दयामायी न दाखविता लहानसहान अपराधाबद्दल देखील मुसलमानांचें रक्त सांडण्यास तो बिलकुल भीत नसे " (बु. मा. पृ. ८२). या हुमायुनाच्या कारकीर्दीतील (शके १३७९-१३८३) दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे स्वतंत्र निजामशाहीच्या संस्थापकाचा जनक उदयास येऊं लागला ही होय. विजयनगरच्या राजाशीं युद्ध करतांना अल्लाउद्दीनाच्या कारकीर्दीत जे कैदी संजरखानाच्या हातीं लागले त्यांत वऱ्हाडांतून दक्षिणेंत पळून गेलेल्या एका ब्राह्मणाचा मुलगा होता; त्याला हुमायुनाच्या कारकीर्दीत हसन बहिरी हें नांव मिळून सारंगखान हा किताब देण्यांत आला. या हुमायुनाच्या कारकीर्दीत कडवे मुसलमान अगदीं त्रस्त झाले होते व तो मेला तेव्हां परमेश्वरानें आपणावर मोठी खैर केली असें त्यांना वाटलें. आणि मनांतला हा राग व्यक्त करण्यासाठीं त्याचा मृत्यु निदर्शित करणारा जो कालश्लेष* त्यानीं योजला त्यांत 'झाक जहान' म्हणजे हा मृत्यु 'जगास आनंद देणारा' आहे अशी शब्दरचना केली.

या सर्व हकीकतीवरून या सुमारास दक्षिणी व हबशी मुसलमानांचा एक आणि कडव्या परकीय मुसलमानांचा दुसरा असे दोन पक्ष अस्तित्वांत येऊन बहामनी राज्याचीं शकलें पडण्याची तयारी होत चालली होती हें स्पष्ट आहे. तथापि हें वैमनस्य विकोपास जाऊन त्याचें पर्यवसान पांच शाह्या स्थापण्यांत होईपर्यंत २५।३० वर्षें लोटावीं लागलीं. व या अवधींत महमद

---

* संस्कृतमध्यें ज्याप्रमाणें एकाक्षरी कोश अगहे त्याप्रमाणें फारशींत संख्यानिदर्शक एकाक्षरी कोश आहे. तो ज्या पद्धतीनें रचला आहे तिला 'अब्जद' पद्धति म्हणतात. या पद्धतींत योजलेले अक्षरांचे संकेत असे आहेत.

अ = १; आ (आइन) = ७०; इ = १०; उ = ६; क = २०; कं (नुक्तेदार) = १००; ख = ६००; ग = २०; घ (घइन) = १०००; च = ३; ज़ (जीम) = ३; जं (जे, झे) = ७; झ (झाल) = ७००; झ्व (झ्वाद) = ८००; झो (झोइ) = ९००; तं (नुक्तेदार) = ४००; त (तोइ) = ९; द = ४; न = ५०; प = २; फ = ८०; ब = २; म = ४०; य = १०; र = २००; ल = ३०; व = ६; श = ३००; स = ६०; स्व = ९०; सं = ५००; ह (ह्व्वझ) = ५; हे (हुत्ती) = ८.

फारशींत ज, झ, त, ह वैगेरे उच्चार व्यक्त करण्यास अनेक वर्ण असल्यामुळें त्यांतील भेद व्यक्त करण्यास देवनागरी लिपींत आणखी कांहीं सांकेतिक वर्णाची भर घालणें भाग पडतें. ती घालतांना फारशींत ज्या वर्णावर नुक्ते म्हणजे टिंबे आहेत ते व बिननुक्त्याच असे भेद पाहून वर लिहिलेली अक्षरयोजना लिहिली आहे. हुमायुनाच्या मृत्यूचा कालश्लेष सांगणारीं अक्षरें अशीं आहेत—

झ	उ	कं	ज़	ह	अ	न
७००	६	१००	३	५	१	५०

यांतील आंकड्यांची बेरीज ८६५ असून हा हुमायुनाच्या मृत्यूचा हिजरी सन आहे.

गवान नांवाच्या कर्त्या पुरुषानें कडव्या मुसलमानांचा पक्ष अधिकारारूढ करून बहामनी राज्याची मर्यादा व्यापक करून दाखविली. परंतु त्याचें वर्चस्व दाक्षिणात्य मुसलमानांना मान्य होण्याजोगें नसल्यामुळें त्यांनीं कट करून महमद गवानाचा खून केला. या खुनानें 'परदेशी' पक्षाचें अंतःकरण विदीर्ण झालें; आणि गवानच्या मृत्यूचा कालश्लेष ‡ 'बे गुनाह महमूद गवान शूद शहीद' (= निरपराधी महमद गवान बळी पडला) असा आढळतो; तो, परदेशी पक्षाचा व त्यावेळच्या मुससमानी ग्रंथकारांचा चडफडाट अप्रत्यक्षपणें वर्णन करतो. या महमद गवानानें मुसलमानी धर्माच्या प्रसारार्थ कसून मेहनत केली व ओरिसाच्या राजाशीं लढतांना सांपडलेल्या कैद्यांतून कांहीं ब्राह्मण निवडून त्यांची कत्तल यानें बादशहाच्या हातून करविली व 'गाझी' ही पदवी धारण करण्याचा सल्ला मुहमदशहास दिला. त्याप्रमाणें बहामनी राजपैकीं यानेंच काय तें 'गाझी' हें उपपद लावलें. पण ही गाझी पदवी अशुभसूचक होती व ब्राह्मणाच्या आशीर्वादानें हसन गंगूस मिळालेलें ब्राह्मणी राज्य मुहमदाच्या हातून लयास जाण्यास मुहमदाची ब्रह्महत्त्या कारणीभूत झाली असा दाक्षिणात्यांचा समज असल्याचें फेरिस्तानें नमुद केलें आहे.§ तात्पर्य मुहमदशहा मरण पावल्याचा कालश्लेष * 'खराबी दकन' म्हणजे दाक्षिणेचा नाश या शब्दांत धर्माभिमानी ग्रंथकार करतात, याचा अर्थ; 'तो मेल्यानंतर परदेशी पक्ष दाक्षिणात्य पक्षास आवरून धरण्यास असमर्थ ठरला' असा घेतला पाहिजे.

१८ ब्राह्मणीं सुलतानाविषयींचा पूज्यभाव– मुहमदशहा व गवान यांच्या मृत्यूनंतर कासीम बेरीद यानें सर्व अधिकार ताब्यांत घेऊन बहामनी सुलतानांना नामधारी बनविलें. परंतु कासीमाच्या अंगीं कर्तृत्वशक्ति बेताची असल्यामुळें निरानिराळ्या तर्फांचे सुभेदार मध्यवर्ती सत्तेस न जुमानतां स्वतंत्रपणें वागूं लागलें. तथापि बेदरच्या पादशाहीविषयींची पूज्यबुद्धि त्यांच्या मनांतून नष्ट होण्यास फार काळ लागला हें लक्षांत ठेवलें पाहिजे. 'बहामनी वंशांतिल पुरुषांचें अंकितत्व आम्हांस मान्य आहे; परंतु त्यांना बाहुलें बनवून कारभार करणारा परदेशी कासीम यास आम्ही आमचा धनी होऊं देणार नाहीं' अशी या सुभेदारांची तक्रार होती. यामुळें आपापल्या प्रांतांत स्वतंत्रपणें वागूनहि आपणास 'शहा' म्हणविण्यास ते तितके उत्सुक नव्हते. याचीं कांहीं उदहरणें नमूद करतों. वऱ्हाडच्या फत्तुल्लानें सोळा

---

‡ यांतील अक्षरविन्यास असा आहेः 'बइ गनअह महमउद गअवअन शद शहइद' याची किंमत ८८६ हिजरी = शके १४०३

§ ब्रिग्ज व्हा. २ पृ. ४९७

* यांतील अक्षरविन्यास असा आहेः 'खरअबइ दकन' अक्षरांची किंमत ८८७ हिजरी = १४०४ शके.

वर्षे स्वतंत्रपणें कारभार केल्यावर शके १४२८ मध्यें बहामनी वंशांतील नामधारी सुलतानांस भेटण्याचा त्याला योग आला. तेव्हां सर्वांसमक्ष मोठ्या आदबीनें त्यानें सलाम केला ! विजापूरचा इसुफआदिलशहा महमूदशहा बहामनी याच्य मदतीसाठी द्रव्य व सैन्य पुरविण्यास उत्सुक असे; आणि त्याच्या मागून इस्माइल अलिशहानें बहामनी राजपुत्रास आपली बहीण दिली त्यावेळीं ' शहा ' हा किताब सोडून आपण बहामनीचा एक नोकर या नात्यानें वागण्यास तयार आहों हें व्यक्त करण्याची हरएक संधी त्यानें साधली. परंतु कासीमाच्या कचाट्यांतून सुटण्याची त्या राजपुत्राची इच्छाच दिसली नाहीं यामुळें इस्माइलाचा नाइलाज झाला. बहामनी वंशांतला शेवटला सुलतान कलिमुल्ला जीव वांचावेण्यासाठीं अहमदनगर येथें बुऱ्हाण निजामशहाच्या आश्रयास गेला तेव्हां देखील बुऱ्हाणाची राजनिष्ठाप्रदर्शक लीनता इतक्या थरास गेली कीं लोक त्याबद्दल हंसू लागले; आणि " हा बहामनी सुलतान शून्यवत आहे व त्याच्याविषयीं आदरभाव व्यक्त करण्यानें कोणताहि फायदा न होतां उलट तोटाच होणार आहे " असें मुत्सद्यांनीं स्पष्टपणें बजावलें तेव्हां बुऱ्हाणानें राजनिष्ठेचें प्रदर्शन आवरतें घेतलें. गोवळकोंड्याचा कुली कुतबुलमुल्क तर १५ वर्षें स्वातंत्र्याचा उपभोग घेत असूनहि महमूदशहा बहामनी मरेपर्यंत म्हणजे शके १४४० पर्यंत त्यानें शहा ही पदवी धारण करण्याच नाकारलें. तात्पर्य दिल्लीच्या गादीविषयीं उत्तराहिंदुस्तानभर जसा पूज्यभाव होता तसा बेदरच्या गादीविषयीं दख्खनमधील हिंदु व मुसलमान लोकांत विलक्षण आदरभाव फार वर्षें नांदत होता; यामुळें त्यास धक्का देणारें आपलें स्वातंत्र्य जाहीर करण्यास इकडील सुभेदार कचरत असत.

११ निजामशाहीचें वैशिष्ट्य – बहामनी राज्याचें पोट फोडून ज्या चार शाह्या बाहेर पडल्या त्यांत अहमदनगरची निजामशाही व वऱ्हाडची इमादशाही यांची जात निराळी होती. विजापूरचा इसुफ आदिलखान व भागानगर ऊर्फ गोवळकोंडें येथील कुली कुतुबुलमुल्क हे थेट तुर्कस्थानांत जन्मलेले असून ते कडवे शियापंथी होते; आणि त्यांचा ओढा परदेशी मुसलमानांचें प्रस्थ माजविण्याकडे होतें. या दोनही ठिकाणीं दक्षिणी मुसलमान व हिंदू सरदार यांना वाव देण्याइतका सौम्यपणा बादशहांच्या अंगीं येण्यास पांच पन्नास वर्षें लोटावीं लागलीं. परंतु निजामशाही व इमादशाही यांचे संस्थापक दक्षिणी मुसलमान असून त्यांचा व शिद्धी मुत्सद्यांचा चांगला स्नेह असे व धर्माभिमानापेक्षां राजकीयदृष्टीच आपल्या भाग्योदयास जास्त उपयोगी पडेल असें पटण्याजोगी परिस्थिती त्यांच्या भोंवतीं होती; यामुळें या दोनही ठिकाणीं मराठे सरदारांना आपलें कर्तृत्व दाखविण्यास पुष्कळवेळा चांगला वाव मिळाला. पैकीं निजामशाही सरासरी दीडशे वर्षें चालली. त्या

- अवधींत मुसलमानांत परदेशी व दक्षिणी, शिया व सुनी आणि हबशी व दक्षिणी असे उपपंथ व पोटभेद माजून मुसलमानी समाज कमजोर व मराठा समाज शिरजोर होत गेला. या शिवाय सभोंवारच्या इतर शाह्यांशीं लढण्याचे प्रसंगीं निजामशाही सुलतानांना मोठमोठीं सैन्यें उभारावीं लागत यामुळें देखील बहुसंख्याक हिंदू समाजांतील लोकांना लष्करी पेशा पत्करण्याचीं द्वारें खुलीं झालीं. शेवटीं अकबराच्या कारकीर्दीत दिल्लीपतींनीं जेव्हां दक्षिणेकडे लक्ष दिलें तेव्हां तर इकडील सर्वच लोकांनीं व सुलतानांनीं 'आपण दक्षिणी आहों' हें लक्षांत घेऊन एकजुटीनें दिल्लीच्या मोगलाशीं कसें झगडावयाचें हा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळीं या नवीन संकटाचें व परिस्थितीचें स्वरूप प्रथम चंगीजखान नांवाच्या निजामशाही मुत्सद्यानें ओळखलें; आणि ' निजामशाहा, कुतुबशाहा व आदिलशाहा यानीं आपसांतली यादवी बंद करून एकमेकाशीं दोस्तीचा तह करावा' अशी वाटाघाटहि या मुत्सद्यानें करून पाहिली (ब्रिग्ज्. व्हा. ३ पृ. २५७) परंतु दक्षिणेंतील या शाह्या अंतस्थ यादवीनें इतक्या पोखरल्या गेल्या होत्या कीं, त्यांना शेजाऱ्याचा पाडाव करण्याच्या संकुचित ध्येयाच्या मानानें, इतर गोष्टी तुच्छ वाटत; इत्यादि अनेक कारणपरंपरेनें चंगीजखानाच्या इच्छेप्रमाणें बनाव घडून येण्यास फार अडचण पडली. यानंतर ' दक्षिणेंतील सर्व संस्थानिकांनीं एकजुटीनें मोगलाशीं तोंड दिलें पाहिजे; एरव्हीं त्यांचा निभाव लागणार नाहीं ' हें तत्व पटवून देण्यासाठी पोर्तुगीजांनीं फार कसून मेहेनत केल्याचें दिसतें. शके १५१७–२६ (इ. स. १५९५ ते १६०४) पर्यंतचे यासंबधीचे लिस्बन व विजापूर दरबार यांतील (एकमेकाकडे गेलेल्या) अस्सल खलीत्यांतले उतारे पणजी येथील दप्तरांतून मिळवून फादर हिरास यांनीं (J. B. B. R. A. S. April 1925 pp. 122–5) प्रसिद्ध केले आहेत. त्यावरून अकबराच्या मनांतून दक्षिणेंतील सर्व संस्थानिकांना मोंगलांचे मांडलिक बनवावे असें होतें; व हें ओळखून आदिलशाही सुलतानांनीं चौलच्या मलीकाशी व पोर्तुगाजांशीं दोस्तीचा तह करावा असा आग्रह पोर्तुगीजांनीं केला याबद्दल शंका रहात नाहीं. सारांश निजामशाहीवर मोगलांचा आघात प्रथम होण्याजोगा असल्यामुळें व पोर्तुगीजांना राजकारणांत व्यापक दृष्टी असल्यामुळें ' मोगलांना तोंड देण्यासाठी दाक्षिणात्यांनीं जुटीनें वागलें पाहिजे ' हें तत्व त्यावेळच्या कित्येक मुत्सद्यांना पटलें होतें असें निश्चितपणें म्हणतां येतें.

१२ दाक्षिणात्य सुलतानांची दोस्ती—मोगली संकटानें दाक्षिणात्यांत जी जूट उत्पन्न केली ती स्वभावतःच डळमळीत होती. कारण मोगल बादशहांनाहि दक्षिण जिंकण्याचा डाव एकसारखा नेटानें अव्याहत चालू ठेवता आला नाहीं. अंतस्थ यादवी, फंदफितूर व बंडाळी वगैरे प्रकार वेळोवेळीं मोगली साम्राज्यांत घडत; आणि त्यात्या वेळीं दक्षिण जिंकण्याचा हेतु दिल्लीपतींना तात्पुरता तरी दृष्टिआड

करावा लागे. दक्षिणेंतील राजांना देखील शेजाऱ्याशीं भांडण्याचीच हौस बलवत्तर असे; त्यामुळें मोंगलांच्या चढाईंत यत्किंचित ढिलाई दिसतांच विजापूर, दौलताबाद व गोवळकोंडें येथील राज्यकर्ते व मुत्सद्दी एकमेकांच्या उरावर बसण्यांत पुरुषार्थ मानीत. तात्पर्य दाक्षिणात्य सुलतानांचें ऐक्य मनापासूनचें व दूरवर विचार करून घडवून आणलेलें नसून तें ओढून ताणून चंद्रबळ होतें. यामुळें तें त्यांना कायमचें तारक झालें नाहीं.

१२ मलिकंबराचा उदय– आदिलशाही व निजामशाही राज्यांतील स्नेहसंबंधाचा दुवा दृढतर करून त्याच्या जोरावर अकबराच्या सेनापतींना अहमदनगरच्या वेढ्यांत चांदबिबीनें माघार घ्यावयास लावली व त्यानंतर चांदबिबी अंतस्थ यादवींत हमीदखानाच्या हातून मारली गेली हें इतिहासप्रसिद्ध आहे. त्यानंतर मोगलांनीं पुनः एकवार जोर करून अहमदनगर घेतलें. परंतु अकबराचा मुलगा जहांगीर यानें बंड केल्यामुळें अकबरास दक्षिणेकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाहीं. यामुळें निजामशाही व आदिलशाही यांच्यांतील दोस्तीचा संबंध ढिला पडला व निमजाशाही राज्यहि अंतस्थ यादवींनें खिळखिळें झालें. त्यांत शेवटीं मलिकंबर व मियान राजू असे दोन सरदार निजामशाही मुलूख व्यापून बसले व दोघेहि मूर्तजा निजामशाहास आपल्या कह्यांत ठेवण्यासाठीं धडपडूं लागले. या धडपडीच्या काळांत निजामशाही मुलखांत चौघे सत्ताधारी नांदत होते. अहमदनगर येथें मोगलांच्या सुभेदार खानखानान रहात असून निजामशाही राज्यांत बखेडे कसे माजतील व त्यांत आपणास अधिक मुलूख कसा गिळंकृत करतां येईल हें बकदृष्टीनें पाहणें हें त्याचें काम होतें. मूर्तजा निजामशहा आवशाच्या किल्यांत रहात असून त्याला सभोवारच्या लहानशा टापूंतलें उत्पन्न लाऊन देण्यांत आलें होतें. पण ही स्थिती त्याला अपमानकारक वाटत असून मलिकंबर व राजू यांच्यांत वैमनस्य वाढवून आपल्या छापेंत राहण्यास कोण कबूल आहे याच्या चौकशींत तो होता. मियान राजू हा हिंदु होता असें ग्रँडफ म्हणतो; पण फेरिस्ताच्या ग्रंथावरून तसें म्हणण्याचें कारण दिसत नाहीं. राजूनें दौलताबादचा किल्ला व त्याच्या आसपासचा मुलूख दाबला असून 'मलिकंबराचा पाडाव करून सारी निजामशाही आपण आटपावी' अशी त्याची महत्वाकांक्षा होती. या तीघांखेरीज चौथा प्रतिस्पर्धी मलिकंबर; हा मात्र कर्ता व धोरणी होता. तो चंगीजखानाच्या तालमींत तयार झालेला असून मूर्तजाच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं त्याच्याकडे असलेल्या मुलखाचा सरहद्द–दक्षिणेकडे आदिलशाही व कुतुबशाही राज्यास, पश्चिमेस चौलच्या हबशी राज्यास आणि पूर्वेस व उत्तरेस मोगल व मियान राजू याच्या प्रांताशीं–भिडली होती. मलिकास राजू व मूर्तजा हे दोन अंतस्थ शत्रू असून मोगल व विजापूरकर हे बाह्य शत्रू होते

पैकीं प्रथम त्यानें बाह्य व जबरदस्त अशा शत्रूशीं तंटा न वाढवितां राजूस चीत करण्यांतच कित्येक वर्षें खर्ची घातलीं. शके १५२४ मध्यें मोगलांनीं नांदेड येथें त्याचा पराभव केला तेव्हां तो अरमान मुकाट्यानें गिळून खानखानान याच्याशीं त्यानें स्नेह केला; याचें कारण राजूचा पाडाव करण्याचें ध्येय त्यानें निश्चित केलें असून तें साध्य होईपर्यंत त्याला आपली शक्ति इतर कामांत खर्ची घालावयाची नव्हती हें आहे. मूर्तजाची मात्र काय व्यवस्था लावावी हें त्यास सुचत नव्हतें. कारण तो राजू व मलिकंबर यांच्यांत वितुष्ट वाढविण्यासाठीं धडपडत असे. यामुळें मलिकास त्याचा कंटाळा येऊन त्याला पदच्युत करण्याचाहि त्यानें एकवेळ विचार केला होता. या वाबतीत त्यानें विजापूरच्या इब्राहीम आदिलशाहाचा सल्ला घेतला. तेव्हां इब्राहिमानें 'ही कल्पना साफ चूक आहे' असें सांगितलें. इतकेंच नव्हे तर 'असें करण्यानें मोगलांना निजामशाही राज्यांत हात घालण्यास उत्तम संधी दिल्यासारखी होईल' हेंहि त्यानें मलिकास पटवून दिलें आणि मूर्तजाशीं सलोख्यानें वागण्याचा सल्ला दिला. मलिकासहि तो योग्य दिसल्यामुळें त्यानें मूर्तजाशीं सख्य केलें आणि या सलोख्याच्या जोरावर जुन्नर ही पुनः निजामशाहीची राजधानी केली व शेवटीं राजूचा पराभव करून त्यास कैद केलें आणि दौलताबादचा किल्ला व प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला. तेव्हांपासून मलिकंबर सर्व सत्ताधारी बनला.

१४ ऐतिहासिक ग्रंथांचा अभाव–निजामशाहीचा इतिहास सांगणारे दोनच ग्रंथ उपलब्ध आहेत हें मागें सांगितलें आहे. पैकीं बुऱ्हाण–इ–मआसिरमध्यें अहमदनगरच्या वेढ्यापर्यंतची म्हणजे शके १५१८ पर्यंतची हकीकत दिलेली आहे. मलिकाचा व मूर्तजाचा एकोपा इब्राहिमाच्या मध्यस्थीनें घडून आला तेथपर्यंतची म्हणजे शके १५३२ पर्यंतची हकीकत फेरिस्त्यानें दिली आहे. त्यानंतरची मलिकंबराची कारकीर्द व त्यांतली शहाजीची कामगिरी सांगणारा निजामशाहीचा इतिहास उपलब्ध नाही. बुसातिने सलातीन नांवाचा विजापूरचा इतिहास व मोगली दरबारांतले लेखक यांनीं आपाततः निजामशाही राज्यांतील घडामोडीचे जे उल्लेख केले आहेत ते फार तुटपुंजे व अस्ताव्यस्त असल्यामुळें त्यांतून मलिकंबराच्या कर्तबगारीची देखील कल्पना येऊ शकत नाहीं; मग शहाजी अगर मालोजी यांची तर गोष्टच बोलावयास नको. त्यांचा नामोच्चारहि ते करीत नाहींत. यामुळें त्याकाळचे महाराष्ट्रांतील जुनेकागदपत्र प्रकाशित करून मलिकंबर, शहाजी व शिवाजी यांचे ऐतिहासिक स्वरूप समजून घेण्याखेरीज अन्य मार्ग राहिला नाहीं. विजापूरकर व मोगल यांच्याशीं या तीघांचा जेथें संबंध आला तेथें मोगली व विजापुरी इतिहासांतून या तीघांचे उल्लेख सांपडतात व त्यांचा संग्रह अवश्य केला पाहिजे हें खरें आहे. पण तेवढ्यानें या तीघांच्या कामगिरीचें खरें रहस्य लक्षांत येणें शक्य नाहीं. याकरितां शिवकालीन घराण्यांतील जुने कागदपत्र छापून काढण्याचें जें

व्रत राजवाडे प्रभृति महाराष्ट्रीय संशोधकांनीं पत्करलें आहे तेंच आणखी कित्येक वर्षें चालविण्यावांचून गत्यंतर नाहीं.

१५ **प्रस्तुत खंडांतील उदाहरणें**—मलिकंबराचा जुन्यांत जुना उल्लेख 'ओतूर' हा गांव शके १५२६ मध्यें त्याला 'अर्जानी' म्हणजे प्राप्त झाला त्यावेळचा आहे (सनदापत्रें पृ. ९). त्यानंतर पुढच्यावर्षी पांडेपेडगांव हा परगणा त्याला मिळाला आणि शके १५३० मध्यें जुन्नर सरकारची व्यवस्था त्याला लावतां आली. (स. पृ. १३।१४) त्यावेळीं इब्राहिम आदिलशहाचा व त्याचा स्नेह असून इब्राहिमाची मदत मलिकानें घेतली होती व त्याबद्दल त्याचा शिरवळ परगणा विजापूरकरांतर्फे वाइं येथील सुभेदार हैबतखान हा पहात होता असें वाटतें. प्रस्तुत खंडांतील लेखांक २ च्या यादींत हैबतखानाची कारकीर्द शके १५२६ पासून १५४३ पर्यंत १७ वर्षें होती असें नमूद केलें आहे. आणि खं. २० मधील ले. ६५ व ६८ वरून या अवधींत हैबतखान वाईचा अधिकारी होता असेंहि ठरतें. परंतु त्याच्याकडे शिरवळचा परगणा इतकीं वर्षें एकसारखा होता असा अर्थ दिसत नाहीं. 'शिरवळ परगण्याचा मोकासा वणगोजी निंबाळकराकडे होता; त्यावर आदिलशाही नामजादी झाली. त्या फिरतीमध्यें आपाजी निगुडा शिरवळ परगण्यांतील मौजे भोगवली या गांवातून पळून इदलशाही नामजादींत गेला. त्यानंतर हैबतखानास मोकासा झाला, (पृ. १३). आणि वणगोजी निंबाळकर शके १५३२ मध्यें पुंड होता (पृ. ९) यावरून १५३२ नंतर व १५३५ च्या सुमारास हैबतखानास शिरवळ परगण्याचा मोकास मिळाला असें दिसतें (पृ. ७ ले. ७). शके १५३५ पासून १५४३ पर्यंत मलिकंबर व विजापूरकर यांच्यामध्यें सलोखा कायम होता. परंतु इतकीं वर्षें शिरवळचा ताबा अव्याहतपणें विजापूरकरांकडे नव्हता. कांहीं वर्षें निजामशाहीचा ताबा असून कांहीं वर्षें हा परगणा दोघांच्याहि संयुक्त अमलाखालीं म्हणजे दोअमली होता. कारण १५३५ मध्यें हैबतखानाचे कारकीर्दीस लंब्या विरुद्ध निकाल देण्यांत आला तो 'मुकाम लष्कर खडकी' (पृ. ८) येथें देण्यांत आला. यावरून मिरासीच्या हक्काचा निकाल करण्यास निजामशाही राजधानींतच जावें लागे हें उघड दिसतें. यानंतर तिसरे वर्षीं सीत अशर सालीं म्हणजे १५३७ मध्यें लंबे याच्या सांगण्यावरून हैबतखानानें विठल कायदेवास धरून वाईस नेऊन कोटांत ठेविले आणि कांहीं दिवसानीं शिष्ट लोकांच्या सांगण्यावरून त्याची मुक्तता करून त्यास शिरवळच्या देसकुलकर्णीपणाचें काम सांगितलें (पृ. २१।२२). त्या अर्थी त्यावेळीं वाईच्या सुभेदाराचा अंमल शिरवळ परगण्यावर चालत होता. यानंतर सन समान आशर (शके १५३९) मध्यें सुलो होऊन (सलोख्यानें) शिरवळ परगणा येदलशाया खालून सुटोन हैबतखानाचे बजावर्द होऊन हजरतीचा मुलूख

हजरतीस म्हणजे निजामशहाचा निजामशहास देण्यांत आला (पृ. २२ व ३६). यानंतर काजिहुसेन हवालदार व सय्यद अमजदन मुलूक यांजकडे शिरवळचा मोकासा होता. पुढें हा परगणा पुनः हजरत येदलशाह यास सुलोखाली (सलोख्यानें) दिला; आणि विजापूरकरातर्फे मुला महमदास मोकासा मिळून त्याचे कारकून, आगानुरा व रायाराव शिरवळ महालास आले (पृ. ३४). यापैकीं रायारावाचें नांव महत्त्वाचें आहे. कारण त्यानें पुणें, सुपें व शिरवळ येथें वतनाच्या कामांत अनेक घालमेली केल्याचे कागद उपलब्ध असून त्याच्याच कारकीर्दी अखेर मलिक व विजापूरकर यांचा सलोखा तुटून रायारावास घालवून देण्याचें काम शहाजी भोसले याच्या मार्फत निजामशाही दरबारानें करविलें आहे.

१६ रायाराव— रायारावानें दिलेले महजर व लिहिलेलीं पत्रें प्रस्तुत खंडांत पृ. १९ पासून पृ. ३० पर्यंत आलेलीं आहेत. तीं १५४२ च्या माघ महिन्यापासून १५४३ च्या मार्गशीर्षापर्यंतच्या १० महिन्यांतलीं आहेत. 'सनदापत्रें' पृ. ४१ वर रायारावाच्या आमदानीतला महजर आहे. तो १५४३ च्या अश्वीनांतला आहे व पृ. ३९ वर त्याच्या कारकीर्दीनंतरचा आहे तो १५४४ च्या श्रावणांतला आहे. अर्थात १५४४ च्या श्रावणापूर्वी रायारावाचा अंमल संपला होता हें उघड आहे. ही रायारावाची कारकीर्द १०।१२ च महिने टिकली व अखेरीस त्याला निजामशाही लष्करानें गचांडी देऊन घालविलें हें स्पष्ट करण्यासाठीं त्या वेळची निजामशाही दरबारांतील हकीकत लक्षांत घेतली पाहिजे. १५४३ च्या कार्तिकांत निजामशाही सैन्यानें दिल्लीच्या सैन्यास हटवून बऱ्हाणपुरापर्यंत रेटीत नेलें होतें व पुढें शहाजादा शहाजहान येऊन पोचल्यावर मोगल सेनापतींनीं मलिकंबरास बऱ्याच सवलती देऊन तह केला; या तहामुळें व मलिकंबराच्या वर्तनांत कांहींसा अरेरावीचा भाग येऊ लागल्यामुळें निजामशाही दरबारांतले कांहीं मुत्सद्दी व इब्राहिम आदिलशाहा यांना मलिकाविरुद्ध कारस्थान करणें भाग पडलें. पण हा कट उघडकीस आला आणि त्यांत सामील असलेल्या एका वजीरास मलीकानें कैद केलें तेव्हां त्यानें आदिलशहाचें नांव घेतलें! याच सुमारास जाधवराव पांच हजार सैन्यासह निजामशाही सोडून मोगलाकडे गेला व तेथें त्यास १५४३ कार्तिकांत (१६२१ च्या नोव्हेंबरांत) मोठी मनसब मिळाली. ही हकीकत त्यावेळीं दौलताचाद येथें मलिकंबराशीं वाटाघाट करण्यासाठीं गेलेल्या इंग्रज दलालानें व बऱ्हाणपुर येथील इंग्रज बातमीदारानें त्याचवेळीं पाठविलेल्या पत्रांत लिहिली होती व तीं पत्रें उपलब्ध आहेत. यामुळें मलिक व इब्राहिम यांच्यांत वैमनस्य केव्हां आलें याबद्दल शंका राहत नाहीं (English Factories 1618--21 pp. 318, 332). शिवाय या वैमन-

न्याची बातमी गोव्याच्या गव्हर्नरानें १८ फेब्रु. १६२२ रोजीं लिहिलेल्या पत्रांत पोर्तुगालच्या राजास सरकारी रीत्या कळविली आहे (सदर पृ. ३१७ टीप १). यावरून रायारावाची कारकीर्द १५४३ अखेर संपली असें निश्चित होतें.

१७ **रायाराव व शहाजी**—निजामशाही व आदिलशाही दरबारांतील सलोखा संपण्याची वेळ जवळ आली हें रायारावास दिसून आलें, तेव्हांपासून त्याचें लक्ष न्यायअन्याय पहात बसण्यापेक्षां पैसा मिळविण्याकडेंच लागलें; हें प्रस्तुत खंडांतील पत्रांवरून दिसतें. " रायाराव दौलतमंगळ ऊर्फ भुलेश्वर येथें ठाणें बांधून मुलखाचा सुभा करीत होते.....राज्याची चलाचल; वोढीचा प्रसंग; रायाराव हकीम यांचा बेत कीं द्रव्य हरतऱ्हेनें बलें (उत्पन्न) करावें, त्या उपरी राव निजामशाही इदलशाही चाल जाली. त्या प्रसंगी...पैका सरकारांत कबूल करून बलेंच खरियाचें खोटें करावें हा निर्वाह करून इनसाफ न करतां ... मालजी भालेराव यास मजालसीतून काढून लावले.... मुलूक कामथेयापासून पैका घेऊन रावजीनीं (रायारावांनीं) केला यैसे (लोक) बोलले. तों महिना पंधरा दिवशीं इदलशाहीची जबरदस्ती झाली. **माहाराज शाहाजीराजे साहेबास** प्रांत मजकूर (पुणें) देऊन त्याची फौज या प्रांतास आली. रायाराव पराभऊन गेले. माहाराजांचा अमल मुलखांत चालला." (पृ. ९८). शिरवळ परगण्यांत देखील 'येदलशायाचे खुलो तुटोन हजरती निजामशाह साहेबासी मुलूक जाहला. यावरी परगणे शिरवळ राजश्री **राजेसाहेबास** मुकासा अर्जानी जाला ' (पृ. ३५ असें म्हटलें आहे, त्याचा अर्थ 'शाहाजी राजे' असाच घेतला पाहिजे; व त्यावरून शके १५४४ मध्यें रायारावानें व्यापलेला मुलूख सोडवून तो निजामशाहींत दाखल करून घेण्याचें काम शहाजीनें यावेळीं केलें असें ठरतें. यानंतर मलिकंबर व विजापूरकर यांताल वैमनस्य फारच विकोपास जाऊन त्याचें पर्यवसान, मोगल व विजापूरकर यानीं एकजूट करून, मलिकंबरावर चाल करण्यांत झालें; परंतु या वेळीं मलिकंबरानें या संयुक्त सैन्यास भातवडीच्या युद्धांत (१५४६ च्या कार्तिकात) चीत केल्यामुळें मलिकाचा दरारा अतिशयच वाढला वगैरे हकीकत मोगली व विजापुरी इतिहासांत आलेली आहे. पण या भातवडीच्या युद्धांत शहाजीनें मोठी तरवार गाजविली हा गोष्ट लक्षांत येण्यास तंजावरच्या शिलालेखावांचून दुसरें साधन नाहीं. शिवभारतांत देखील शहाजीच्या या पराक्रमाची माहिती विस्तृतपणें दिली असून त्यानंतर शहाजी व मलिकंबर यांच्यात वितुष्ट कसें आलें व शेवटीं तो विजापुरकराकडे कसा गेला याची हकीकत दिलेली आहे.

१८ **शहाजी राजे सरलष्कर**—शहाजी राजे या नांवास 'सरलष्कर' हा किताब लावलेलीं कित्येक अस्सल पत्रें सं.१५व २० मध्यें व इतर छापण्यांत आलीं आहेत. तीं

सर्वं १५४७ च्या श्रावणापासून १५४९ चा फाल्गुन या अवधीमधलीं आहेत. त्यानंतर १५५० पासूनचीं शहाजीचीं बरींच पत्रें उपलब्ध असून त्यांपैकीं एकाहि पत्रांत त्यास 'सरलष्कर' हा किताब लावलेला आढळत नाहीं. यामुळें हा किताब शहाजीस कां लावण्यांत आला व तो काय दाखवितो याचा खुलासा केला पाहिजे. भातवडीच्या लढाईनंतर मलिक व शहाजी यांच्यांतील वैमनस्य वाढून शहाजी विजापूरकरांकडे गेला हें मागें सांगितलेंच आहे. त्यावेळच्या शहाजीच्या हालचालींचा तपशील शिवभारतांत आहे. त्यावरून असें दिसतें कीं, 'खेलोजी प्रभृति विठोजीचे मुलगे आपला द्वेष करूं लागले व त्यांना मलिकंबराचा पाठिंबा मिळाला हें पाहून शहाजी आपल्या जहागिरीच्या प्रदेशांत येऊन राहिला. तेथें निजामशाही प्रधान त्याचें मन वळवूं शकले नाहींत. ही संधी साधून आदिलशहानें आपल्या सरदारांमार्फत शहाजीस आपल्या पक्षास घेतलें. शहाजी तिकडे गेल्यानंतर त्यानें मुधोजी फलटणकरावर स्वारी करून जय मिळविला आणि कर्नाटक व केरळ प्रांत जिंकून इब्राहिमाच्या खजिन्यांत भर घातली. पुढें मलिकंबर, इब्राहिम आदिलशहा व जहांगीर मरण पावले व शहाजहानानें निजामशाहीवर चाल करण्याचें ठरविलें. तेव्हां शहाजी विजापूर सोडून निजामशहाकडे आला.' पैकीं मलिकंबर १५४८ च्या वैशाखांत मेला व इब्राहिम आणि जहांगीर १५४९ च्या भाद्रपद कार्तिकांत वारले. त्यानंतर चार महिन्यांनीं शहाजहानानें दक्षिणेकडे स्वारी काढण्याचा विचार केला. या गोष्टी मुसलमानी इतिहासकारांनीं नमूद केल्या आहेत. त्याचप्रमाणें भातवडीच्या युद्धांत विजापूरकरांतर्फे मुल्ह्याचाबा म्हणून जो सेनापती होता त्यास व त्यानंतर आदिलशाहीतील कित्येक सेनापतींना 'सरलष्कर' हा किताब असल्याचेंहि त्यांच्या ग्रंथावरून दिसतें. या गोष्टी लक्षांत ठेवल्या असतां अस्सलपत्रांच्या सहायानें शहाजीसंबंधानें पुढील विधानें करतां येतात. शके १५४७ च्या श्रावणांत शहाजी 'सरलष्कर' होऊन म्हणजे विजापूरकरांची बाजू पत्करून पुणें परगण्यांत राहूं लागला; व त्याचे कारकून (इनामदारांना) ताज्या खर्दखताचा तगादा करूं लागले (खं. १५ पृ. ४२८). त्यानंतर 'साहाजी भोसले येदिलशाही यास गोसमाल (= शिक्षा) देवयाबद्दल' निजामशाहीतर्फे साबाजीपंत आले (पृ. ४०). त्यानीं शहाजीस पुणें प्रांतांतून घालवून गनीमास म्हणजे विजापूरच्या सैन्यास सालपा घाटांत कोंडलें. आणि हें प्रकर्ण आटपून साबाजीपंत चांबळीच्या मोकदमाबद्दल सेंडकर व कामथे यामधील तंटा निवडण्यास १५४७ च्या पौषांत बसला (पृ. ३८). तिकडे शहाजी याचवेळीं विजापूर-दरबारांत मोठी मान्यता पाऊन मोद्दित्यांना तळबीड व पन्हाळा येथील वतनें मिळवून देत होता (पृ. ४३) निजामशाही दरबारांतील पत्रांतून शाहाजी भोसले यास 'येदिलशाही' हें विशेषण लावण्यांत येई, त्याचवेळीं विजापूर दरबारांतील फर्मानांतून त्याला सरलष्कर हा किताब लावलेला कां आढळतो याचें कारण समजण्यास आतां

अडचण पडत नाहीं. यानंतर दोन अडीच वर्षें विजापूर दरबारीं घालवून १५४९ च्या फाल्गुनांत शहाजीराजे ' सरलष्कर ' यानें पुणें परगणा ' कबज ' केला (खं. १५ पृ. ३४५). याचा अर्थ त्या वेळेपर्यंत शहाजी विजापूरकरांच्या बाजूस असून पुढें दोन चारं महिन्यांत शहाजीराजे (आतां सरलष्कर नव्हे) यास निजामशाहीतर्फे पुण्याचा मोकासा मिळाला (खं. २० पृ. ३४६) सारांश १५५० चैत्र ते आषाढच्या दरम्यान शहाजी निजामशाहींत येऊन मिळाला असें ठरतें.

१९ प्रो. सरकार व ग्रँडफ—शहाजी शके १५५० च्या पूर्वीचि मोठा तोलदार सरदार बनून सरलष्कर ही पदवी त्यानें मिळविली होती इत्यादि हकीकत इतिहासाचार्य राजवाडे व कै. खरे यांनीं आपल्या लेखांतून नमूद केली होती; आणि प्रस्तुत खंडांतील पत्रातून रायारावास घालवून देण्याचें काम शहाजीनें १५४४ च्या अखेरीस केलें असें म्हणण्यास आधार मिळत असल्यामुळें शहाजीच्या एका नवीन स्वारीची माहिती लागली; व सरलष्कर हा किताब कोणत्या दरबारामार्फत शहाजीस चालत होता याचा निर्णय करतां आल्यामुळें शके १५४७ ते १५५० पर्यंतच्या गुंतागुंतीच्या हालचालींचाहि तपशिल समजूं शकला. ग्रँडफ व प्रो. सरकार यांना शहाजीच्या या वेळच्या हालचाली कां समजूं शकल्या नाहींत याचेंहि परीक्षण या प्रसंगीं करणें बोधप्रद होणार आहे. खाफीखान व विजापूर येथील कांहीं फारशी हस्तलिखित ग्रंथ यांचा उपयोग करून व कांहीं ठिकाणीं मराठी कागदपत्रांची मदत घेऊन ग्रँडफनें शहाजीचें या वेळेचें चरित्र लिहिलें. त्यांत शके १५४२ (इ. स. १६२०) मध्यें मलिकंबर व मोगल यांच्यामध्यें झालेल्या एका युद्धांत लुखजी, शहाजी व फलटणचे नाईक (जगपाळ ऊर्फ वणंगपाळ) यांनीं मोठी तलवार गाजविली असा उल्लेख, त्याला एका मराठी कागदांत सांपडला. परंतु ही गोष्ट त्याला विसंगत वाटली; कारण फारशी इतिहासांतील निजामशाही विषयक त्रोटक उल्लेख वाचून मलिकंबर व इब्राहिम आदिलशहा यांच्यांत नेहेमींच वाकडें होतें असा त्याचा समज होता. The sultans of Bijapur and Golcondah did not view the rise of Mullik Umber favourably. Ibrahim Adil Shah bore him a personal enmity (Grant. Duff's History 1921, p. 79) असें त्याचें मत बनलें असून विजापूरचा सरदार निंबाळकर व मलिकंबरातर्फेचे शहाजी आणि लखुजी यांनीं एकजुटीनें वागणें म्हणजे " There was a general confederacy against the moghuls (p.79, note 2) 'दक्षिणेंतील शाह्यांनीं मोगलाविरुद्ध एक जूट केली होती' असें मानावें लागतें. ही आपत्ती टाळण्यासाठीं 'वणंगपाळ हा विजापूरकरांना न जुमानता या युद्धांत सामील झाला असेल' अशी काल्पनिक तोड ग्रंडफनें सुचविली आहे. परंतु प्रस्तुत खंडांतील पत्रांच्या सहायानें दाक्षिणात्य शाह्यांची शके १५४४ पर्यंत जट

होती व त्यानंतर मलिकंबर व आदिलशाहा यांचा सलोखा तुटला वगैरे तपशील माहीत झाल्यामुळें शके १५४२ मधील ग्रंडफला आढळलेला मराठी कागदांतला उल्लेख सुसंगत आहे असें आपण म्हणूं शकतों. * ग्रँडफनंतर शंभर वर्षांनीं प्रो. सरकार यांनीं शहाजीचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला. त्यांत शहाजी विषयक जी नवीन माहिती उपलब्ध होती तिचा समावेश करणें त्यांचें कर्तव्य होतें. मॉडर्न रिव्ह्यूच्या १९१७ सपटंबरच्या अंकांत त्यांनीं असा प्रयत्न केला असून A corrective of the legendary history current among the Marathas म्हणजे शहाजीसंबंधीच्या महाराष्ट्रांतील दंतकथांचा निरास करण्यासाठीं हा लेख आपण लिहितों असें त्यांनीं मुद्दाम सांगितलेंही आहे. पण मराठींतील सामग्री त्यांना मुळींच जमेस धरतां न आल्यामुळें त्यांना शके १५५० पर्यंतचें शहाजीचें चरित्र ग्रंडफ इतकें देखील रेखाटतां आलें नाहीं. शहाजीचें चरित्र लिहितांना बखरकारांनीं दिलेल्या हकीकती विसंगत व अविश्वसनीय आहेत हें त्यांचें विधान ग्राह्य होण्याजोगें आहे. पण चखरी-खेरीज मराठींत अस्सल पत्रें आहेत व ती जमेस धरलीं पाहिजेत हें त्यांच्या लक्षांत नटिसें आलें नाहीं. राजवाडे यांच्या ८ व्या आणि १५-२० या खंडांत छापलेलीं पत्रें, 'शिव चरित्र चारकाईनें समजून घेण्यास उपयोगी पडण्याजोगी आहेत' हें प्रो. सरकार यांनीं कबूल केलें असून या खंडाचें, संपादकत्व चांगलेंसें झालें नाहीं (The editing leaves much to be desired. Shivaji & his Times p. 453)आणि यांत इनाम कमिशनला फसविण्यासाठीं तयार केलेले कांहीं बनावट कागद छापले आहेत, अशी बुजगावणीविजा तक्रार केली आहे. पण या तक्रारीवरून आपण आपलें मराठीचें अज्ञान व्यक्त करीत आहों हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. कारण, ऐतिहासिक कागदपत्रांच्या संपादनाच्या बाबतींत राजवाड्यांइतकी कसोशी बाळगणारा विद्वान् दुसरा नाहीं ही गोष्ट महाराष्ट्रांत प्रत्येक जण जाणतो. आणि ज्या पत्रांबद्दल संशय वाटण्याजोगा आहे त्यांना राजवाडे यांनीं टीपा देऊन खुलासाहि केलेला आहे. त्यांतून एखाद्या पत्रावर अशी टीप देण्याचें राहिलें असेल तर ती चूक सप्रमाण दाखवून देण्याचा प्रयत्न प्रो. सरकार यांनीं करावयास पाहिजे होता. तो न करतां उलट 'शिवचरित्रास उपयोगी अशी सामुग्री मराठींत मुळींच नाहीं; आहे ती फारशी व इंग्रजींतच काय ती आहे असा गैरसमज प्रो. सरकार वेळीं अवेळीं आपल्या लेखांतून फैलावीत असतात. The only contemporary records of Shivaji's and even Sambhaji's times that now survive are in English and

---

* दाक्षिणात्यांनीं एक जूट करून मोंगलांशीं या वेळीं झगडा केला ही गोष्ट प्रो. सरकार यांनीं फारशी ग्रंथांच्याच सहायानें नमूद केली आहे. औ. च. व्हा. १।२ पृ. २८ पहा. तथापि त्यांना देखील दाक्षिणात्यांच्या (Grand alliance) या जुटीचा तपशीलवार माहितगी असल्याचें दिसत नाहीं.

Persian and *none at all in Marathi.* (p. 446) In this state of things it may be patriotic to prefer the Marathi accounts .....to the accurate and contemporary Persian and English sources: but it would not be honest history (p. 447)· असाहि ते महाराष्ट्रांतील संशोधकांना सरसकट दोषण मारीत असतात. याकरितां त्यांना या बाबतींत स्पष्टपणें असें सांगणें जरूर आहे कीं, समकालीन व विश्वसनीय असा फारशी, इंग्रजी अगर अन्य कोणत्याहि भाषेंतील उल्लेख आढळल्यास त्याचा उपयोग करूं नये अगर त्यास गौण मानावें असें प्रतिपादन महाराष्ट्रांतील कोणत्याहि संशोधकानें केलेलें नाहीं. यामुळें प्रो. सरकार यांची वक्रोक्ति विगतार्थ आहे. पण उलट शहाजी व शिवाजी यांचीं चरित्रें लिहितांना प्रो. सरकार यांना मराठींतील समकालीन सामुग्रीचा उपयोग करतां आला नाहीं; हें कोणासहि सहज दिसण्याजोगें आहे. व खरें पहातां 'फारशी ग्रंथांच्या सहायानें व मराठी बखरी वाचून मीं शिवचरित्र लिहिलें आहे. अस्सल पत्रव्यवहार असलेल्या मराठींतील सामुग्रीचा मला उपयोग करतां आला नाहीं' असें त्यांनीं प्रांजलपणें ग्रंथारंभीं नमूद केलें असतें तर ते Honest history चें खरे भोक्ते आहेत असें म्हणतां आलें असतें. पण तें न करतां उलट आपण सर्व सामुग्रीचा चारकाईनें परामर्ष घेतला आहे (exhaustive and minute use of the available sources) आणि अगदी बारीक सारीक देखील विश्वसनीय अशा तपशीलाचा (every fact however small) उल्लेख केला आहे व इतरांच्या ग्राह्याग्राह्यतेची चर्चा केली आहे असें ते प्रस्तावनेंत जाहीर करतात ! ही गोष्ट त्यांच्या संशोधकत्वास खास कमीपणा आणणारी आहे व यामुळेंच त्यांचें शिवचरित्र महाराष्ट्रांत प्रमाणभूत मानलें जात नाहीं. मराठींतील सामुग्री जमेस धरतां न आल्यामुळें शहाजीचें चरित्र लिहितांना Shahaji must have been a petty captain during the regency of Malik Amber and he first rose to independent and high command only under Fath Khan (the son of Ambar) who was evidently his first patron (M. R. 1917 Sept. p. 248) असें जें प्रो. सरकार यांनीं ठासून सांगितलें आहे तें त्यांच्या मराठीच्या अज्ञानाचें द्योतक असल्यामुळें जमेस न धरतां शहाजीसंबंधाचें १५५० पर्यंतचे उल्लेख असे मांडून दाखवितां येतील.

शके १५४२ शहाजी, लखुजी, निंबाळकर व मलिकंबर मिळून मोगलांचा पराभव करतात. (ग्रंडफ).

१५४४ शहाजीची रायारावावर स्वारी (पृ. ९८)

१५४६ कार्तीक. भातवडीची लढाई व शहाजीच्या पराक्रमाचा विशेष गौरव.- (तंजावरचा शिलालेख व शिवभारत)

१५४७ शहाजी मलिकंबराशीं भांडून अदिलशाहीस मिळतो. यामुळें त्यास पुणें प्रांत सोडून विजापूरच्या हद्दींत जावें लागतें; (पृ. ४०) व तेथें त्यास सरलष्कर या नात्यानें मोठा मान मिळतो. (पृ. ४३)

१५४७–१५४९ शहाजी विजापूर दरबारच्या आश्रयास. १५४९ च्या फाल्गुनांत तो पुणें प्रांत जबरदस्तीनें ताब्यांत घेतो. (खं. २० पृ. ३४५)

१५५० शहाजी निजामशाहीच्या नोकरींत जातो व त्यास पुणें परगण्याचा मोकासा मिळतो. (खं. २० पृ. ३४६)

२० जायणा लिंगरस—शहाजी परत निजामशाहींत आल्यानंतर पुढील ७।८ वर्षांत कधीं मोगलास मिळून तर कधीं त्यांना विरोध करून त्याला जो राजकीय डाव मांडतां आला व अखेरीस जो मोडून त्याला विजापूरकरांची नोकरी पत्करावी लागली त्या डावाची माहिती अनेक लेखकांनीं दिली आहे; आणि तिच्यांत विशेष भर पडण्याजोगा महत्त्वाचा उल्लेख या खंडांतील कागदांत आढळत नाहीं, सबब त्याचें विवेचन येथें करण्याचें कारण नाहीं. मात्र जायणा लिंगरस हें जें शिरवळच्या हवालदाराचें नांव आलें आहे (पृ. ४४) तें शहाजीच्या चरित्राच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. शहाजी मलिकंबराशीं भांडून शके १५४७ अखेर विजापूरकरांकडे गेला तेव्हां तो पन्हाळ्याच्या बाजूस होता आणि तेथें जायणा लिंगरस हा त्याच्याबरोबर होता (शिवकालीन घराणीं इ. आणि ऐ. ले. ३७० पृ. १०१)–पुढें ' शाहजीराजे पादशहापासून यागी जाहाले (सदर पृ. १०२) म्हणजे विजापूरकरांचा पक्ष सोडून परत निजामशाहींत आले, त्या वेळीं जायणा लिंगरस यानें कोणता पक्ष स्वीकारला तें कळत नाहीं. तथापि शके १५५१ च्या पौषांतील अस्सल पत्रांत (खं. १६ ले. १६) ' एदिलशाही लोकी एउनु पा शिरवळ कबज केलें आहे ' असें म्हटलें आहे व प्रस्तुत खंडांत १५५२ च्या भाद्रपदांत (पृ. ४४) ' जायणा लिंगरस हवालदार माहालानिहाय व किले सुभानमंगळ (= शिरवळ)" असा उल्लेख आहे; त्यावरून जायणापंत विजापूरकरांच्याच नोकरींत राहिला असावा असें दिसतें. यानंतर शके १५५७।५८ मध्यें शहाजीहि जेव्हां विजापूरकरांच्या नोकरींत शिरला तेव्हां दादाजी कोंडदेवाचा अंमल शिरवळ परगण्यावर चालू झाला. हें लक्षांत ठेवलें असतां शिरवळ परगण्यावरील हकीम म्हणजे अधिकारी सांगतांना हैबतखान, मलिकंबर, जायणापंत, यावर शहाजीचे कारकून दादाजी कोंडदेव, नंतर छत्रपति (शिवाजी) साहेब आणि राजाराम असा जो अनुक्रम पृ. ९२ वरील तकरीरीमध्यें आला आहे तो बरोबर आहे.

२१ शिरवळ व दादाजी कोंडदेव—शिरवळवर दादाजी कोंडदेवाचा अंमल चालत होता हें जें वर विधान केलें आहे त्यास असल पत्राचा आधार असून त्याच्या

संभाजीनें शिवाजी महाराजांच्या पहिल्याच लष्करी हालचालीवर कांहींसा प्रकाश पडण्यासारखा आहे. शिरवळच्या कुलकर्णाचा भाऊबंदी तंटा दादाजी कोंडदेवाकडे गेला तेव्हां त्यानें शिवापूर मुक्कामीं त्या तंट्याचा निकाल गोतमुखें न करतां वाटणीच्या रूपानें केला. हा खं. २० (ले. ५३) मध्यें छापलेला आहे. परंतु रामाजी विठ्ठलास हा निकाल न पटल्यामुळें त्यानें पुण्यास जाऊन जिजाबाईसाहेबांकडे तक्रार केली; आणि मातुश्री जिजाबाईनीं दादाजीपंतास सांगितलें की " यांचा निवाडा गोतमुखे करणें. " त्याप्रमाणें दादाजीपंतानीं आपला पूर्वीचा वाटणीचा महजर रद्द करून गोतमुखें या प्रकरणाचा निवाडा करण्याचा हुकूम शिरवळचा हवालदार विठ्ठल गिरमाजी यास दिला. हा हुकूम या खंडांत छापला असून तो शके १५६८ चैत्र व. १२ मितीचा आहे (पृ. ९६) या हुकुमाप्रमाणें गोतमुखें निवाडा व्हावयाचा होता; इतक्यांत ' महालांत धामधूम झाली, सबेंच दादाजीपंत मृत्य पावले (पृ. ९५). त्या अर्थी शिरवळ परगण्यातील शिवाजी महाराजांची ही ' धामधूम ' १५६८ च्या चैत्रापासून दादाजीच्या मृत्युपूर्वी म्हणजे १५६९ च्या जेष्ट आषाढापूर्वी झाली असली पाहिजे. आणि ही धामधूम म्हणजे ' हिंदवी स्वराज्यासाठीं ' शिवाजी महाराजांनीं केलेल्या चळवळीची असावी असा संशय येतो. कारण खं. १५ ले. २६९ चें पत्र १५६८ च्या ज्येष्टांतलें असून (या पत्राच्या माथ्यावर शक १५६७ आहे, पण तो १५६८ पाहिजे) त्यांत या स्वराज्याच्या चळवळीची माहिती विजापूर दरबारास कळल्यामुळें दादाजी नरस प्रभु फरारी झाला व शिरवळच्या सरहद्दीवरचा मुलूख ' वेराण ' जाला वगैरे हकीकत आहे; पण त्याबरोबरच विजापूर दरबारानें हें प्रकरण न वाढवितां सरसकट माफी देण्याचें जाहीर केलें आहे. * या माफीच्या जाहीरनाम्याचा काय परिणाम झाला हें समण्यास मार्ग नाहीं. पण एवढें खरें कीं शके १५६९ मध्यें दादाजी कोंडदेव मरण पावल्यावर पुणे परगण्यावर शिद्दी अंबर हवालदार व शिवाजी राजे यांची हुकमत चालू लागली (पृ. ५२); आणि १५६९ च्या कार्तिकापर्यंत शांतता होती. (ले. २९ याच्या मथळ्यावरची मिती चुकली आहे. ती १५६९ कार्तिक व. ५ पाहिजे.) त्यानंतर पांच चार महिन्यांत केव्हांतरी महाराजांनीं सिंहगड घेतला. (शि. च. प्र. पृ. ५५). पुढें १५७० च्या श्रावणांत शहाजी राजे यांना मुस्तफाखानानें कैद केलें; व शिवाजी महाराजांवरही विजापुराहून सैन्य रवाना झालें त्यावेळीं शिरवळास झडलेल्या चकमकीचें वर्णन प्रस्तुत खंडांत (पृ. ५४) आलेलें असून त्यांत ही महत्त्वाचीं वाक्यें आहेत:

---

* हिंदवी स्वराज्यासंबंधाचीं हीं दोन तीन पत्रें अस्सल नसुन नक्कल आहेत व त्या नकला करतांना ' अज रख्तखाने ' वगैरे शब्द शिवाजीचा किताब आहे असें समजून या नकलकारानें स्मृतींनें मजकूर लिहिलेला दिसतो. या दोन शब्दावरून ' पत्र अविश्वसनीय दिसेल, परंतु मतलब खरा असावा ' असा राजवाडे यांचा अभिप्राय आहे.

"**शहाजी राजे धरिली त्याचा लेक सिवाजी पुरंधरी बैसोनु दिवाण नामजादीशी झगडो लागले.** सर सुभेदार फत्याखान तिही शिरवळास फाजीलशहा व आशाफशा पाठविले. तिही कोट पाा मा [शिरवळ] बळाविला. त्यावरी शिवाजी राजे धाविनले. झगडा जाला " इत्यादि. ही हकीकत आज या खंडांत प्रथमच प्रसिद्ध होत आहे.

या खंडांतील पत्रांत आलेले सर्वच मुद्दे विस्तारानें सांगणें शक्य नाहीं. सबब येथवरच्या विवेचनांत न आलेल्या पत्रांतले कांहीं मुद्दे शेवटीं त्रोटक रीतीनें नमूद करतों.

ले. १ या वंशावळीचा लेखनकाल शके १६७५ च्या सुमाराचा आहे.

ले. २ यांतील अधिकाऱ्यांच्या भोगवट्यांचीं वर्षें स्थूलमानाचीं आहेत. बडा व धाकुटा असें दोघे हैबतखान पुणें व शिरवळ प्रांतांत मलिकंबराच्या वेळीं अंमलदार म्हणून वावरत होते.

ले. ३ क्रमाक्रमानें जमीनीचा सारा वाटविण्याची पद्धति निजामशाहींत होती.

ले. ४ शके १४९९ मध्यें अहमदनगरास निजामशाहीची राजधानी होती.

ले. ६ जमीन काढून घ्यावयाची ती हंगामानंतर घेत. दिवाळी म्हणजे मार्गशीर्ष शु. १

ले. ७ विठ्ठल कायदेवाच्या पूर्वजाकडे शिरवळचें देशकुलकर्ण निजामशाहीच्या प्रारंभापासून होतें.

ले. १२ मल्हारजी चिन आपाजी देशमुख श. १५३८ मध्यें मारला गेला.

ले. १९ या महजराची सबंध नक्कल करून छापखान्यांत दिली होती. आर्यभूषण छापखान्यास लागलेल्या आगींत पहिल्या बंदाखेरीज बाकीचे सर्व बंद जळून गेले.

ले. २१ शिरवळ परगण्यावरील अमलदारीची घालमेल ठरविण्यांचीं सर्व पत्रें जमेस धरलीं असतां असें ठरतें कीं निजामशाहीचा हा परगणा

श. १५३५–९ विजापूरकरांकडे सलाख्यानें दण्यांत आला होता.

श. १५३९–४२ सलोखा कायम राहून परगणा परत निजामशाहीकडे होता.

श. १५४२–४३ सलोखा कायम. परगणा विजापूरकराकडे. रायारावाची अमदानी.

श. १५४४ च्या प्रारंभीं सलोखा तुटून रायारावास घालवून देण्याचें काम शहाजीनें केलें.

ले. २४ जायणा लिंगरस हा श. १५५२ मध्यें शिरवळचा हवालदार होता. दिवटा मुसलमान शके १५४३ मध्यें हयात असावा असें ले. ३३ वरून दिसतें.

ले. २५ ' उटाणिया ' असें पृ. ४५ वर छापलें आहे. तें ' गुळणिया ' असें पाहिजे. या पत्रांत जगदेवराव निंबाळकराचा उल्लेख आहे.

ले. २६ व २७ बापूजी मुद्गल हा पुणें प्रांताचा हवालदार होता. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण तर्फ खेडेबारेचा देशपांडे. यानें दादाजी कोंडदेवाच्या मृत्यूनंतर कोंढाणा घेण्यास शिवरायास मदत केली. पाइस्तेखानाच्या स्वारींत गाजलेले चिमणाजी व दादाजी हे या बापूजीचे मुलगे.

ले. ३१. या पत्राचें महत्व पूर्वी सांगितलेंच आहे. १५७१ मध्यें पुरंदरचा किल्ला महादाजी नीळकंठराव यांजकडे असून त्याच्या सभोवारचा मुलूख शहाजीकडे होता व शहाजी आणि महादाजी यांचा स्नेह असे. यामुळें शिवाजी महाराजांना यावेळीं पुरंदरचा आश्रय करतां आला.

ले. ३७. श. १५७३ मध्यें कोंढाणा विजापूरकराकडे होता. शहाजीस बंधमुक्त करण्यापूर्वी तो आपणास मिळाला पाहिजे अशी विजापूरकरांनीं अट घातली होती.

ले. ३९. मोंगलांच्या गलबल्याचा उल्लेख यांत आहे. पत्राचा काल अनिश्चित.

ले. ४० या अस्सल पत्रावरून शहाजीस पुणें परगण्याचा मोकासा होता असें ठरतें. मोकासेदार हा वतनदाराप्रमाणें वंशपरंपरेचा अधिकारी नव्हता. त्याला केव्हांहि काढण्याचा हक्क विजापूरदरबारास होता. पुण्यावरील अंमलवारीचा क्रम असा दिसतो. प्रथम शहाजी, नंतर अफजलप्रसंगापर्यंत शिवशाही, पुढें मोगलाई आणि श. १५९२ मध्यें पुनः शिवशाही. ले. ५३ पहा.

ले. ४१ हा कागद अस्सल नव्हे मसूदा आहे; व त्यांत पृ. ६४ वर सुरुसन विसंगत आहे. पण हें पत्र स. प. पृ. ४४ व खं. २० ले. १८ यांशीं ताडून पाहिलें असतां सुप्याचा अंमलदारांचा क्रम याकुदखान, काटे, मंबाजी, असतखान, पुनः काटे, शहाजी व शिवाजी असा होता असें दिसतें.

ले. ४५ अफजलखान देशामुखांचीं कामें काय आहेत तें समजाऊन सांगतो.

ले. ४६ अफजल प्रसंगाचें पर्यवसान कदाचित सल्ल्यांत होईल व तहानें शिरवळ परगणा महाराजांकडे देण्यांत येईल असाहि एक संभव त्या वेळच्या लोकांना दिसत होता.

ले. ४७ भविष्य शब्दाचा अर्थ नीटसा समजत नाहीं. अफजलप्रसंगाची मिती यांत मार्गशीर्ष व ५ दिली आहे. तुळजापूर व पंढरपूरच्या मूर्ती हालवाव्या लागल्या यास खं. २० पृ. ३२९ मध्य आधार आहे.

ले. ५४ फ्रायर शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे वेळीं रायगडास गेला होता. त्याचा सर्व ग्रंथ शिवचरित्राच्या दृष्टीनें अभ्यसनीय आहे. दोन हत्ती व दोन घोडे रायगडावर आभिषेक प्रसंगीं नेलेले पाहून इतक्या अडचणीतून ते कसे नेले असतील याचें त्यास आश्चर्य वाटलें.

ले. ५५ शिरवळ परगण्यावर मोरोपंत पेशव्यांनीं शके १५९९ मध्यें १००० होन मिरासी पट्टी बसविली.

ले. ५९ कन्हा नदीच्या उगमापासून कन्हा-नीरा संगमापर्यंतच्या खोऱ्यास कन्हेपठार म्हणतात. या पठारावर तीघांचा अंमल चालत असे. ' तर्फ कन्हेपठार ' हा पुणेकर देशमूख देशपांड्याचा; ' पाा सुपे ' सुपेकरांचा; आणि ' कर्यात सासवड ' सासवडकरांचा.

ले. ६० सुपे खुर्द (थोरलें सुपें नव्हें) हा गांव सासवडच्या दक्षिणेस दोन मैलांवर आहे. तेथील पाटीलकीच्या वादासंबंधी लिहितांना शिवाजी महाराजांनीं " जैसे पालीची पाटीलकी काळभोराची असतां उगेच खराडियानें झोंडपण केलें; सेवट रवा काढून खोटें जाहाले, तैसच हे जगथाप करितातीं " असा दाखला दिला आहे. पालीच्या पाटीलकीचा महजर धुळ्याचे विद्वान् संशोधक रा. शंकराव देव यांनीं ' रामदास आणि रामदासी ' या मासिकांत छापलेला महशूरच आहे.

ले. ६७. ' वृत्त्यंशियाची वृत्ती वृत्तिवंतास द्यावी, ' ' वृत्तिवंताचें संस्थापन करणें हें स्वामीसहि अगत्य आहे ' वगैरे वाक्यांत दिसणारी शिवशाहीतली राजनीति वृत्तिच्छेदोत्सुक अशा आधुनिक धोरणाहून निराळी होती.

ले. ८७. व ९२ या पत्रांच्या नकला कै. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांच्या हातच्या सांपडल्या. अस्सल पत्रें कोठें आहेत तें समजलें नाहीं.

ले. ९०. अष्टप्रधानांच्या जागा वंशपरंपरेनें दिल्याबद्दलचे महाराजांच्या तोंडचे म्हणून उद्गार सभासदी बखरीच्या या प्रतींत दिले आहेत ते विचारणीय आहेत. संभाजी व राजाराम आणि ताराबाई यांच्या कारकीर्दीत अष्टप्रधानांची पदें बहुधा वंशपरंनें चालविलीं. वाकनीसाचें नांव पंताजी असें चुकून छापलें आहे.

ले. ९२. पुरंदरास नीळकंठरावाचे पूर्वज येण्यापूर्वी व आल्यानंतर देखील कोळी व महार यांचे प्राबल्य होतें. पेशवाईंत देखील पुरंदरच्या कोळ्यांचा दंगा बराच गाजला.

आभार—प्रस्तुत खंड छापण्याच्या व प्रस्तावना लिहिण्याच्या कामीं अनेक गृहस्थांनीं मदत दिली. प्रो. मा. त्रिं. पटवर्धन एम्. ए. यानीं फारशी शिलालेखांचे उच्चार व शब्दांचे अर्थ सांगितले; येथील ओरिएंटल बुकसप्लाइंग एजन्सीचे मालक डॉक्टर नरहर गोपाळ सरदेसाई यांनीं इंडो मॉस्लेमिकाचे अंक पाहण्यास दिले; सर्व्हेट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या संग्रहांतला फ्रायरचा ग्रंथ वाचण्यास मिळाला; व श्री. सरदार मेहेंधळे, प्रो. पोतदार व रा. दिवेकर यांनीं आपले खासगी ग्रंथसंग्रह पाहण्यास मोकळीक ठेवली याबद्दल या सर्वांचा मी फार आभारी आहे.

पुणें मि. अश्विन व. ११
शके १८४८.

दत्तात्रय विष्णु आपटे.

शिवचरित्र-साहित्य

खंड १ ला.

(शिरवळकर देशपांडे वगैरेंचे कागद)

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५३८
दा. वि.

शिरवळकर देशपांडे

यांचे कागदपत्र.

ले. १

श्री

वंशावळ निगडे देशमूख ग्रा॥ सिरवल

केन पाटील यासि पुत्र २

रामजी नाईक याचा पुत्र गोरखोजी याचा पुत्र गोरखोजी यास पुत्र मलजी याचा पुत्र आपाजी याचा पुत्र बहीरजी हाली आसे

आपाजी नाईक याचा पुत्र मल्हारजी याचा पुत्र मल्हारजी याचा पुत्र केदारजी याचा पुत्र मल्हारजी हाली आहे

कारकीर्द मलीकांबर आपाजीनें
मल्हारजी मारिला सु॥ सबा
आशर अलफ शके १५३९
पिंगलनाम संवत्सरे वर्षे १३७

कारकीर्द जसवंतराव सुरूरकर कुलकर्णी याचे दिव्य जाले त्याजवर साक्ष नाइकजी बीन आढलंराव गाढवे मोकदम मौजे खंडाले शके १५३४ परिधावी नाम सवछरे सु॥ सलास आशरीन आलफ यासी वर्षे सवत्छराने सवत्सर मनांत आणिता वर्षे सुमारी १४२

बावडेकर पाटील याचा महजर जाला शके १५४२ रौद्रनाम सवछरे तेथे साक्ष येमाजी पाटील गाढवे मौजे खडाले यास वर्षे सुमार १३४

कारकीर्द दादाजी कोडदेव पारगांवकर रिठ्यास महजर निमेचा दिल्हा तेथें साक्ष भिलोजी गाढवे मौजे खंडाले याची साक्ष असे तो महजर सु॥ इसने आर्बैन या सालचा असे यास वर्ष ११२ याप्रमाणें जिजाजी पाटील निमे मौजे पारगांव याची आर्जदास्त असे

---

१ आशर पाहिजे

ले. २ श्री

श्री शके १३१८ धातानाम संवत्छरे सु॥ सबा तिसैन मया सबयेन सन ८०६ या सालांत कन्हाड क्षेत्रीं दुर्गादेवी रुदन करूं लागली त्यानंतर शके १३३० सर्वधारी नाम संवत्छरे सु॥ तिसा मैया समानेन ८१८ परियंत वर्ष १२ प्रिथीवीवर दुष्काल पडला सारट चारण करू जागा जागा उठले ते इा पासून शके १३६० कालयुक्त नाम संवत्छरे सु॥ तिसा सलासीन मैया समानेन सन ८४८ परियेत वर्ष ३० तीस चारण करू याची राव होती राज्यात बेबदी जाहली औसे समजले शके १३६१ सिधार्थी नाम सवत्छरे सु॥ आबैन मया समानेन सन ८४९ या सालात बेदरचा आदील पातशाह याने राजश्री दादा नरसिह रवाना करून पराडीयाचा किला बाधिला आणि मुलखाची चकबंदी व्हावी याजकरिता काला खोजा व गोरा खोजा पा॥ माहल परगणे व सिवा व सिवधडे उजरून आदीलशाई बिघे करून शंभर बिघेयाचा चाहूर येक यापमाणे रकमले बांधून मुलखाची टकबदी करविली त्यानंतर चौ ठाई च्यार सुभे रवाना केले विज्यापुरी कुतबशाह व भागानगरी निज्यामशाह व देवगिरीस दौलतशाह व आमदाबाज गुजराथ या प्रांती मिरजुमशाह या प्रो च्यार सुभे चौंठाई पाठऊन राज्याचा बदोबस्त शके १३६८ क्षये नाम सवत्छरे सु॥ सबा आबैन मैया समानेन सन ८५६ या साली केला आणि जागा जागा ठाणी बसऊन किले कोट बांधून बदोबस्त करावे म्हणून हुकूम जाला त्याजवरून भागानगरी निज्यामशाह होते त्यानी आदीलखान रवाना करून शके १३८३ वृषा-नाम सवत्छरे सु॥ इसने सितैन मया समानेन सन ८७१ या सालात सिरवल प्राती ठाणे बसविले त्यानंतर नवा वर्षांनी शके १३९२ विकती नाम सवत्छरे सु॥ ईहीदे सबैन मया समानेन सन ८८० या सालात नीरे नजीक चित्रबेट टेकाड पाहन सुमा-मंगल नाव ठेऊन कोटास काम लाविले तो कारखाना इ॥ पासून शके १४३७ युवा नाम सवत्छरे सु॥ सीत आशर मया तिसैन सन ९२५ परियेत काम कोटाचे चालून कोट तयार केला नंतर भागानगराहून प्रथम सुभा रवाना जाहला

२२ महमद इसलामखान याने आपले लोक शके १४३८ धाता नाम सवत्छरे सु॥ सबा आशेर मैया तिसेन सन ९२६ इ॥ पासून शके १४५९ हेमलबी नाम सवछरे सु॥ समान सलासीन मैया तिसेन सन ९४७ परयंत वर्ष २२ आमल केला कलम १

२६ वली महमदखान याने शके १४६० विलंबीनाम सवत्छरे सु॥ तिसा सला-सीन मैया तिसेन सन ९४८ इ॥ पासून शके १४८६ रक्ताक्षीनाम सवत्छरे सु॥ खमस सितैन मया तिसैन सन ९१४ पर्यंत वर्षे २६ सवीस आमल केला कलम १

७ शाह महमद याने शके १४८७ क्रोधी नाम संवत्छरे सु॥ सति सितैन

मैया तिसैन सन ९७५ इा पासून शके १४९३ प्रज्यापती नाम संवत्छरे सुा इहदे सबैन मैया तिसेन सन ९८१ पर्यंत वर्ष ७ आमल केला कलम १

१८ बहादूरखान याने शके १४९४ आगिरानाम संवत्छरे सुा सलास सबैन मया तिसैन सन ९८२ इा पासून शके १५११ विरोधक्रत नाम सवत्छरे सुा तिसैन मया तिसैन सन ९९९ पर्यंत वर्ष १८ आमल केला कलम १

१४ शामीरखान याने शके १५१२ विकृतीनाम सवत्छरे सुा इहदे तिसैन मैया तिसैन सन १००० इा पासून शके १५२५ शोभक्रत नाम सवत्छरे सुा आर्बा आलफ सन १०१३ पर्यंत वर्ष १४ आमल केला कलम १

१८ हैबतखान याने शके १५२६ क्रोधन नाम सवत्छरे सुा खमस आलफ सन १०१४ इा पासून शके १५४३ दुरमतीनाम सवत्छरे सुा इसने आशरीन आलफ सन १०३१ पर्यंत वर्षे १८ आमल केला कलम

१५ दाऊदखान याने शके १५४४ दुदुभी नाम सवत्छरे सुा सलास आशरीन आलफ सन १०३२ इा पासून शके १५५८ धाता नाम सवत्छरे सुा सबा सलासीन आलफ सन १०४६ पर्यंत वर्षे १५ आमल केला कलम १

४३ न्याहरखान याचे मारफतीने आमलदार येऊन जाऊन आमल शके १५६९ ईश्वर नाम सवत्छरे सुा समान सलासीन आलफ सन १०४७ इा पासून शके १६०२ रौद्रनाम सवत्छरे सुा इहिदे समानेन आलफ सन १०९० परियंत वर्ष ४३ आमल होण्याचे आमदानीत शके १५९६ आनद नाम सवत्छरे सुा खमस सबैन आलफ सन १०८४ जेष्ट शुा ५ पंचमीस माहाराज सिवाजी राजे भोसले याजला पटा आभिषेक राज्याचा रायेगडी होऊन जागा जागा ठाणा बसविली परंतु सिरवली ठाणे बसले नाही कलम

१५ इब्रामखान याने शके १६०३ दुर्मती नाम सवत्छरे सुा इसने समानैन आलफ सन १०९१ इा पासून शके १६१७ युवानाम सवत्छरे सुा सति तिसैन आलफ सन ११०५ पर्यंत वर्ष १५ आमल केला कलम

२ इसलाईम मैया याने शके १६१८ धाता नाम सवत्छरे सुा सबा तिसैन आलफ सन ११०६ इा पासून शके १६१९ ईश्वरनाम सवत्छरे सुा समान तिसैन आलफ सन ११०७ पर्यंत वर्ष २ दोन आमल केला कलम

३ खोजेखान याने शके १६२० बहुधान्य नाम सवत्छरे सुा तिसा तिसैन आलफ सन ११०८ इा पासून शके १६२२ विक्रम नाम सवत्छरे सुा इहीदे मया आलफ सन १११० पर्यंत वर्ष ३ आमल केला कलम

१ का र ही ब र्द खान याने शके १६२३ वृषानाम सवत्छरे सुा इसने मया आलफ सन १११९ इा पासून आखेर सालपर्यंत यक साल आमल केला

२ यासीनखान याने शके १६२४ चित्रभानूं नाम सवत्छरे सु॥ सलास मैया आलफ सन १११२ इ॥ पासून शके १६२५ सुभानू नाम सवत्छरे सु॥ आर्बा मैया आलफ सन १११३ पर्यंत वर्षे २ दोन आमल केला कलम

३ लोधीखान याने शके १६२६ तारण नाम सवत्छरे सु॥ खमस मैया आलफ सन १११४ इ॥ पासून शके १६२८ व्ययेनाम संवत्छरे सु॥ सबा मैया आलफ सन १११६ पर्यंत वर्षे ३ आमल केला कलम


४ आसनिखान याने शके १६२९ सर्वजीत नाम सवत्छरे सु॥ समान मैया आलफ सन १११७ इ॥ पासून शके १६३२ विक्रती नाम सवत्छरे सु॥ इहीदे आशर मैया आलफ सन ११२० पर्यंत वर्षे ४ आमल केला कलम

१० जानोजी नाईक निंबालकर कर्मालकर यानी शके १६३३ खरनाम सवत्छरे सु॥ इसने आशर मैया आलफ सन ११२१ इ॥ पासून शके १६३२ विकारीनाम सवत्छरे सु॥ आशेरीन मैया आलफ सन ११२८ पर्यंत वर्षे १० आमल केला कलम

३१ महाराज शिवाजी राजे भोसले याचे नातू शाहूजी राजे याजकडील बालाजी विश्वनाथ पतप्रधान यानी निंबालकर याचे ठाणे उठऊन कोट पाडिला आणि आपले ठाणे वसविले शके १६४२ विकारीनाम सवत्छरे सु॥ इहीदे आशेरीन मैया आलफ सन ११२९ इ॥ पासून शके १६७२ प्रमादनाम सवत्छरे सु॥ इहीदे खमसैन मैया आलफ सन ११६० पर्यंत वर्ष ३१ आमल केला कलम

त्यानंतर नारो शकर सचीव यानी पतप्रधान याजला सिंहगड देऊन त्याचा मोबदला आपल्याकडेस सिर्वलचे ठाणे घेऊन आपले ठाणे वसविले शके १६७३ प्रज्यापतीनाम सवत्छरे सु॥ इसने खमसैन मैया आलफ सन ११६१

ले. २



शके १४८३ आश्विन शु॥ ११

ई कौलूनामे अज दिवाण ठाणे पा॥ सिरवल ताहा लखमोजी व बालो प्रज मुजेरी कसबे सिरवल पा॥ मजकूर सु॥ सन इसने सितैन व तिसा मया कारणे दादे

कौलूनामा दिला यैसा तु ..... मल्हारजी व आपाजी देस ..... मालूम केले यैसेजे सेत जान ..... तल्या नजीक बहूत दीस पडिले + + बिघे ·न तीस बराये कीर्दी सन सलासा कारणे नफर मजकुरास इ॥ मु॥ ४ चौ साला देणे बि॥ ता॥

पहिले साल सन सलास		सन आर्बा	
नख्त	गला दे॥	नख्त	गलादे॥
·॥ ६ तालुक देहाये	जिनसी ना	१।· ता॥ देहाये	जिनसी
·॥ ता॥ ठाणे	८२॥	१८ता॥ ठाणे	·।·
	गवत	२।	गवत
	२५		५०

सन खमस		सन सीत	
नख्त ता॥ देहाये	गला	नख्त	गला
व तालुक ठाणे	·।=॥	२॥ ता॥ देहाये	·॥·
३·६	गवत	२८ ता॥ ठाणे	जोरी गहू
	७५	४॥	·।३॥ ८१
			चणे तील
			१ +
			गवत कापूस
			१०० ·।१

यैसा कौलू सादर जाहालिया तकवा धरूनू सेत वाहील मालूम जाहाले बराये मालुमाती खातिरेसी आणोउनू कौलनामा सादरि केला आसे कवणे च्यादे तालुक आदेसा न कीजे कीर्दी मामुरी करूनु सुखे आसीजे सदरहू प्रमाणें पालुनू जाणिजे तेरीख ९ माहे मोहरम.

ले. ४

शके १४९९ आषाढ शु॥ ९

तालीक (तत्कालीन)

अज दिवाण रख्तखाने खास बजानेब कारकुनानी व मुकासाइयान हाल व इस्तकबाल व देसमुखानी व मोकदमानी व माहाजनानी व सेटियानी पा॥ सिरवल बिदानंद मु॥ समान सबैन तिसा मया सवदरगे च दे ऊ हुजुरु बधगी हजरती मालूम केले जे कसबा सिवरळीचे जोतीसपण आपली आपले वडीलवडीलाची मिरासी आपला चुलता बळाल जोशी आ रा ध्या (?) चालविता गहदम सालाबाद

चालिले आसे दरम्यान रास जोसी मांडका हा जोतीसपणाचा करकसा करितो म्हणौउनु बलाल जोसी व रास जोसी साहार आहामदानगरास मुनसीफीसं आले साहार मजकुरी सेटिये महाजण समस्ते बैसोनु मुनसफी केली आपणास आपणास व रास जोसी यांस गोही आणविलें व रास जोसी याचीया हुजती पाहिलिया त्या खोटिया म्हणौउनु बोलिले व आपण शिरवलास जाऊनु गोही घेऊनु आलो तिही गोही दीधली जे रास जोसी याच्या पूर्वजापूर्वी बलाल जोशी याचे पूर्वजा [ची] मिरासी होये म्हणौउनु गोही दीधलि रास जोसी गोही नाणोच खोटा जाला पलोनु गेला यावरी समस्त लोकी जयेपत्र आपणास लिहुनु दीधले थे बाबे फर्मान होये मालूम जाहाले बा्ा इस्यारती दिवाणआला हर दो नफराची मानसुफी साहार आहामदानगरी जाहाली जे बलाल जोसी याची मिरासी जोतीसपण होये रास जोसी खोटा जाहाला मग पलोनु गेला तेथे जोतीसपण बलाल जोसी मजकुराची मिरासी याचे दुबाला कीजे रास जोसी हरकत न करी व जोसी जमानती करुनु सोडी जे दणे बाबत सारा उजूर न करिजे तालीक लिहोनु घेउनु असेल फिराउनु दीजे मोर्तबु तेरीख ७ माहे जमादिलाखर पा्ा खा्ा जाबीतखा असेल दफतर बार आसे

ले. ५ शके १५११

(फारशी गोल सिका)

ई कौळनामा आज दिवाण ठाणे परगणे सीरवल ता्ा बाजी कदम व प्रजा मौजे कविठे मा्ा मजकूर सु्ा तिसैन व तिसा मया बराये कीर्द सन इहिदे दादे कौळना- [मा] दीधला यैसा तुमचे बाबे मळ्हारजी व मोरखो + + + + + + मा्ा हुजूर येऊन इळतमेसी केला पेसजीचे फितरती व आफत करिता [पा्ा म] जकूर बहुत दिवस खराब पडिले आहे यै..... [शास] कौळ दिधलिया प्रज कुल मेलऊ। पांढरिवरी राहून मौजे मजकुरी कीर्द करील यैसा कौल

नरुतयाती तालुक ठाणे व	गाव हुडा जकाती आज
तालुक देहाये बाबा मौजे	रकमेसी इा्ा मु्ा चौ
मजकुरीची आज रकम	साळा

	पाहिले साली	दुसर साली
का.....जे असेल ते मौजे म-	ता न ही	निमे ग
जकुरिचे खाली मं जं मी	+ + +	⊥ ⊥ ⊥

(पुढें कागद फाटला आहे)

ले. ६ श्री शके १५३२ आषाढ व॥ २

छ ६ ई तोकाने राजश्री आपाजि फर्जद मल्हारजी देसमुख व तुकाईजी देसमुखे

शिक्का अस्पष्ट

प॥ सिरवल व मोकदम कसबे मजकूर ताा विठल कायेदेऊ देसकुलकरणी प॥ माार व वहीत जमीन कसबे मजकूर सु ॥ सन इहीदे आशर आलफ कारणे दत कौलू नामा दिल्हा यैसा जे तुमचे बाबे बाऊजी आर्डा आजहती मोकदम व चौगुले गणबा मायेगुडा व दाकोजी कावला व +ऊजी साबला कसबे मजकूर येऊनु सागितले जे सेत नजीक × × × खालील विठोबाची मिरासी आहे विठोबा कटकास गेला यावरी मागे किर्दी बदल गोमाजी ढमाल त्याचे हवाला केले होते आता ते गावास आले आहेती आम्हास म्हणताती जे आपले सेत मिरासीचे जमीन चावर १॥ गोमाजी मजकुरास खुषी करूनू आपणच करीन यावरी आम्हि त्यासी बोलिलो आता पेरणीचा हगाम आला आहे पेरणी करून देणे सन इसनेचे पीक घेऊनू दिवाली पासूनू तुमचे सेत तुम्ही करणे हे विठोबे कबूल करूनू निरोप दिल्हा आता सन इसने दिवाली पासून बिजाहाती किर्दीस सन सलास आशर आलफ कारणे गोमाजीस दुरी करूनू विठल कायेदेऊ यास सेत दिल्हीया किर्दी करील मनास आणौऊनू कौलूनामा सादर केला आसे गोमाजी ढमाल दुरी केला आसे तुझे सेत तुमचे दुमाला केले आसे

दिवाण निसबती नि॥ माहार	निसबेती दिवाण नख्त टके १७
नख्त टके १० गला खडी २	गला दोनी साजेती

हे देऊनू या खेरीज बाजे पटी बदल मुशाहिरा निसबेती मुजेरी देसकुलकरणाचा पेसजी प्रमाणे तुमचे दुमाला केली होती तेणेच प्रमाणे पुढेही दुमाल केले आसे येणे कौल किर्दी करूनू सुखी आसणे कोण्हेया बाबे तालुक आदेशा न करणे हा कौलू सही तेरीख १५ माहे जमादिलाखर

ले. ७ शके १५३५ कार्तिक शु॥ २

हैबतखान

तालीक

छ कौलुनामा अज रख्तखाने खुदायेवंद खाने अलीशान रफिअलकदर वलमकान साहेब खुली दयामदौलतहु यां विठल कांइदेउ देसकुलकर्णी पा॥ सिरवल सुा॥ सन आर्बा आशर आलफ दादे कौलनामा यैसा जे तुझे मिरासीवरी दरीवख्त रुद्राजी दामोधर लंबा उभा राहिला होता त्याबद्दल तुज तलब करुनु अणविले तुझे व त्याचे बरहक मुनासिफी खातिरेसी आणिता रुद्राजी मजकूर मिरासी नव्हे भोगवटा नाही लायनि गरगसा करूं लागला यावरी हमशाहि माहाल पा॥ पुणा वा

पा॥ वांई व काा सासवड वा तपे गुजाणमाऊल हे विलायेतीचे देसमुख वा देसक गोही दिल्हे जे रुद्रजि मजकूर मिरासी नव्हे यासि संमध नाहीं पाा मजकूरचे देसकुलकर्णी विठल कांइदेऊ याचे मिरासी होये पिडी दर पिडी चाळिविले आहे हजरत निजामशाहाचे राजतागायेत यांचे मिरासी होये यैसे समस्त लोकानी गोही दिल्हे यावरी रुद्रो मजकूर खोटा लायेनी करकसा करितो म्हणौनु बाहीर घातल आतां तुझे मिरासी पाा मजकू [र] चे देसकुलकर्णीगी तुझे दुबाला करूनु तुज माहाजर करूनु दिल्हे असे तुवा कोणे विसी कांहीं तालुक ा देशा न करिता पाा मजकुरीचे आपुले मिरासी देसकुलकर्णगी चाळऊनु दिवाण नफराई वा हलालखोरी करूनु सुखे आसिजे हे कौल सही

लरीख १ माहे रमजान

ल. ८ शके १५४२

तालीक

छ कौलुनामे राजश्री आपाजी फर्जंद मल्हारजी देसमुख व तुकाई देसमुखीण पाां सिरवल तांहा विठल काायेदेउ देसकुलकर्णी पाा माा सुा इहिदे इसरिन आलफ कारणे दादे कौलुनामा यैसाजे तुझे देसकुलकरणंकीची मिरासीवरी हैबतखानाचे कारकीर्दीस दर मोकाम लस्कर खडकी मधे लंबे पैकियाच्या बले उभे राहिले होते त्याचे व तुमचे निवाडा मुनसिफी मलीक अजम व हैबतखान करुनु लबियासी दुरी केले त्यावरी आा .....प मल्हारजीस आपाजीने मारिले हे करकरेचे दुई बदल तुह्मी हुजूर कटकासी गेलेसी मागे दरम्यान लंबे पाा मजकुरी पैदा होउनु दर खु र ले यावरी तुम्ही दिवाणीचा फर्मान व मलिक अजमाच्या किताबती घेउनु पाा मजकुरासी आलेसी त्यावरी विलायेतीच्या मोकदम व तमाम देसक सेटिये माहाजन व बारा बलुते व समस्त मिरासी लोक पाा मजकुरीचे व हमशाही विलायेतीचे मेलउन ते बोलिले जे विठल काइदेउ याची मिरासी देसकुलकर्णकी व गावकुलकर्ण पाा मजकूर पिढी दरपढी चालिले असे आजी तागाईत खादले यैसे खलकासी ठाउके असे याचे हाते कुलकर्णकीचा कारबार घेत जाईजे लंबे गैर-मिरासी आहेती यासी विलतीमधुनु बाहीर घालवणे म्हणौनु बोलिले त्यावरी मनास आणिता लंबे गैरामिरासी यैसे जाहाले हे खातिरेसी आणुन अम्ही व खल खुला मिलोन लंबीयासी बाहीर घातले असे आता तुवा आपली मिरासी देसकुलकर्णकी पाा माा व गावकुलकर्णे चालउन आपले मुशाहिरा व हक लाजिमा देसकुलकर्णकीचे सालाबादप्रमाणे खाउनु आपले सेत व मले करून असीजे कांहीं चिंता न कीजे काही चिंता न कीजे हे आमला कौलु इमान सती असे यासी जो कोणी इसकील करील व इमानासी चुकेल त्यासी देवाची आण असे व आपल्या वडीलाच्या बेतालिसाचे इमान साक्ष व आपले इमान सती असे हा कौलु सही

ले. ९ १५३२ श्रावण व. १३ तालीक

माहजर बितेरीख २६ माहे जमादिलोवल हजीर मजालसी पाो सिरवल

काजी सेखन हकीम सेरा पाा मजकूर
नरसो लाहामाजी मजूमदार पाा मजकूर
मल्हारजी बिन आपाजी व अपाजी बिन गोरखोजी देसमूख पाा मजकूर

जसवंतराऊ नेब गैबत पाा मजकूर
निलो देउजी मुशरीफ पाा मजकूर
विठल कायेदेऊ देसकुलकर्णी पाा मजकूर

(या खालीं सेटिये, हसम, नाईक, चाकर ठाणे परगणे मजकूर, चौगुला, चौधरी वगैरेंचीं नावें व ' मोकदम कर्यांती परगणे मजकूर ' या मथळ्याखालीं अहिरे, पाडळी, भादे, पलसी, नाहावी, वडगाव, भादवडे, मांडकी वगैरे १३ गांवच्या मोकदमांचीं नांवें आहेत.)

सुा इहिदे असर अलफ श्रीसके १५३२ साधारण संवत्सरे श्रावण वदि त्रयोदशी मगलवार जाहाला महजर यैसां जें मौजे भोगवली पाा माार तेथील कुलकर्णा. बंदल विसाजी बिन नारोबा म्हसवडा व नागोजी बिन कोंडभट पटवर्धन जोसी मौ मजकूर यांस करकसा होता साल मजकुरी आग्रवादी विसाजी बिन नारोबा मसवडा व पछमवादी नागोजी बिन कोंडभट पटवर्धन उभे राहोनु वेव्हार भाविला जे बितपसलि

विसाजी बिन नारोबा मसवडा अग्रवादी येणे वेव्हार भाविला जें मौजे भोगवली पाा मजकूर तेथील कुलकर्ण आपलीया वडिलाची मिरासी आपण खात होतो हाली वणगोजी निबालकर पुंड पा मजकूर मुकासा खात होते त्यावरी नामजादिया जालीया ते फितरतीमधे आपाजी देसमुख मोकदम मौजे मजकूर गाव सोडुनु बाहेर गेले त्याबराबर आपण गेलो मागे नागोजी बिन कोडभट पटवर्धन जोसी मौजे मजकूर कुलकर्ण चालऊ लागला तरी नागोजी जोसी मजकुरासी कुलकर्णासी समधु नाही याच्या वडिलापूर्वी आपलिया वडिलाचा भोगवटा मिरासी मौजे मजकूरचे कुलकर्ण हे उतर सत्य दिवी रवा साधीन

नागोजी बिन कोडभट पटवर्धन जोसी मौजे मजकूर पसमवादी येणे वेव्हार भाविला जे मौजे भोगवली पाा मजकूर तेथील कुलकर्ण आपली मिरासी विसाजी बिन नारोवा मसवडा आपलिया वडिलाचा ठेवणाईत कुलकर्ण आपली मिरासी होये हे उतर सत्य

चालिले आसे दरम्यान रास जोसी मांडका हा जोतीसपणाचा करकसा करितो म्हणौउनु बलाल जोसी व रास जोसी साहार आहामदानगरास मुनसीफीस आले साहार मजकुरी सेटिये महाजण समस्ते बैसोनु मुनसफी केली आपणास आपणास व रास जोसी यांस गोही आणविले व रास जोसी याचीया हुजती पाहिलिया त्या खोटिया म्हणौउनु बोलिले व आपण शिरवलास जाऊनु गोही घेऊनु आलो तिही गोही दीधली जे रास जोसी याच्या पूर्वजापूर्वी बलाल जोशी याचे पूर्वजा [ची] मिरासी होये म्हणौउनु गोही दीधलि रास जोसी गोही नाणोच खोटा जाला पलोनु गेला यावरी समस्त लोकी जयेपत्र आपणास लिहुनु दीधले ये बाबे फर्मान होये मालूम जाहाले बा इस्यारती दिवाणआला हर दो नफराची मानसुफी साहार आहामदानगरी जाहाली जे बलाल जोसी याची मिरासी जोतीसपण होये रास जोसी खोटा जाहाला मग पलोनु गेला तेथे जोतीसपण बलाल जोसी मजकुराची मिरासी याचे दुबाला कीजे रास जोसी हरकत न करी व जोसी जमानती करुनु सोडी जे दणे बाबत सारा उजूर न करिजे तालीक लिहोनु घेउनु असेल फिराउनु दीजे मोर्तबु तेरीख ७ माहे जमादिलाखर पा खा जाबीतखा असेल दफतर बार आसे

लेे. ५ शके १५११

(फारशी गोल सिका)

ई कौळनामा आज दिवाण ठाणे परगणे सीरवळ ता बाजी कदम व प्रजा मौजे कविठे मा मजकूर सुा तिसैन व तिसा मया बराये कीर्द सन इहिदे दादे कौळना- [मा] दीधला यैसा तुमचे बाबे मळ्हारजी व मोरखो + + + + + + मा हुजूर येऊन इळतमेसी केला पेसजीचे फितरती व आफत करिता [पा म] जकूर बहुत दिवस सराब पडिले आहे यै..... [शास] कौळ दिधलिया प्रज कुल मेलऊन पांढरीवरी राहून मौजे मजकुरी कीर्द करील यैसा कौल

नरुतयाती तालुक ठाणे व तालुक देहाये बाबा मौजे मजकुरीची आज रकम का.....जे असेल ते मौजे मजकुरीचे खाली म ज मी

गाव हुडा जकाती आज रकमेसी हा मा चौ साला

पाहिले साली	दुसर साली
ता न ही	निमे ग
+ + +	+ + +

(पुढें कागद फाटला आहे)

ले. ६ श्री शके १५३२ आषाढ व॥ २

छ ३ कौलनामे राजश्री आपाजि फर्जंद मल्हारजी देसमुख व तुकाईजी देसमुखे

शिक्का अस्पष्ट

प॥ सिरवल व मोकदम कसबे मजकूर ताा विठल कायेदेऊ देसकुलकरणी प॥ माार व वहीत जमीन कसबे मजकूर सु ॥ सन इहीदे आशर आलफ कारणे दत कौलूनामा दिल्हा यैसा जे तुमचे बाबे बाऊजी आर्डा आजहती मोकदम व चौगुले गणबा मायेगुडा व दाकोजी कावला व +ऊजी साबला कसबे मजकूर येऊनु सागितले जे सेत नजीक × × × खालील विठोबाची मिरासी आहे विठोबा कटकास गेला यावरी मागे किर्दी बदल गोमाजी ढमाल त्याचे हवाला केले होते आता ते गावास आले आहेती आम्हास म्हणताती जे आपले सेत मिरासीचे जमीन चावर १॥ गोमाजी मजकुरास खुषी करूनू आपणच करीन यावरी आम्हि त्यासी बोलिलो आता पेरणीचा हगाम आला आहे पेरणी करून देणे सन इसनेचे पीक घेऊनू दिवाली पासूनू तुमचे सेत तुम्ही करणे हे विठोबे कबूल करूनू निरोप दिल्हा आता सन इसने दिवाली पासून बिजाहाती किर्दीस सन सलास आशर आलफ कारणे गोमाजीस दुरी करूनू विठल कायेदेऊ यास सेत दिल्हीया किर्दी करिल मनास आणौऊनू कौलूनामा सादर केला आसे गोमाजी ढमाल दुरी केला आसे तुझे सेत तुमचे दुमाला केले आसे

दिवाण निसबती नि॥ माहार	निसबेती दिवाण नख्त टके १७
नख्त टके १० गला खडी २	गला दोनी साजेती

हे देऊनू या खेरीज वाजे पटी बदल मुशाहिरा निसबेती मुजेरी देसकुलकरणाचा पेसजी प्रमाणे तुमचे दुमाला केली होती तेणेच प्रमाणे पुढेही दुमाल केले आसे येणे कौल किर्दी करूनू सुखी आसणे कोण्हेया बाबे तालुक आदेशा न करणे हा कौलू सही तेरीख १५ माहे जमादिलाखर

ले. ७ शके १५३५ कार्तिक शु॥ २

हैबतखान

तालीक

छ कौलुनामा अज रख्तखाने खुदायेवंद खाने अलीशान रफिअलकदर वलमकान साहेब खुली दयामदौलतहु ताां विठल कांइदेउ देसकुलकर्णी पा॥ सिरवल सु॥ सन आर्बा आशर आलफ दादे कौलनामा यैसा जे तुझे मिरासीवरी दरीवख्त रुद्राजी दामोधर लंबा उभा राहिला होता त्याबद्दल तुज तलब करुनु अणविले तुझे व त्याचे बरहक मुनासिफी खातिरेसी आणिता रुद्राजी मजकूर मिरासी नव्हे भोगवटा नाही लायनि गरगसा करूं लागला यावरी हमशाहि माहाल पा॥ पुणा वा

प॥ वांई व काा सासवड वा तपे गुजाणमाऊल हे विलायेतीचे देसमुख वा देसक गोही दिल्हे जे रुद्रजि मजकूर मिरासी नव्हे यासि संमध नाहीं पाा मजकूरचे देसकुलकर्णी विठल कांइदेऊ याचे मिरासी होये पिडी दर पिडी चालिविले आहे हजरत निजामशाहाचे राजतागायेत यांचे मिरासी होये यैसे समस्त लोकानी गोही दिल्हे यावरी रुद्रो मजकूर खोटा लायेनी करकसा करितो म्हणौनु बाहीर घातल आतां तुझे मिरासी पाा मजकू [र] चे देसकुलकर्णीगी तुझे दुबाला करूनु तुज माहाजर करूनु दिल्हे असे तुवा कोणे विखी कांहीं तालुक अदेशा न करिता पाा मजकुरीचे आपुले मिरासी देसकुलकर्णगी चाळऊनु दिवाण नफराई वा हलालखोरी करूनु सुखे आसिजे हे कौल सही

तरीख १ माहे रमजान

ले. ८ शके १५४२

तालाक

छ कौलुनामे राजश्री आपाजी फर्जद मल्हारजी देसमुख व तुकाई देसमुखीण पाा सिरवल तांहा विठल कायेदेउ देसकुलकर्णी पाा माा सुा इहिदे इसरीन आलफ कारणे दादे कौलुनामा यैसाजे तुझे देसकुलकरणंकीची मिरासीवरी हैबतखानाचे कारकीर्दीस दर मोकाम लस्कर खडकी मधे लंबे पैकियाच्या बले उभे राहिले होते त्याचे व तुमचे निवाडा मुनासिफी मलीक अजम व हैबतखान करुनु लबियासी दुरी केले त्यावरी आा .....प मल्हारजीस आपाजीने मारिले हे करकरेचे दुई बदल तुह्मी हुजूर कटकासी गेलेसी मागे दरम्यान लंबे पाा मजकुरी पैदा होउनु दर खु र ले यावरी तुम्ही दिवाणीचा फर्मान व मलिक अजमाच्या किताबती घेउनु पाा मजकुरासी आलेसी त्यावरी विलायेतीच्या मोकदम व तमाम देसक सेटिये माहाजन व बारा बलुते व समस्त मिरासी लोक पाा मजकुरीचे व हमशाही विलायेतीचे मेलउन ते बोलिले जे विठल काइदेउ याची मिरासी देसकुलकर्णकी व गावकुलकर्ण पाा मजकूर पिढी दरपढी चालिले असे आजी तागाईत खादले यैसे खलकासी ठाउके असे याचे हाते कुलकर्णकीचा कारबार घेत जाईजे लंबे गैर-मिरासी आहेती यासी विलतीमधुनु बाहीर घालवणे म्हणौनु बोलिले त्यावरी मनास आणिता लंबे गैरमिरासी यैसे जाहाले हे खातिरेसी आणुन अम्ही व खल खुला मि-लोन लंबीयासी बाहीर घातले असे आता तुवा आपली मिरासी देसकुलकर्णकी पाा मा व गावकुलकर्णे चालउन आपले मुशाहिरा व हक लाजिमा देसकुलकर्णेकीचे सालाबादप्रमाणे खाउनु आपले सेत व मले करून असीजे कांहीं चिंता न कीजे काही चिंता न कीजे हे आपला कौलु इमान सती असे यासी जो कोणी इसकील करील व इमानासी चुकेल त्यासी देवाची आण असे व आपल्या वडीलाच्या बेता-लिसाचे इमान साक्ष व आपले इमान सती असे हा कौलु सही

ले. १ १५३२ श्रावण व. १३ तालीक

माहजर चितेरीख २६ माहे जमादिलोवल हजीर मजालसी पाो सिरवल

काजी सेखन हकीम सेरा पाा मजकूर
नरसो लाहामाजी मजूमदार पाा मजकूर
मल्हारजी चिन आपाजी व अपांजी चिन गोरखोजी देसमूख पाा मजकूर
जसवंतराऊ नेब गैबत पाा मजकूर
निलो देउजी मुशरीफ पाा मजकूर
विठल कायेदेऊ देसकुलकर्णी पाा मजकूर

(या खालीं सेटिये, हसम, नाईक, चाकर ठाणे परगणे मजकूर, चौगुला, चौधरी वगैरेंचीं नावें व ' मोकदम कर्याती परगणे मजकूर ' या मथळ्याखालीं अहिरे, पाडळी, भादे, पलसी, नाहावी, वडगाव, भादवडे, मांडकी वगैरे १३ गांवच्या मोकदमांचीं नांवें आहेत.)

सुा इहिदे असर अलफ श्रीसके १५३२ साधारण संवत्सरे श्रावण वदि त्रयोदशी मगलवार जाहाला महजर यैसां जें मौजे भोगवली पाा माार तेथील कुलकर्णा· बंदल विसाजी बिन नारोबा म्हसवडा व नागोजी बिन कोंडभट पटवर्धन जोसी मौ मजकूर यांस करकसा होता साल मजकुरी आग्रवादी विसाजी बिन नारोबा मसवडा व पछमवादी नागोजी बिन कोंडभट पटवर्धन उभे राहोनु वेव्हार भाविला जे बितपसलि

विसाजी बिन नारोबा मसवडा अग्रवादी येणे वेव्हार भाविला जें मौजे भोगवली पाा मजकूर तेथील कुलकर्ण आपलीया वडिलाची मिरासी आपण खात होतो हाली वणगोजी निबालकर पुंड पाा मजकूर मुकासा खात होते त्यावरी नामजादिया जालीया ते फितरतीमधे आपाजी देसमुख मोकदम मौजे मजकूर गाव सोडुनु बाहेर गेले त्याचवराबर आपण गेलो मागे नागोजी बिन कोडभट पटवर्धन जोसी मौजे मजकूर कुलकर्ण चालऊ लागला तरी नागोजी जोसी मजकुरासी कुलकर्णासी समधु नाही याच्या वडिलापूर्वी आपलिया वडिलाचा भोगवटा मिरासी मौजे मजकूरचे कुलकर्ण हे उतर सत्य दिवी रवा साधीन

नागोजी बिन कोडभट पटवर्धन जोसी मौजे मजकूर पसमवादी येणे वेव्हार भाविला जे मौजे भोगवली पाा मजकूर तेथील कुलकर्ण आपली मिरासी विसाजी बिन नारोवा मसवडा आपलिया वडिलाचा ठेवणाईत कुलकर्ण आपली मिरासी होये हे उतर सत्य

यावरी राजमुद्रा बोलिले जे सदरहु तकरीरा उभे वर्गी लेहुनु दिधलिया आहेत हा अमल कैसा आहे म्हणौन साहेबी समेस पुसिले यावरी समस्त सभा बोलिले जे दोधे वेवादी साहेबापासी उभे राहिले आहेत याचा धर्मता निवाडा केला पाहिजे यावर राजमुद्रा व समस्त सभा मनास आणून केदारस्थानी दिव्य देऊन निवाडा करणे ऐसे केले हे हरदो वादियासी उभे वर्गास मानले यावरी सणवारी आग्रवादी विसाजी बिन नारोबा मसवडा दिव्यास उभा राहिला नफर मजकुराचे हातीची निशाणे लेहून नखे काढून साबण व निबे लाऊन हात धुतला खलेती घालुनु लाखोटा केला यावरी पसमवादी नागोजी बिन कोडभट पटवर्धन याची नखे काढोन साबण निबे लाऊन हात धुतला खलेती घालून लाखोटा केला कोटात राखिले दुसरे दिसी स्रावण वदी येकादसी आदीतवार केदारस्थानी समस्त सभा बैसोन आग्रवादी विसाजी बिन नारोवा मसवडा व पसमवादी नागोजी बिन कोडभट पटवर्धन यास परिटाच्या पडदणिया देउनु केदारबावीस आघोली करुनु नंदकेस्वरापुढें केदारा सन्मुख उभे राहिले तूप व तेल ताउनु थाली साडसे धरोनु ताम्हणामधे वोतिली सावीत (?) मडले चालोनु विसाजी नारायेण आग्रवादी येणे रवा काढिला नागोजी पटवर्धन पसमवादी येणे साउली केली विसाजी नारायेणे रवा काढोन सभेसी दाखऊनु खाले टाकिला काखेस हात घालुनु देवास परदक्षणा करुनु आला मग त्याचे हाती खलेती घालुनु लाखोटा केला व नागोजी पटवर्धन पसमवादी याचे हाती खलेती घालुनु लाखोटा केला दोघे वेवादी दुर्गात राखिले तिसरे दिवसी मगलवारी समस्त सभा बैसोनु हरदो वेवादीयासी बोलाउनु लाखोटा तोडोनु विसाजी नारायेण मसवडा आग्रवादी याचा हात पाहिला खरा निघाला रवा उतरला नागोजी पटवर्धन मजकुरे हरविले खोटा जाला यासी मौजे भोगवली पा मजकूर तेथील कुलकर्णास समंधु नाही विसाजी बिन नारोवा मसवडा येणे मौजे भोगवले मजकूर तेथील कुलकर्ण मिरासी जितिली हा महजर * सही

लें. १०


शके १५३८ चैत्र व. १०

तालीक (तत्कालीन)

माहजर व तेरीख २३ माहे रबिलौवल बी हुजूर हजरती खाने आलीशान हैबतखान साहेब खुली दयाम दौलतहु व हजीर मजालसीयानि बी॥

---

* या पत्राच्या पाठीवर " महजर म्हसवडियाचा त्याची नकल " असा मजकूर आहे.



वजारत माह खाने
आजम आलीखान
मसुरल आनाम
नरसिग राऊ
मायेगा पडित पेशवे
मसुरल आनाम झुझार--
राऊ शचनीस
पतगराऊ
सभूजी जाधवराऊ सरदार
सुराजी निचालकर सरदार
सुरेराऊ कर्जखोपक सरदार
भाऊजी देसाई कर्याती सासवड
नरसिगराऊ आकुशराऊ सरदार

खाने आजम आनुजान
खान हवालदार
खोज हाफीज
खा जमालखान
जसवतराऊ हवालदार
खा सादूलखान सरदार
भानजी आहिरेकर सरदार
जाऊजी मुगुटराऊ धुमाले सरदार
माहालोजी घोरपडा सरदार
न माजी सितोला सरदार
सबाजी सिकरा सरदार

*सहस्त्रायु चिरजीव राजमान्य राजश्री विसाजी गंगाधर यासि राघो बल्लाल आसिर्वाद विनती उपेरी मौजे सुपे खुर्द पा॥ सुपे तेथील मोकदमी तिसरी तकसीम रा॥ संकराजी निलकठराऊ याची आहे यैस्यास साल मजकुरी हाली मिरासी पटी होन ३० तीस निा॥ मोकदम घातली आहे याची तकसीम मशारूनईले वरी होनु १० दाहा आली आहे त्यापैकी होनु पाच यास तौकूब केले आहे ती बाकी पाच होनु उरले तेच तुम्ही यापासूनु घेणे पाचा होनाची विले आम्ही तौकूब केले आहे ती याचे करूनु तुम्ही तहसील नाही करणे हा आसिर्वाद याचा हिराणा न करणे छ १४ सफर सुा सलस सबैन अलफ मोर्तब सुद मोरत बसुद

---

* अकिार नाहीं.

ले. ५७ तालिक १५९७ ज्येष्ठ शु. २

(चां. सर.)

मसुरुल अनाम राजश्री मोरो निबाजी मजमूदार पा। पुणां गोसावी यांसि रा।घो बलाल नमस्कार विनंती सुहुर सन खमस सबैन अलफ राजश्री निलोजी निलकंठराऊ पुरंधरकर याचा इनाम मौजे चाबिली ता। करेपाठार ते गावी कास टका येक आहे १८ त्यावरी हाली तुम्ही पंचवीस होनु २५८ मिरासपटी घातली आहे ते दूर करणें तहसील न लावणे दुसरियाने चोभाट येऊ न देणे छ. ३० सफर

ले. ५८ शके १५९७ आश्विन शु॥ ९ (नकल)

श्री

राजश्री पंताजीपंत वोकील स्वामी गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेा। मल्हारजी येशवतराव देशमूख निगडे व महादाजी राम देशकुलकर्णी प्रगणे सिरवल सुरसन सीत सबैन आलफ दंडवत आनुक्रमे नमस्कार विनंती उपरी राजश्री छत्रपती स्वामीनी आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा की राजश्री पंतास राहावयासि स्थल का। मजकुरी पाहिजे तर उतम स्तळ पाहून वाडा मिरास करून का। मजकुरी देणे ते आज्ञेवरून तुम्हास स्तळ कोन्ह्याची मिरास नव्हे व कोन्हाचा कथला नाही असे स्तळ पाहून दिवाण वाडीयाचे पछमेस व बिरीचे पूर्वेस व हैबतराव सेगर नाईकवाडी याचे दक्षणेस लाची हात ऐसी ८० हात व दिवाणवाडी याचे पश्चमेपासून रुंदी हात ६० साठी मोईन करून दिल्ही आसे तर तुम्ही लेकराचे लेकरी व उषपरंपरागत वाडा बाधोन सुखरूप राहणे आपण तुम्हास मिरास करून दिल्हो आसे पुढे आपले वौशीचा आगर आणिक कोन्ही कथला करील त्यास श्रीची आण व आपले पूर्वजाची आण व गाई ब्राह्मणांची आण आसे तुम्ही सुखरूप वाडा बाधोन लेकराचे लेकरी राहणे छ ७ माहे रजब हे विनंती

ले. ५९ १५९८ चैत्र शु. २

ता। (चां. सर.) श्री

मसुहुरल अनाम राजश्री रामोजी जगथाप व खंडोजी जगथाप प्रती राजश्री सिवाजी राजे सुहूरसन सीत सबैन अलफ मौजे सुपे खुर्द पा। सुपे येथील पाटीलकी नीलकंठराऊ व काटकर व धणगर याची तीघे तीन तकसीमा करून कमावीस

करितात तुम्ही निसूर राहत नाही की त्यासी कथला करिता पेसजी ताकीद केली तऱ्ही धणगराची माणसे माा राघो बलाल या कडून धरऊन नेऊन बदी घातले आहेत ते सोडीत नाहीत तरी यैसे जरी तुम्ही कराल तरी साहेब तुम्हावरी कैसे राजी राहातील हे तुम्ही विचारीत नाही यैसेच खराडे पालीसी करकर करीत होते सेवट खोटे ते खोटे जाले तैसे तुम्ही आहा जरी वाद सांगणे तरी हुजूर सांगणे काटकराचा आणि तुमचा निवाडा होईल निलकंठराऊ व धणगर हे खरीददार त्यासी तो काही निसबती नाहीच याउपरी धणगराची माणसे सोडून देविली असेती ते सोडून देवणे पेस्तर त्याचे वाटे नव जाणे पाटिलकी तिघास चालते तैसी चाली चालो देणे तुमचा निवाडा होईल तो हुजुरूनच होईल तोवरी गावी काही दखल न होणे कथला न करणे छ १ मोहरम

ले. ६०

१५९८ चैत्र शु. २

(चां. सर.)

मसुरुल हजरती राजश्री राघो बलाल सुभेदार समत जुनर प्रती

राजश्री सिवाजी राजे दंडवत सुा सीत सबैईन आलफ मौजे सुपे खुर्द पा सुपे येथील पाटीलकी नीलकठराऊ व काटकर व धणगर याची ती ठाई तीन तकसीमा करून येक येक तकसीम येक येक खाना सालाबाद चालते यास रामोजी व खंडोजी जगथाप नसती करकर करिताती तुम्हास सागोन धणगराची माणसे धरून नेविली तुम्ही नेउनु बंदी घातली आहेती पहिले लिहिले तऱ्ही सोडली नाहीत यैसेयास जगथाप झोडपणे गला पडिताती जैसे पाळीची पाटीलकी कालभोराची आसता उगेच खराडियाने झोडपण केले सेवट रवा काढून खोटे जाहाले तसेच हे जगथाप करिताती उगीच येकाची मिरासी येकास तो देवत नाही आणि तुम्ही जगथापाच्या बोले धणगराची माणसे बंदी घातली हा कोन इनसाफ जगथापास वाद सागणे आसेल तरी हुजूर उभे राहातील काटकरासी वाद सागतील हुजूर विल्हे होईल नीलकठराऊ व धणगर खरीददार आहेती यासी तो काही निसबती नाही तुम्ही हा कथला मनावरी घेता हे साहेबास मानत नाही यैसे जाणोन या ... ... न पडणे धणगराची माणसे धरिली आहे ती ते सोडून देणे पाटीलकी नीलकंठराऊ व धगगर व काटकर यास चालते तैसी चालवणे जगथापाचा निवाडा हुजूर होईल जाणिजे छ १ मोहरम

ले. ६१

श्री.

माहामेरू अखडीत लक्षुनी आलकृत राजमान्य राजेश्री माहादाजीपत स्वामी गोसावी यासी

सेवक निलो सोनदेऊ नमस्कार विनती उपेरी गोसावी कागद लिहीला म्हणऊनु आम्ही इतके रोज येथे होतो आता आम्हास काही कार्ये आहे यानिमित्ये गावास जातो कलले पाहिजे तुम्ही कागद लिहीला होता त्याचा निस्छये आम्ही राजेश्री पासी सागितला आहे उभयेता यादोपत व विठलपंत येऊनु आम्हास समाधान करितील ते वख्ती आपण सिध आहो जे आज्ञा सागाल ते करून ये गोस्टीस अतर न पडे उभयेता ये गोस्टीस राजी न जाले तरी आम्हास सागोन पाठवणे जेथे उभयेता आसतील तेथे आम्ही त्यास पुसोन त्याचे भाऊ शफत घेऊनु कलले पाहिजे तुमचा तरी भरवसा आम्हास आहे परतु यादोपत व विठलपंत हे उभयेता मुदे वचने आम्हास बोलतील तरी आम्ही येऊनु यादोपत व विठलपत या खेरीज तिसऱ्याचा बोल आम्हास मान्य नाही उभयेतानी बोललीयावरी आज्ञा कराल ते करून कलले पाहिजे आम्ही गावास गेलो उभयेताच्या मनास आले तरी यादोपत व विठलपतास आम्हापासी पाठवणे त्यास पुसोन तुम्हापासी येऊनु बहूत लिहिणे तरी विवेकी आहा हे विनंती

राजश्री आणाजीपतीं आम्हासी नेम केला आहे जे यादोपताकडून आण भाश देववावी व विठलपत आम्हापासी आणून विठलपताची आण देवावी या खेरीज बि ता।

आमचा मुशहिरा बर नि॥ मजमूदार महिना निघता द्यावा महीनीयाचा महिना रोख द्यावा हकासी गरज नाही अगर तिघापासी मागावया गरज नाही येकाने धणी होऊनु द्यावा

पहिले मदती + + विठला बोलाया होता त्याप्रमाणे तोच अगर आणीक मदतीनीस द्यावा

येणे प्रमाणे राजश्रीने आम्हासी नेम केला आहे तरी स्वामीने यैसा अगीकार घेववेल तरी अगीकार करून विठलपत व यादोपत आम्हापाशी पाठवणे आम्ही त्याचे भाव शफत घेऊनु स्वामीपासी येऊनु यादोपत व विठलपत या दोघा खेरीज तिसऱ्या बोल आम्हास राहाता नये हचे दोघे आम्ही लिहीले प्रमाणे अगिकार करितील व तुम्हासही मानेल तरी उभयेतास पाठवणे त्याचे गोहीने येऊनु यास सदेह नाही दोघानी आम्हास शव शफत दिल्हा व

आम्ही लिहीले प्रमाणे तुह्मास मान्य जाले तरी आह्मी येऊनु कलले असावे हे विनंती

ले. ६२ १५९९ वैशास शु. ३

(चां. सर.)

रोखा तहसीलदार निा शंकराजी निलकंठराऊ मुकाम चाबिली यासी अनाजी दतो सुा सन सबा सबैन अलफ तरी तुवा मा इास घरी अजार नेदणे उठोन येणे रा छ १ रबिलावल

लेख

नावधिरयं

ले. ६३ श्री १५९९ श्रावण शु. ४

(चां. सर.)

राजश्री त्रिबक गोपाल देशाधिकारी व लेखक प्रात पुणे गोसावी यास

छ. अखंडित लक्षुमी आलकृत राजमान्य सेवक मोरो त्रिमल व नारो नीलकठ शक ४ पिंगल सवछर उपरी नीलकठराऊ यास इनाम मौजे चांबली ता कऱ्हेपठार तेथे आहे यैसीयास राजश्री छत्रपती स्वारीहून आल्यावरी विले करितील तोवरी तकू [ब] असो देणे छ २ जमादिलाखर सन समान लेखन उचित (मोर्तबांतील अक्षरेंः–विळसति लेखनावधि.....)+.

ले. ६४ १६०० आश्वीन शु. १२

(चां. सर.)

रोखा तहसीलदार मौजे चाबिली ता कऱ्हेपठार + + + पाल सुबेदार पा पुणे सुा सन तिसा सबैन अलफ तुजला मा शंकराजि निलकंठराऊ याकंडील इनामतीचे पैकी तहसील करावया पाठविले आहे यैसियास राजश्री छत्रपती स्वामींचे पत्र ये तोपावेतो राजश्री पंत सचीव स्वामीनी पैके तौकूच करविले आहेती तर तू रोखा पावताच इनामदार मजकुरास अजार न देता सिताच हुजूर येणे उजूर न करणे छ १० साबान.

---

१ सबंद पत्र एकटाकी असल्यानें खुद्द निळो सोनदेवाच्या हातचे असण्याचा विशेष सभव आहे.

+ पत्राच्या पाठीवरील शिक्यांतलीं अक्षरेंः–श्रीशिवराजेंद्र हर्षनिदान ॥ त्र्यंबकसुत मोरेश्वर मुख्य प्रधान ॥ इतर मजकूरः सुध बार

ले. ६५ श्रीशंकर

१६ ३ श्रावण शु. ४

(चां. सर.)

राजश्री नागोजी बलाल सुभेदार व कारकून सुभा प्रांत माहालहाये पाा इदापूर व सुपे सोसावी यास ०॥ध्र अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्ये सेवक निलकठ मोरेस्वर प्रधान नमस्कार सुहूरसन इसने समानैन आलफ सुपे खुर्द येथील पाटीलकी रायाजी काटकर व शकराजी निलकठराऊ व हाऊजी धणगर या तिघांची पाटीलकी मौजे मजकूरची आहे ऐसियासि आजिपावेतो जैसे चालत आले असेल त्याप्रमाणे तुम्ही तैसेच चालवणे नवी इस्कील होऊ नेदणे रवाना छ ३ रजबू +आज्ञाप्रमाण

(लेखन सीमा समुल्लसति) श्री॥ शंभु नर पति हर्षानिदान
मोरेश्वर सुत नीळकंठ
मुख्य प्रधान
सुरू सुद

ले. ६६ १६०४ आषाढ शु. ६

(घां. सर.)

अज दिवाण ठाणे ताा नीरथडी पाा पुणे तांा मोकदमानी मौजे किकवी ताा मंजकूर सुाा सलास संमानैन अलफ शंकराजी निलकठराऊ यानी सुभा पाा माा तेथे जाऊन वर्तमान सांगितले की मौजे किकवी ताा माा येथे आपला इनाम कास रुके ८४॥ साडे च्यारी आहे ते हाली पडीक आहे कीर्दीस उमेद धरिली आहे म्हणौउनु सुभां वर्तमान सांगितले त्यावरून शंकराजी निलकठराऊ यांचा इनाम जमीन सेत कास रुके ८४॥ साडेच्यारी रुके लावणी दुमाले केले असे सालाबादप्रमाणें जैसे चालिले असेल तैसे चालवणें म्हणौउनु सुभाहून खुर्द खत मौजे मंजकुरास सादर जाले आहे तरी जेणेप्रमाणे सुभाचे खुर्दखत आहे तेणेप्रमाणे वर्तणूक करणे इनामती पडीक आहे यैसियास याचे दुमांळे कीर्दी कारणे केला आहे तेणेप्रमाणे याचे दुमाले करणे पेस्तर राजश्री छत्रपती स्वामीचा हातरोखा आणितील तेणेप्रमाणे विल्हे होईल तालीक लेहून घेऊन असल फिराऊन देणे रा छ ४ रजबु मोर्तबु सुद

मोर्त
बसुद

+ येथून वळण निराळें
॥ अक्षर वेगळें

ले. ६७ श्री . १६०५ कार्तिक शु. ७

(पेठकर पुरंदरे)

राजश्री बाजी घोलप हवालदार व कारकून किले पुरंदर गोसावी वास अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य प्रति निलकंठ मोरेश्वर प्रधान आसीरवाद व नमस्कार ह्मा आर्या समानैन अलफ तुम्ही विनति केली कीं किले मजकुरी मिरासीदार जोतीसी सिवभट चीन दादंभट व नारायेण भट चीन रामभट पुरंदरे आहेती यैसीयासि यांची वृति पिढी दरपिढी किलाचे बुनादी महत कदम आहेती यैसीयासि किला सरदेचा ते स्छ्ढी तास पाहिजे याबद्दल या किलीयास तासाची सेवा सागावी ते सागितली नाही जे समई ताब्रांपासून किला घेतला* ते इ॥ पासून राजश्री निलो सोनदेऊ याणी वेदमूर्ती राजश्री विस्वनाथ भट ठकार व सखंभट ठकार यास दर एकास लारी १५ एकूण लारी द्दामोली ३० तीस करून तासाची सेवा सांगोन ठेविले त्या उपेरी सिवभट व नारायेणभट मिरासीदार तासाची सेवा आपणच करु म्हणौनु राजश्री निलोपंतापासी विनंती केली यास ही गोस्ट राजश्री निलोपंती अमान्य करून विस्वनाथ भट व सखंभट यास तासाची सेवा सागितली याउपेरी राजश्री स्वामी कैलासवासी किलीयासि आलें ते समयी सिवभट व नारायेणभट याणी राजश्री पासी प्रसंग केला त्यास ते समयी राजश्रीनी **वृत्त्यांसीयाची व्रती व तास द्यावी** ये तजविजीने कुल तासच सखंभट विस्वनाथ भट यांकडील मना केला नारायेणभटास व सिवभटासही सनद तासाची दिल्ही नाही कुल तासच अमानत केला याउपेरी मागती निर्वाह करून द्यावा तो राजश्री कैलासवासी करनाटकात गेले याउपेरी प्रसंग करावा तों ही ब्राह्मणे दुर्बले रायेगडास मागती जावे ती जावयास विलंब लागला तो स्वामी सन समानैनात जाल्हनापूर प्रांते गेले त्याउपेरी सवेच राजश्रीनी कैलासवास केला याउपेरी तो प्रसंग तैसाच राहिला त्यास पुरंदरासारिखा किला सरदेचा आणि नामोश्याचा तेथे तास असिलाच पाहिजे आणि **वृत्तीवंतांचे संस्छापन करने हे स्वामीसही अगत्यच आहे** तरीस्वामीनी ब्राह्मणावरी कृपालु होऊनु यास तासाची सेवा सागितली पाहिजे तासाची येकटीयास चाकसी होवेना तरी दोनजण तासकरी नारायेणभट व शिवभट यांस तासाची सेवा सांगितलीयाने किलाचा मामला चौकस राईल किला नामोश्याचा आहे तरी तासाची सेवा पुरंदरे उभयेता यास सांगितली पाहिजे म्हणऊन विनती केली तरी त्याचाही करिना मनासे आणितां नारायेणभट व सिव-

---

* नळा सोनदेव यानीं मोगलापासून पुरंदर किल्ला शके १५९१ फाल्गुन व. १२ रोजीं घेतला (जे. शा.)

१ येथून पुढील अस्सल सनदेचा भाग गाहाळ. यापुढील मजकुर सनदेच्या तत्कालीन नकले वरून घेउला आहे

भट पुरंधरे मिरासदार यासि तास द्यावा हे गोस्टी युक्त आहे **येकोचे मिरासीदारे दुसरीयास तास द्यावा हे गोस्टी युक्त नव्हे आपले दरबारी येकोची वृती येकास द्यावी हे गोस्टी चालत नाहीं** यास्तव नारायण भटास व शिवभटास तास द्यावा परंतु आपल्यास किला कभज जाला त्या दिवसापासून पुरंदरें उभयता भटानी तासाची चाकरी केली नाही याकरितां उगीच यांस तासाची सेवा सागोन सनद देता येत नाहीं या कारणे भट मजकुरास सेरणी मागितली त्यास मागती भट मजकुराचे बाबे मलार मुकुंद सुभेदार यांणी विनती केली कीं भिक्षुक ब्राम्हण त्याहीमधें दुर्बल ससंसार स्वामीने सेरणी मागितली तरी वृतीसंमध आहे सेरणी दिल्हीच पाहिजे परंतु ब्राह्मण दुर्बल आहेत बेमवसदार मफलीस आहेत तरी स्वामीने यांस जिवन माफीक सेरणी घेऊन तासाची सेवा सांगितली पाहिजे म्हणऊन विनती केली त्यास भट मजकुराचा आवकात मनास आणितां दुर्बल ब्राह्मण मफलीस म्हणून सेरणी खंडिणी देखील सरदेसमुखी होन पातशाही बी॥ कबूल कतबा भट मजकूर तेरीख छ ७ जिलकाद होनु पातशाही ५० पंनास केली आसे आणि उभयता पुरंदरे भट मजकुरास किले मजकुरीं तासाची सेवा सांगितली आसे किले मजकुरीं पेशजी सखंभट ठकार व विश्वनाथ भट ठकार यांची असामी किला तैनात जाबितां वोढत आहे ते बद लिहीणे हाली पुरंदरे उभयता भट मिरासदार कदीम म्हणऊन जमासुदगी करून किलीयास पाठविले ताा दर माहे लारी दाभोली

नारायणभट बीन रामभट	सिवभट बीन दादंभट
पुरंदरे लारी दाभोली	पुरंदरे लारी दाभोली
१५	१५

येकूण लारी दाभोली तीस रास करून पाठविले यास किलीयावरी घेऊन यापासून तासाची सेवा घेणे यास वेतन जे तेरिखेस तास घालाल ते तेरिखेपासून पो व सुरनिसी वजावाटा करून उरले वेतन दरचार रवेसीप्रमाणे देत जाणे यास सेरणी होन पा॥ ५० पनास बाधली त्याचा उसूल मफलीस म्हणौन रोकडे उसूल होन पा॥ १० दहा रास घेणे तें साळमजकुरीच घेणे उरले होन चालीस ते दरसाले होन ८ प्रमाणे इं॥ सन खमस ता॥ सन तिसा दरसाल होन आठ भटमजकुराचे हकी वजा करणे तासास तेल जे तेरखेस तास घडी घालितील ते तेरखेपासून जे मोईन किले सिंहगडी आहे तेणेप्रमाणे दरोज तेल देत जाणे विशेष काये लिहिणे रा॥ छ ५ जिलकाद[2] पावो[3] छ ७ जिलकाद

---

१ हा व या पुढील लेखांक नारायण शिवराम पुरंदरे (पेठकर) यांचे दप्तरातील आहेत.

२ जोडाक्षर ' लेखनसीमा ' या अक्षरांच्या शिरका आहे.

ले. ६८ श्री १६०५ कार्तिक शु. ११

(चां. सर.)

राजश्री नागोजी बलाल सुभेदार व कारकून सुभा प्रा माहालानिहाय प्रा इदापूर व सुपे यासि

छ अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्ये सेवक नीलकंठ मोरेस्वर प्रधान नमस्कार सुा सन अर्बा समानैन अलफ सुपे खुर्द येथील पाटिलकी रायाजी काटकर व शकराजी निलकठराऊ व हाउजी धणगर या तिघाची पाटिलकी मौजे मजकुरीची आहे यैसियास आजी पावेतो जैसे चालत आले असेल त्याप्रमाणे तुम्ही तैसच चालवणे शंकराजी निलकठराऊ व हाउजी धणगर यासी जगथाप नसता कथला करितात तरी यासी कथला करावयास समध नाही नवी इस्कील होऊ न देणे रा छ १० जिलकाद आज्ञाप्रमाण लेखनाधिमुद्रा

श्री शंभुभज नोत्कंठ मोरेश्वर सुत निलकंठ

सुरुसुद

ले. ६९ श्री १६०९ वैशाख शु. ६

(पेठकर पुरंदरे)

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १३ प्रभवनाम सवछरे वैशाख शुध शस्टी गुरुवासरे राजश्री बाजी घोलप मुद्राधारी व लेखक किले पुरधरगड यासि राजाज्ञा ऐसीजे वेदमूर्ती सिवभट पुरधरे याही हुजूर येऊन वर्तमान विदित केले की पूर्वी राजश्री कैलासवासी स्वामीनी आपले पिते व रामभट चुलते यासि श्री पुरंधरेश्वर व केदारेश्वर यासि प्रत्यही अभिषेक करावयाची आज्ञा केली होती यावरून उभयेता श्री देवास अभिषेक आज्ञेप्रमाणे करीत होते त्यांस प्रत्यवरसी दरयेकास होन पाा ५ प्रा होन दाहा पोतांतून प्रत्यवरसी पावत आले त्याउपरी राजश्रीने पुरंधर गड मोगलांस देवविला* त्या दिवसापासून आभिषेकाची मोईन पावावी ते पावली नाही पुढे यत्न करून मोईन करून घ्यावी ते घेतली नाही आपले पिते दादंभट यासि देवआज्ञा जाली याकरितां वरसासनाची मोईन होऊन आली नाही तरी श्री देव बहुत जागृत स्थाने आहेत त्याचा अभिषेक होये आणि आपली मोईन चालविली पाहिजे देवास नदादीप व नैवेद्य पूर्वीपासूनु स्वामीनी मोईन करून दिली आहे त्याप्रमाणे प्रत्यवरसी पावत आहे आणि आपली मोईन पावत नाही तरी कृपालु होऊनु पेसजीप्रमाणे मोईन द्यावया आज्ञा केली पाहिजे म्हणऊनु विनति केली त्यावरून मनास आणिता पूर्वी किल्ला कैलासवासी स्वामीनी घेतला त्या

नीळकंठ मोरेश्वर पेशव्याचा शिक्का

---

* शके १५८७ मध्यें.

दिवसापासून भट गोसावी यासि प्रत्यवरसी आभिषेक संमंधे मोईन पोतापैकी पावत आले त्याउपरी किला गनिमाने घेतलीया दिवसापासूनु हा कालवरी भट गोसावी यानी हुजूर येऊनु वरसासनाची मोईन करून घ्यावी ते घेतली नाही या करिता मोईन राहात गेली परतु देवास नेवेद्य नदादीप चालत आहे आणि आभिषेक मात्र चालत नाही देवस्थाने बहूत जागृत ह्मणऊनु श्रीचा आभिषेक वेदमूर्ती सिवभट बीन दादंभट व नारायणभट बीन रामभट यासि आभिषेकाची आज्ञा केली आहे ते येणे प्रमाणे देवास अभिषेक करितील

श्रीकेदारेश्वरास नारायेणभट करितील १	श्री पुरंधरेश्वरास सिवभट करितील १

येणे प्रमाणे देवांस आभिषेक करावयाची आज्ञा केली आसे ते प्रत्यही आभिषेक करितील आणि स्वामीस आसिरवाद देतील यासि मोईन वरसास होन पाा ५

सिवभट दादंभट होन पाा २॥	नारायेणभट रामभट २॥

एकून होन पाा ५ रास प्रत्यवरसी द्यावयाची मोईन केली आहे तरी तुम्ही किल्ले-जकुरीहून प्रत्यवरसी सदरहुप्रा मोइन सनद पोा पासून देत जाणे आणि नैवेद्य व नदादीप श्रीची प्रत्यवरसी मोईन चालत आहे त्याचा वरच्यावरी समाच्यार घेऊन चालवणे अतर पडो न देणे नेवेद्य करणे तो भट गोसावी याचे विद्यमाने करून श्रीस समर्पीत जाणे गुरवाकडून न करणे सदरहू लिहिल्याप्रमाणे याजकडून देवास अभिषेक करवीत जाणे आंतर पडो न देणे छ ४ जमादिलाखर सुहूर सन सबा समानीन अलफ पेस्तर राजश्री स्वामीची सनद सादर होईल आज्ञाप्रमाण[1]

बार सुद बार सुरुसुद बार

श्री

ले. ७० १६१८ वैशाख शु. ८

(चां. सर.)

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री शंकराजी राम सेनासप्तसहस्री गोसांवी यास

शेवक शंकराजी नारायेण सचिव नमस्कार सुा सीत तिसैन अलफ राजस्री निलकंठराऊ यांचा इनाम कास टका येक मौजे चांबिली ता कऱ्हेपठार प्रांत पुणे

= १ ' आज्ञाप्रमाण ' हीं अक्षरें निराळया वळणाचीं.

येथे आहे त्यास इनाम पटीचा तगादा केला आहे म्हणून हुजूर विदित केले त्याव-रून तुम्हास हे पत्र सादर केले आसे त्यास इनामपटी सालाबाद वसूल घेत नाहींत येविसी तुम्हास पेसजीही पत्र सादर केले असे तरी यास इनाम पटीचा उपसर्ग न करणे छ ७ शौवाल

पत्रावधिरयं भाति

सुरु सूद

ले. ७१ (चां. सर.)

श्रीमार्तंड भैरव
श्रीषडो
मल्हार

१६१८ भाद्रपद व. १३.

अज दिवाण राजश्री खडो मल्हार हवालदार व कारकून नि॥ श्री मुकाम मौंजे जेजुरी तहा मोकद्दमानि मौजे मजकूर ता॥ कऱ्हेपठार पा॥ पुणे सुा॥ सबा तिसैन अलफ बा॥ सनद राजश्री

सर सुभेदार मांत मजकूर छ २२ सावान सन सीत तिसैन आलफ इन सुली बा॥ सनद राजश्री पंत सचीव छ ८ सौवाल साल गु॥ रा॥ निलो निलकंठराऊ व रा॥ शंकराजी निलकंठराऊ व विसाजी निलकंठराऊ व रा॥ त्रिबक निलकंठराऊ सरनाई [क] वाडी किले पुरधर चापैकी बिसाजी निलकंठराऊ याणी किले विचित्रगडीचे मुकामी हुजूर विनती केली की आपले पिते राजश्री निलकठराऊ याही मौजे जेजुरी ता॥ कऱ्हेपठार पा॥ मा॥ येथे विहीर करून आंबराई लाविली अहे तेथे कास जमीन रुका ८१ येक मु खो या प्रमाणे चालत आले आहे यैसी-यास आपल्या वडिलीही या राजात सेवा बहूत केली अहे व पुढेही करीत आहो तरी स्वामिनी कृपालू होऊन सदरहू जमीन कास रुका ८१ येक दो अंबराई इनाम करून दिल्हा पाहिजे म्हणोन विनती केली त्यावरून मनास अणितां माइले या राज्यातील कदीम आणि सेवा येकनिष्टपणे केली आहे व पुढेही करीत अहेत याकरिता माइलेचे चालवणे जरूर आहे म्हणोन याजवर कृपाळु होऊन त्यास इनाम जमीन कास रुका ८१ येक दो आंबराई माइलेच्या दुमाला करून यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे तालिक लेहून घेऊन असलपत्र भोगवटीया निमित्य परतोन देणे म्हणोन आज्ञा आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून माइलेचे सदरहू इनाम जमीन कास रुका येक दो आंबराई आहे ते याच्या दुमाला करणे नवी जिकीर न करणे पत्राची तालिक घेऊन असल पत्र भोगवटिया निमित्य मास देणे छ २६ सफर मोर्तब सुद

मोरत

बसुद

ले. ७२ श्री १६२० अश्वीन शु. ५

(चा. सर.)

आज्ञापत्र राजश्री पंत सचीव ताा मोकदम मौजे चांचिली ताा कन्हेपठार सुा तिसा तिसैन अलफ मौजे मजकूर रा शंकराजी राम सेनासप्तसहस्री यांकडे इनाम सेरीज करून मुकासा दिल्हा आहे त्यास माानिलेने इनामापैकी रुपये तीस वसूल घेतला तो फिरोन द्यावयास हुजरून आज्ञा केली आहे राजश्री विठल केसव त्या प्राते पाठविले आहेनी ते फिराऊन देवितील पुढे इनामतीस खलेल कोण्ही करणार नाही छ ४ रविलाखर

सुरु सुद

ले. ७३ श्री १६२० आश्विन व. १

(चां. सर.)

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य राजश्री शंकराजी निलकंठराऊ स्वामी गो सेवक शकराजी राम सरसुभेदार लस्कर नमस्कारे सुा तिसा तिसैन अलफ तुमचा इनाम मौजे चाचिली येथे आहे यैसीयास इनामाचद्दल म्होन रुपये ३० तीस तुम्हापासून घेतले होते ऐसीयास तुम्ही हुजरून पत्र आणिले त्यावरून पैका घेतला होता तो फिराऊन दिल्हा मागेही कोण्हे काही घेतले नव्हते यानिमित्य पैके फिराऊन दिल्हे आहेत याउपरी तुम्हास काही उपसर्ग कोणाचा लागनार नाही जाणिजे बहुत काये लिहिणे रा छ १५ रविलाखर मुर्तब सुद

ले. ७४ श्री १६२२ आषाढ शु. ७

(चां. सर.)

अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्य राजश्री बालाजी विश्वनाथ सरसुभेदार प्रांत पुणे गोसावी यास

सेवक रामचंद्र निलकंठ अमात्य नमस्कार सुहुर सन इहिदे मया व अलफ संकराजी निलकंठराऊ याचा इनाम मौजे चाबली ताा कन्हेपठार येथे १ येक कास टका आहे व अंबराई चाबली जेजुरी व पूर ताा कन्हेपठार व किकवी ताा निरथडी येथे आहे त्यास सालाबादप्रमाणे ताा सालगुदस्ता ज्याहप्रमाणे चालिले असेल त्याप्रमाणे सालमजकुर बिलाकुसूर सुरलीत चालवणे जाणिजे छ ५ मोहरम * निर्देशसमक्ष लेखनावधि

---

* अक्षर वेगळे.

ले. ७५ श्री १६२२ अश्वीन व. ६
(चां. सर.)

अखंडित लक्ष्मी आळकृत राजमान्ये राजश्री बालाजी विस्वनाथ नामजाद सरसुभा पुणे गोसावी यासि

सेवक शंकराजी नारायेण सचीव नमस्कार सुा इहिदे मया व अलफ राजश्री निलकंठराऊ पुरधरकर याचा इनाम मौजे चांबली तर्फ कऱ्हेपठार कास टका येक आहे त्यास तुम्ही तिजाईचा तगादा लाऊन राजश्री गणेश शकर निलकंठराऊ याजपासून साडे सहा रुा घेतले पुढे तिशा रुपयाचा रोखा केला आहे म्हणोन वर्तमानें विदित जाहले यौसियास या लोकाचे चालवावे लागते सालाबाद इनामपैकी वसुल घेतला नसता हाली तिशा रुपयाचा रोखा तुम्ही काये समजोन केला आहे- याउपर तुम्ही जो रोखा केला आसेल तो मना करणे साडे सहा रुा घेतले आहे- ती ते फिराउन देणे फिरोन ये गोष्टीचा बोभाट हुजूर येऊ न देणे सालाबादप्रमाणे*
चालवणे छ २० जमादिलौवल पाा हुजूर

पत्रा
वधिरयं
भाति

ले. ७६ फारसी शके १६२३
(चां. सर.) शिक्का श्रावण व. ३

ताा गणेशपंडीत इनामदार मौजे चाबिली ताा कऱ्हेपठार पाा पुणे सुाा हजार १११९ मालुम दानद की तुजला इनाम मौजे मजकूर आहे याची सनदपत्र तुज- जवली काय आहे ते घेऊन येणे उजूर न करणे न येस म्हणिजे मुलाहिजा होणार नाही रा छ १६ रबिलावल+

ले. ७७ फारसी
शिक्का

(फारसी तीन ओळी मजकूर)

ताा गणेश पंडीत मुा सुपे मालूम दानद की चांबिलीची आपली जुमीन उट- वणे व भेटीस येणे तुमचा निशा दिलासा करून तुम्हास रजा देऊनु तर अलबत भेटीस येणे कौल करार देऊनु वाटे लाऊन तर आपली खातिरजमा राखोन भेटीस येणे कोणे गोस्टीची फिकीर न धरणे अलबत भेटीस येणे रा छ ११ जिल्हेज पाटील आले आहेत तुम्ही येणे पाठिलास व तुह्मास सिरपाव देऊन रुकसत करून

---

* येथून अक्षरांचें वळण निराळें.
+ हें अस्सल पत्र असून त्याची रुंदी ३ बोटें व लांबी ७ बोटें आहे.

ले. ७८. श्री

दिगंबर स्वामी

राजमान्य राजश्री शंकराजीपंत नीलकठराऊ यास श्री.....यांची आज्ञा यैसीजे बहुत दिवस आपणाकडी.....प्रा रा मनाजीपंत व गणेशपंत येथे आले.....बिसा.....वरून कलो आले आम्ही श्रावण वद्य प्रतीपदा परियंत.....सो या नतर हे उभयेता येथे काही ग्रहकृत्याचा.....यास श्रीपासी आले होते; येथे हि पांचाजणी उभयताना येथान्याये सांगितले की कर्जाचे लिगाड अवघे जे असेल (ते) मनाजीपंती वारावे व वडलाचे संरक्षण गणेशपं(तीं) करावे यैसे केले आहे व इनाम सेते पोते जे असेल ते आपण च प्र त ली त आहे आपणच चालवावे यैसे केले आहे आपण..... ...या प्रमाणेच निर्वाह करून उभयेतास सांगितले पाहिजे ये विशी विशेष काय लिहिणे

ले. ७९ श्री

राम राम

छ श्री सकल गुण सौजन्य महामेरु राजमान्य राजश्री मल्हार जी गाईक देसमुख पा सिरवल गोसावी यासि स्नेहाकीत कान्हो पद्मनाभी हवालदार कर्याती बारामती विनती विसेश तुम्ही कागद पाठविला मनास आला बाळ पाटील मोकद्म मौजे पळसी यांचे विशई लिहिले यावरून संग ठाकुरा देखता बाळ पाटिलास बोलाउनु सागितले तो बोलिला जे देशमूख आपले धणी वडील आहेती त्यासी रद...करून कोणाच्याने बोलवेल आकस.....आहे त्यास येका... देऊन जाला (पुढील भाग कसरीच्या भक्षस्थानीं पडल्यानें पाच सहा ओळींना मुकावें लागत आहे) ठाकुराच हाती पाठवणे हे विनती

शिक्का हे विनती

ले. ८० श्री

॥छ श्रीमत प्रोढ प्रताप दिनकर खांडेस्वरी सदा येसवत राजमान्य राजश्री मल्हारजी देसमूख पा सिरवल गोसावी यासि प्रती राघोजी कान्हो हवालदार व कारकून ता नीरथडी पा पुणे विनती उपरी येथील क्षेम जाणौऊनु स्वक्षेम लिहीले पाहिजे विसेश मौज पाडे तेथील कृष्णाजी जनार्दन यासि तुम्ही येऊनु

दस्त करून नेले तरी दुसरीया प्रगणीयात येऊनु तेथील लोक धरून नेण हे कोणचे हिशबे आमल गोसावी यासि कोणे दिधली आसल तो नादानच आसल याउपरी दूर आईसोन कृस्णाजी मजकुरास पाठऊनु देणे आणि पुढे बहुत अकलेने बोल न लगे ते करणे कृस्णोजी मजकुरास पाठऊनु देणे जरूर न पाठवाल तरी त्याची विल्हे आम्ही देखोन परंतु तुम्ही कस्टी होल कलले असावे बहुत लेहावे तरी तुम्ही स्याहाणे आहे हे विनती

मराठी अस्पष्ट शिक्का

अस्पष्ट शिक्का

लें. ८१

(मौजे खंडाळे पा। सिरवळ येथील पाटीलकीबद्दल खंडाळकर व गाढवे यांजमध्ये वाद सुरू असतां त्याचा निवाडा राजारामाच्या कारकीर्दीनंतर झाला. त्या अस्सल निवाडपत्राची कांहीं पानें मिळालीं. त्यांतील गाढव्यांची तकरीर तेवढी पुढें दिली आहे.)

' तकरिर कर्दे बाो सिवाजी बिनसभोजी गाढवे व येकोजी बीन भोजजी गाढवे मोकदम मौजे खडाले प्रा। मा।र लेहून दिल्ही तकरिर यैसीजे आपला मूल पुरुश बलजी पाटील हा मौजे खडालीयात कुणबावा थल पलस जमीन चा।वर १८ कुणबावा करून होता ते समई खडागलीयावर दिवाणचा कसाला पडोन टका पडिला म्हणऊन खडागलीयानी पाटीलकी विकीली ते समई आपला मूल पुरुश बालजी पाटील याणे पाटीलकी खरीद केली पाटीलकी करू लागला त्याच लेक कायेकोजी आढाळराऊ याण पाटीलकी केली त्याचा लेक नाईकजी पाटील याणे पाटीलकी केली याचे लेक २

वडील बाबाजी पा। याचा लेक भिलोजी पाटील याचा लेक संभाजी पाटील याचा लेक सिवजी पाटील पाटीलकी करितो

धाकटा लेक येकाजो याचा लेक भोजजी याचा लेक येकोजी

हाली सातवी पिढी सिवाजी पासून पाटीलकी खात आलो आपल्या वडिलाचे कारकीर्दीस खडागले उभे राहून वृतीचे भाडण कधी भाडिले नाही आगरे मागे हकीम दिवाणे जाली कारकीर्दी हैबतखान त्यावरी मलीक अंबर त्यावर जायेणापंत यावर माहाराज राजश्री साहेब याचे कारकून दादाजी कोडदेऊ त्यावर राजश्री छत्रपती साहेब त्यावर राजेश्री राजाराम साहेब इतक्या कारकीर्दी हकीम जाले यामधे खडागलीयानी आपल्या वडिलासी कधी वेव्हार भाविला नाही

आपण बाल पाटिला पासून आपली सातवी पिढी पावेतो पाटीलकी खात आलो आहो हे तकीर सही

ले. ८२ श्री शके १६५० आश्वि० शु॥१०

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ कीलक संवत्सरे आश्विन शुध विजयादशमी

० श्री ० राजाशाहू न रपति हर्षनिधान बाजीराव बल्ला ळ प्रधान

भोमवासरे क्षत्रिये कुळावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यानी यादो गंगाधर देशपांडे पा॥ सिरवल यांसी दिल्हे वतनपत्र ऐसे जे तुमचा व खंडो केदार याचा वतनाचा गर्गशा लागला याबदल सन सलासामधे किले सातारियाचे मुकामीं स्वामी सन्नीध खंडो केदार फिर्याद जाला

० श्री ०

श्रीआईआदि पुरूष

श्री राजाशाहुछत्रपति स्वामि

कृपानिधि तस्य श्रीनिवास परश

राम प्रतिनिधि

राजश्री दादाजी कोडदेव याचा निमे वतनाचा महजर होता तो दाखविला ते प्रसंगीं गोविद यादव व चिंतो महादेव व महादाजी गोविद व देवाजी यादव व निलो विठल होते, त्यासी स्वामीनि आज्ञा केली कीं खंडो केदार याजपासीं रा॥ दादाजी कोडदेव यांचा निमे वतनाचा महजर असतां यास काये निमत्य तक्षीम देत नाहीं त्यावरून यानी विनंती केली की या महजरा अलीकडे खंडो केदार याच्या व आपल्या वडीलाचा निवाडा जाला आहे आपले वडील रघुनाथ महादेव गांवीं आहेत त्यास आपले कागदपत्र आहेत ते घेऊन हुजूर येतो म्हणोन निरोप घेऊन गांवास गेले, मागा खंडो केदार यास निमे देशकुलकर्णाच्या वतनाचीं पत्रे दादाजी कोडदेव यांच्या महजरावरून करून दिल्हीं व जिल्हेचीं पत्रे याणे करून घेतलीं त्यावरील सण अरबामध्ये गोविंद यादव व रघुनाथ महादेव व चिंतो महादेव हुजूर येऊन स्वामी सन्निध अर्ज केला कीं, स्वामीनी खंडो केदारास निमे वतन दिले यावद्दल आपण वतन सोडून घरीं बैसलों आहों तरी स्वामीनीं कृपाळू होऊन इनसाफ केला पाहिजे त्यावरून स्वामींनी आज्ञा केली की दादाजीपंताच्या महजरा वरून निमे वतन खंडो केदारास दिल्हें तुमचा करिना काय आहे तो दखल करणें त्यावरी रघुनाथ माहादेव याने आपला करीना विदित केला कीं आपला व खंडो केदार याचा मूल पुरूष लुखो विठल त्यास स्त्रीया २ दोन वडील स्त्रीचा वडील पुत्र कान्होपंत तो आपला वडील धाकटे स्त्रीचा पत्र पुरुषोत्तमपंत खंडो केदाराचा वडील त्यास लुखोपंत असत. वडील स्त्री मेली धाकटी होती घरांत कलह

होऊं लागला याबद्दल लुखोपंती उभयेता लेक घेऊन देशमुखाच्या घरास गेले तेथे सेटयासही बोलावून आणिले आणि सांगितलें कीं आपण उभयेता लेकांस वृत्ती वाटून देतो वाटणी बि॥

वडील कान्होपंत यास परगणाचे हा वडील प्रबुत्ध आहे यापासून देश कुलकर्णाची सेवा घेणें त्यावरी कान्होपंत बोलिला कीं परगणा वोस दिवे लावणी नाहीं ते मज देतां आणि अवघी जीवका कसबयिांत तें व घरमवेसी माया मात्रा धाकट्यास देता आपण काये खावें त्यास लुखोपंत बोलिला की तूं वडील तुज अवघी वृत्ती दिल्ही आपले म्हातारपण तें मूल धाकटें याबद्दल घरमवेसी माया मात्रा व कसबाचें कुलकर्ण त्यास दिल्हें उरलें वतन तूं खाणें

धाकटा परुषोत्तमपंत यास कसबा देशकुळकर्ण व गांवकुलकर्णे दिल्हीं मुजेरी मोहतर्फा दोन्ही कुलकर्णे घर वाडा माया मात्रा मवेसी दिल्ही आपण याकडे राहिलों देशमुखास व सेटयास सांगितले की कसबांच्या कुलकर्णाची सेवा यापासून घेणे

कलम १

कलम १

येणेंप्रमाणें लुखोपंती देशमुखाचे व सेटयाचे साक्षीनसीं वाटे करून दिल्हे त्याप्रमाणें आपले वडील कान्होपंत त्यास उमर वर्षे ७० सतर देशकुलकर्ण खादलें त्यास पुत्र दोन वडील रत्नाजीपंत धाकटा विठलपंत यानी वतन खादलें रत्नाजीपंतास संतान नाहीं विठलपंताचा पुत्र रामाजी विठल उमर वर्षें ७० सत्तर खादलें त्याचप्रमाणें पुरुषोत्तमपंत उमरवर्ष ८५ पच्यासी त्याचा लेक तिमाजी पुरुषोत्तम उमर वर्षें ७५ पाऊणसे कुलकर्ण खात आले त्यावरी रा॥ दादाजी कोडदेव यांजपासी तिमाजी पुरुषोत्तम व मुरार पुरुशोत्तम दोघे भाऊ उभे राहिले तेथे सारुत करून गोतमुखें निवाडा न करितां निमे वतनाचा महजर करून घेतला तो प्रसंग जालीयावरी आपले आजे रामाजी विठल पुणीयास जाऊन मातुश्री जिजाआऊ साहेबापासी उभे राहून आपली हकीकत जाहीर केली वडिलाचे वर्तमान अवघे सांगितलें हाली दादाजीपंती गोतमुखे निवाडा न करितां निमे वतन तिमाजीस दिल्हें हे वर्तमान विदीत केलें त्यावरून मातुश्री साहेबीं दादाजीपंतास सांगितलें की यांचा निवाडा गोतमुखें करणें त्यावरून दादाजीपंतीं विठल गिरमाजी हवालदार प्रा॥ मजकूर यांस पत्र दिल्हे कीं प्रा॥ मजकूरचे गोत जमा करून वरहक निवाडा करणें

तिमाजीपासीं महजर* आहे त्यावरी न जाणें ते पत्र घेऊन माहालास आले निवाडा व्हावा तों माहालात धामधूम जाली सर्वेंच दादाजीपंत मृत्य पावले विज्यापुरीहून दिवाण मिया रहीम महमद कोंढाणा फत्ते करावयास आले त्यांकडे आपला परगणा व बारा मावलें जाली त्यापासीं आपले आजे रामाजीपंत उभे राहिले आपला गोतमुखे निवाडा न करितां निमे वतन तिमाजीस दादाजीपंती दिल्हें त्याचा निवाडा करणें त्यावरून त्यांनी परगणाचे देशमूख व समस्त गोत व तिमाजीपंत कोढाणयास आणिले तेथे खेडे बारांचे गोत आणिले गोतमुखें निवाडा केला तिमाजी पुरुषोत्तम व मुरार पुरुषोतम यास गोतानें दिल्हें चिा

पहिले पासून मुजेरी मोहतर्फाची कुलकर्णे कसबे मजकूर

२

नवें दिल्हें

३ देशकुलकर्णाचा हक देखील गांब कुलकर्णे

१ मौजे नायेगांव

१ मोजे सांगवी

१ मोजे केंसुर्डी

३

१ पेठ बुन्हाणपूर कसबे मजकूर कुलकर्ण

४

येणे प्रमाणे देऊन समजावीस केली वरकड गांवकुलकर्णे व देशकुलकर्ण रामाजी विठळ यास दिल्हें त्याप्रमाणें रामाजी विठल वरशें वीस खात आले त्याउपरी आपले बाप माहादाजी राम यास उमर वर्षे सतर यानीं खादलें हाली आपण उमर वर्षे बाहांतर खात आहों तैसेच तिमाजीपंत व मुरारपंती खादलें त्यावरी तिमाजीचा लेक आपाजी यास उमर वर्शे साठी त्यानेही याचप्रमाणे खादलें आपाजीचा लेक केदारपंत यास उमर वर्षे पनास त्याने याचप्रमाणे खात आहे याप्रमाणे आपली हकीकत आहे स्वामीनी कृपालू होऊन बरहक निवाडा केला पाहिजे म्हणून त्यावरून स्वामीनी आज्ञा केली की तुमचे कागद पत्र असतील ते दाखवणें त्यावरून आपले कागद सदरहू तकरीरे प्रमाणें दाखविले व खंडो केदाराजवळ दादाजीपंताचा कागद होता त्याचा उलटा कागद आपणाजवली दाखविलाल त्याचा मजकूर.

---

* रामाजी विठल व तिमाजी पुरुषोत्तम यांच्या तंटयाचा निकाल दादाजी कोंडदेवानें शके १५६५ मध्यें केला. तो (खं. २०, ले ५३) पूर्वी छापला गेला आहे. त्यांत यांची वाटणी होऊन कुलकर्णाची मानमाननुक, हक्क लाजिमा व वृत्तीचें उत्पन्न कोणी किती घ्यावें याचा तपशील आहे. प्रारंभीचा कांहीं भाग फाटून गेल्यामुळें हा महजर दादाजी कोंडदेवाच्या देखरेखीखाली शिवापूर मुक्कामीं करण्यांत आला होता हें समजण्यास मार्ग नव्हता; पण आतां प्रस्तुत पत्रामुळें त्याचा उलगडा होण्यास अडचण पडत नाहीं.

मा॥ हजरत अखडीत लक्षुमी राजमान्य राजश्री विठल गिरमाजी हवालदार व कारकून प्रा॥ सिरवल यासी दादाजी कोडदेव सुबेदार नामजाद किले कोढाणा व माहालानिहाये विनंती सुहूर सन सीत अर्बैन अलफ रामाजी विठल देशकुलकर्णी पा॥ मजकूर हा कसबे पुंणें येथील मुकामी येऊन विनंती केली कीं आपलां व तिमाजी पुरुशोत्तम याचा वतनाचा निवाडा गोतमुखे जाहला नाही स्वामीनी आपणास गोत देऊन इनसाफ केला पाहिजे ह्मणऊन सौवती मातुश्री जिजाआऊ साहेबांचे रुबरू बोलिला त्यावरून हें पत्र तुह्मास लिहीले आहे तरी परगणे मजकूरचे देशमूख व गांवगनाचे पाटील व सेटे माहाजन कुल वतनदारांचे माथा घालून हर दो जणाचा निवाडा हरएक कोण्ही कोण्हाची रुरयात न करितां गोत न्यायें करणें सिवापूरचे मुकामीं वाटणीचा महजर करून दिल्हा आहे त्यावरी नव जाणें छ २५ सफर [शके १५६८ चैत्र व. १२]

येणेंप्रमाणें दादाजी कोडदेव यांचा कागद बजिनस दाखविला या कागदा आलीकडे दोन महजर गोतमुखें निवाडे जाले तेही दाखविले त्यावरून स्वामीनी आज्ञा केली की हरदोजण गोतांत जाणें त्यास खडो केदार परगोत कबूल न करी आपण येकटा हे बहुत परगणाचे गोतास आपण राजी असों त्यावरी परगणाचे गोत देशमूख व गावगनाचे पाटील सेटे माहाजन कुलकर्णी व बलुते आवघे गोत हुजूर आणून पुसिलें कीं संडो केदार याच्या व गोविद यादव व उधो जगजिवन व रघुनाथ माहादेव व चिंतो माहादेव व माहादाजी गोविंद व वेकाजी कृष्ण व भगवंत भिकाजी व निलो विठल याच्या वतनाच्या कजिया बदल तुम्हास हुजूर आणिले आहे तरी तुम्ही श्रीकृष्णा स्मरोन यांच्या मूल पुरुषापासून कैसें चालत आले आहे तें सांगणें तफावत पडलीयां नागवले जाल त्यावरून गोताने श्रीकृष्णा स्मरोन हुजूर सांगितले कीं या हरदों वादीयांचा मूल पुरुष येक खंडो केदार याचे वडील कसबांची मुजेरी व मोहतर्फा दोनी कुलकर्णे खात आले यादो गंगाधर याचे वडील परगणांचें देशकुलकर्ण व बाहेरील गावकुलकर्णे खात आले दादाजी कोडदेऊ यांचे कारकीर्दीस खंडो केदार याचे वडील यापासीं उभे राहून निमे वतन महजर करून घेतला त्यावरी रहीम महमद नामजाद किले कोढाणीयांस आले त्यापासीं यादो गंगाधर यांचे वडील उभे राहिले तेव्हा त्याणी परगणांचे देशमुख व पाटील व सेटे माहाजन व समस्त गोत व ता॥ सेडेबारांचे गोत जमा करून गोत मुखें निवाडा करून उभयेता वादी यांची समजावीस केली खंडो केदार याच्या वडिलास गोताने दिल्हे बि॥

पहिले मूलपरुषाने दिल्हे मुजेरी व मोहतर्फा कसबे मजकूर कुलकर्णे दोन
२

नवे दादाजी कोडदेऊ याच्या महजरा उपरी गोताने समजाविसी करून दिल्हे

३ गावकुलकर्णे व देशकुलकर्णाचा हक देह
१ मौजे नायेगांव
१ मौजे मांगवी
१ मौजे केसुर्डी
३
१ पेठ बुन्हाणपूर कसबे मजकूर कुलकर्ण
४

येणेप्रमाणे कुलकर्णे साहा व तीन गावीचे देशकुलकर्णाचा हक देऊन समजावीस केली व यादो गंगाधर याच्या वडिलास परगणाचे देशकुलकर्ण व बाहेरील गावकुलकर्णे दिल्ही त्याप्रमाणे आजी तागाईत खात आले ऐसी गोताने साक्ष दिल्ही त्यावरून स्वामींनी आज्ञा केली की खंडो केदार याने साहा कुलकर्णे व तिनी गावचे देशकुलकर्णाचा हक खावा व यादो गंगाधर यानी परगणाचे देशकुलकर्ण व बाहेरील गावकुलकर्णे पहिले पासून खात आले आहेत त्याप्रमाणे खावे ऐसा निवाडा करून दिल्हा आणि तुम्हास हे वतनपत्र दिल्हे असे तरी तुम्ही सदरहू निवाडीयाप्रमाणे परगणाचे देशकुलकर्ण व बाहेरील गावकुलकर्णे आपले वंशपरंपरेने वतन अनुभऊन सुखरूप राहाणे खंडो केदार यापासी पूर्वील कागदपत्र असतील ते व हुजूरची पत्रे व जिल्हेची पत्रे अगदी रद असेत *जाणिजे लेखनालंकार

मर्यादेय राजते

रुजू सुरू	संमत	सांा	सांा
नीवीस	सुमंत	मंत्री	सरकार
बार सुद	सुरु सुद	बार बार	बार बार

ले. ८३ + (वरला भाग फाटला आहे)

आपली पाटिलकी कदीमलयाम मौजे चाबली ता॥ कऱ्हेपठार प्रा॥ पुणे येथील वडील वडील करीत होते ते समई कामथे याची नादणूक गावात जाली कारकीर्द पील पा॥ आपले वडील सेवेमुले देशांतरास गेले मागे कामथे गाव चालऊन होते तो मालजी भालेराव आमचे वडील रायाराव दौलतमगळ उर्फ भुलेश्वर येथे

---

* यापुढील मजकुर खाशांच्या हातचा.

ठाणे बांधून मुलकाचा सुभा करीत होते ये कारकीर्दीस वतन अनभवानिमित्य आले तो कामथे यानी कजिया केला की वतन आमचे आहे म्हणून हकीम रायाराव याजपासी जाऊन हकीकत सागितली त्यानी कामथे यासी आणून न्याये करावा म्हणून मजकूर केला त्यासी राज्याची चलबिचल वोढींचा प्रसग रायाराव हकीम याचा बेत की द्रव्य हरतऱ्हे उत्पन्न बले करावे त्याउपरी राव निजामशाही इदलशाही चाल जाली त्या प्रसंगात मालजी भालेराव वोढगस्त कामथे पाढरीवर नादून खबरदार होते पैका सरकारात कबूल करून बलेच खरियाचे खोटे करावे हा निर्वाह करून इनसाफ न करिता गोही साक्ष न पाहाता दिव्य करील त्याचे वतन हेच सला दिल्ही तेव्हा मालजी भालेराव यानी दिव्य कबूल करून दिव्य केले दिव्यास न लागता बलेच दिव्यास लागले हा शब्द आपले मजालसीस करून कामथे याचे दुमाले वतन करून मालजी भालेराव यासी मजालसीतून काढून लाविले हे गोष्ट दोन प्रहरातच केली तदनतर मालजी भालेराव यानी गोत व लोक प्रातचे होते त्यास आपला हात दाखविला दिवी लागला नाही हे त्यानी पाहिल मुलूक कामथेयापासून पैका घेऊन रावजीनी केला यैसे बोलिले तो महिना पधरा दिवसी इदलशाहीची जबरदस्ती जाली माहाराज शाहाजी राजे साहेबास प्रांत मजकूर देऊन त्याची फौज या प्रांतास आली रायाराव पराभऊन गेले माहाराजाचा आमल मुलकात चालिला तेव्हा माहाराजापासी भालेराव फिर्याद उभे राहून जाली हकीकत जाहीर केली ते खातरेस आणून प्रात मारी मामले करीत होते त्यासी हुकूम सादर केला की बरहक निवाडा करणे त्यावरून त्यानी जमीदार व गोत गावगना व ज्यासी दिव्यसमई हात दाखविला होता ते साक्षी आणून कामथे यासी पुर्सीस केली ते समई तकरीर प्रा हकीकत साबूद जाली ते पसद करून सर्वानी विचार केला की सेडकराचे वडील रोजगारामुले विदेसी गेलियावर कामथे यानी वतन चालविले आहे वृत्तीवर कसाला मसाला पडिला तो सोसिला आहे आणि नादणुकेनें बलावले आहेत वतन सेडकराचे खरे परंतु याचीहि स्थापना केली पाहिजे तरी कलह वारितो व पाढरीची वस्ती राहाती सरकारची उगवणी होती हे तजवीज पाहून मालजी भालेराव यास बुधी नीतीने सांगून वतन दो जागा निमेंनीम करून महजर करून दिल्हा तो भालेरायानी घेऊन जाले वर्तणुके प्रा वतन अनभव काही दिवस कामथे व आपण करून नादिले पुढे राजाक्रांत मातबर जाला दिल्लीकडील मोगल आले मुलूक बेचिराख जाला देशा तरास लोक गेले त्यावराबरी भालेरावहि गेले कागदपत्र इतबरु जागा ठेविले रोजगार संमधे दूर देशास गेले त्याचे सुखे तिकडे गुजराण करून ते व त्यांचे पुत्र राहिले त्यासी पुत्र तो क्रियाबाल लोकाचे देणे घेणे शरीरसमंध त्याच प्राते ममता तिकडेच लागली तो प्रांत मजकूर वस्ती जाली इकडे यावे हा हेत त्यासी बहुत

दिवस वतनावर आलो नाही विना कागदपत्र आलियासी कार्याचे नाही म्हणौन कागदांचा तलास करिता काही दिवस लागले त्याचे ठिकाण लाऊन तो घेऊन प्रांत मजकुरी आलो श्रीमंतराव कैलासवासी यांसी भेटून हकीकत निवेदन केली कामथे वतन बलाऊन गावांत सर्व आराबिदाईनें वर्तत आहेत त्याची आपली हकीकत मनास आणून इनसाफ केला पाहिजे हा सिधांत जाला इनसाफ करावा तो त्यास कैलासवास जाला पेस्तर पेसवाईचा बंदोबस्तीकरिता मंडाले बगाला प्रांते श्रीमंत स्वारीस गेले इनसाफ तैसाच राहिला वतना [ची] हकीकत यैसी आहे वतन आपले खरे आहे महजर मनास आणून स्थापना करणार माहाराज समर्थ याप्रमाणे हकीकत खरी करून देऊ साहेबी पुसिले की वंशावली कैसी आहे ते जाहीर करणे तरी वडील पील पाटील यासी पुत्र च्यार राघोजी पा। १ यासी पुत्र रामजी यासी गोमाजी यासी येसाजी। यासी हाली नारोजी हाजीर आसे लुखजी.....जी यासी सिवजी यास आपण जनकाजी हाजीर आसे मालजी भालेराव.....यास चापाजी पुत्र दीपाजी पुत्र येसाजी हाली आसे व कान्हो यासी बापूजी पुत्र कान्होजी यास राणोजी यासी बापूजी हाली आसे

येणे प्रा। वंशावली आपली पील पाटील पाटीलकी करीत होते वृती अनभव करून नादत होते ते समई कामथे नांदावयासी अले जोरदार मेहनती म्हणून खेते देऊन ठेविले पील पाटील रोजगारामुले कर्जाला सुधा निघून गेले मागे राजक्रांत जाला कामथे जवल वस्तीत होते मुलकीचा कौला दर आमिली तजवीज होत जाई तेव्हा वस्ती करीत यामुले वलवटा घालून मालजी भालेराव यासी कजियासि उभे राहिले पेस्तर सदरहू प्रा। वर्तणूक जाली आपण कियांचाल सदरहू हकीकत वडील वडील सांगत आले तेणे प्रा। लेहून दिल्ही आसे व महजर आहे तो मनास आणून वतन दुमाले करणार माहाराज समर्थ आहेत हे हाकी [क] त लेहून दिल्ही सही+

+ या तंटयाचा अखेर निकाल नानासाहेब पेशव्यांचे कारकीर्दीत शके १६७६ त झाला. त्यावेळीं ही हकीकत तयार केली आहे. हा व या पूर्वीचा लेखांक मौ. चांबळी जि. पुणें येथील पाटील रा. आपाजी बापूजी शेंडकर यांजकडून मिळाला.

ठाणे बांधून मुलकाचा सुभा करीत होते ये कारकीर्दीस वतन अनभवानिमित्य आले तो कामथे यानी कजिया केला की वतन आमचे आहे म्हणून हकीम रायाराव याजपासी जाऊन हकीकत सागितली त्यानी कामथे यासी आणून न्याये करावा म्हणून मजकूर केला त्यासी राज्याची चलबिचल वोढींचा प्रसग रायाराव हकीम याचा बेत की द्रव्य हरतऱ्हे उत्पन्न बले करावे त्याउपरी राव निजामशाही इदलशाही चाल जाली त्या प्रसंगात मालजी भालेराव वोढगस्त कामथे पाढरीवर नादून खचरदार होते पैका सरकारात कबूल करून बलेच खरियाचे खोटे करावे हा निर्वाह करून इनसाफ न करिता गोही साक्ष न पाहाता दिव्य करील त्याचे वतन हेच सला दिल्ही तेव्हा मालजी भालेराव यानी दिव्य कबूल करून दिव्य केले दिव्यास न लागता बलेच दिव्यास लागले हा शब्द आपले मजालसीस करून कामथे याचे दुमाले वतन करून मालजी भालेराव यासी मजालसीतून काढून लाविले हे गोष्ट दोन प्रहरातच केली तदनतर मालजी भालेराव यानी गोत व लोक प्रातचे होते त्यास आपला हात दाखविला दिवी लागला नाही हे त्यानी पाहिल मुलूक कामथेयापासून पैका घेऊन रावजीनी केला यैसे बोलिले तो महिना पधरा दिवसी इदलशाहीची जबरदस्ती जाली माहाराज शाहाजी राजे साहेबास प्रांत मजकूर देऊन त्याची फौज या प्रांतास आली रायाराव पराभऊन गेले माहाराजाचा आमल मुलकात चालिला तेव्हा माहाराजापासी भालेराव फिर्याद उभे राहून जाली हकीकत जाहीर केली ते खातरेस आणून प्रात मारी मामले करीत होते त्यासी हुकूम सादर केला की बरहक निवाडा करणे त्यावरून त्यानी जमीदार व गोत गावगना व ज्यासी दिव्यसमई हात दाखविला होता ते साक्षी आणून कामथे यासी पुर्सीस केली ते समई तकरीर प्राा हकीकत साबूद जाली ते पसद करून सर्वानी विचार केला की सेडकराचे वडील रोजगारामुले विदेसी गेलियावर कामथे यानी वतन चालविले आहे वृत्तीवर कसाला मसाला पडिला तो सोसिला आहे आणि नादणुकेनें बलावले आहेत वतन सेडकराचे खरे परंतु याचीहि स्थापना केली पाहिजे तरी कलह वारितो व पाढरीची वस्ती राहाती सरकारची उगवणी होती हे तजवीज पाहून मालजी भालेराव यास बुधी नीतीने सांगून वतन दो जागा निमेंनीम करून महजर करून दिल्हा तो भालेरायानी घेऊन जाले वर्तणुके प्राा वतन अनभव काही दिवस कामथे व आपण करून नादिले पुढे राजाक्रांत मातबर जाला दिल्लीकडील मोगल आले मुलूक बेचिराख जाला देशा तरास लोक गेले त्यावराबरी भालेरावहि गेले कागदपत्र इतबरु जागा ठेविले रोजगार संमधे दूर देशास गेले त्याचे सुखे तिकडे गुजराण करून ते व त्यांचे पुत्र राहिले त्यासी पुत्र तो क्रियाबाल लोकाचे देणे घेणे शरीरसमंध त्याच प्राते ममता तिकडेच लागली तो प्रांत मजकूर वस्ती जाली इकडे यावे हा हेत त्यासी बहुत

दिवस वतनावर आलो नाही विना कागदपत्र आलियासी कार्याचे नाही म्हणौन कागदांचा तलास करिता काही दिवस लागले त्याचे ठिकाण लाऊन तो घेऊन प्रांत मजकुरी आलो श्रीमंतराव कैलासवासी यांसी भेटून हकीकत निवेदन केली कामथे वतन बलाऊन गावांत सर्व आराबिदाईनें वर्तत आहेत त्याची आपली हकीकत मनास आणून इनसाफ केला पाहिजे हा सिधांत जाला इनसाफ करावा तो त्यास कैलासवास जाला पेस्तर पेसवाईचा बंदोबस्तीकरिता मंडाले बगाला प्रांते श्रीमंत स्वारीस गेले इनसाफ तैसाच राहिला वतना [ची] हकीकत यैसी आहे वतन आपले खरे आहे महजर मनास आणून स्थापना करणार माहाराज समर्थ याप्रमाणे हकीकत खरी करून देऊ साहेबी पुसिले की वंशावली कैसी आहे ते जाहीर करणे तरी वडील पील पाटील यासी पुत्र च्यार राघोजी पा। १ यासी पुत्र रामजी यासी गोमाजी यासी येसाजी। यासी हाली नारोजी हाजीर आसे लुखजी.....जी यासी सिवजी यास आपण जनकाजी हाजीर आसे मालजी भालेराव.....यास चापाजी पुत्र दीपाजी पुत्र येसाजी हाली आसे व कान्हो यासी बापूजी पुत्र कान्होजी यास राणोजी यासी बापूजी हाली आसे

येणे प्रा। वंशावली आपली पील पाटील पाटीलकी करीत होते वृती अनभव करून नादत होते ते समई कामथे नांदावयासी अले जोरदार मेहनती म्हणून खेते देऊन ठेविले पील पाटील रोजगारामुले कर्जाला सुधा निघून गेले मागे राजक्रांत जाला कामथे जवल वस्तीत होते मुलकीचा कौला दर आमिली तजवीज होत जाई तेव्हा वस्ती करीत यामुले वलवटा घालून मालजी भालेराव यासी कजियासि उभे राहिले पेस्तर सदरहू प्रा। वर्तणूक जाली आपण कियेबाल सदरहू हकीकत वडील वज्रील सांगत आले तेणे प्रा। लेहून दिल्ही आसे व महजर आहे तो मनास आणून वतन दुमाले करणार माहाराज समर्थ आहेत हे हाकी [क] त लेहून दिल्ही सही+

+ या तंट्याचा अखेर निकाल नानासाहेब पेशव्यांचे कारकीर्दीत शके १६७६ त झाला. त्यावेळीं ही हकीकत तयार केली आहे. हा व या पूर्वीचा लेखांक मौ. चांबळी जि. पुणें येथील पाटील रा. आपाजी बापूजी शेंडकर यांजकडून मिळाला.

ले. ८४ श्री

(चांबळी—सरनाईक) (नकल--मोडी)

तकरीर कर्दे बो दादो गंगाधर व बापू सखाजी व शंकराजी गणेश नीलकंट-राव सरनाईक किले पुरंधर सुा इहिदे सबैन मया व आलफ सके १६९२ विकृती-नाम संवच्छरे लेहून दिल्ही तकरीद ऐसाजे द्वारकाबाई कोम नारो नरसिंगराव ही स्वामीपासी फिर्यांद जाली इच्या कजियाकरिता आम्हासं बोलाऊन करिणा पुसिला ऐशास आमचे वडील बेदरचे देशपांडे पुरातन बेदरच्या पातशहाचे चाकर पुरंधर हस्तगत होऊन पुरंधरा खालील मुलूक सर होईना सबब आमचे पूर्वज निलोपंत व त्याचे पुत्र माहादाजीपंत या उभयता बाा दौलत फौज देऊन पुरंध-रास रवाना केले तेथे येऊन पुरधर म (ह) बसाकडे होता तो जुंझोन कष्ट मेहनत करून घेतला हे पातशहानी ऐकोन माहादाजीपंतास बेदरास बोलाऊन नेऊन बहुमान इनाम व दोन्ही किल्याची (पुरंदर व वजीरगड) सरनाईकी व राई व किताब देऊन फिरोन पुरंधरास निलोपंतासी रवाना केले किल्यास आलियावर निलोपंताचा काळ जाला किल्याचा बंदोबस्त माहादाजीपंती करून मुलकाचा पैका वसूल करून किल्याचा खर्चवेच करून पैका पातशाहास पाठवावा ऐसे रीतीनें माहादाजीपंत किलाचा कारभार वतने आनभवीत होते त्या कालीं सिवाजी राज्यानी पुरंधरा भोवतील मुलूक काबीज करून किल्यास पैसा येईना ऐसे करून किला घ्यावा ऐसा प्रयत्न केला साध्य होईना सिवाजी राज्यानी फलटणकर निंबालकर याचे हातून राजकारण किला घ्यावा येविसी फार केली परंतु उपाये चालेना पुढे किल्यावर खच वेचाची वोढ फार पडली तेव्हा पातशाही कुमक व खर्चवेचास काही येईना तेव्हां माहादाजीपंतापासी दोन घोडे पागेचे होते व गड-करी होते ते बराबर घेऊन महिना पंधरा दिवस खाली उतरोन दो चौ दिवसांचे स्वारीस पाठऊन येखादा गाव काफला करून मागती किल्यास जावे ऐसे करीत होते त्याचे पुत्र वडील निलोपंत हे भावार्थी सांगितले बुधीचे आसेत धाकटे शंका-जीपंत दो वर्षाचे होते तोच माहादाजीपंताची स्त्री निवर्तली हे लहान पाटीत घालून माहादाजीपंती जवल बालगोन थोर केले आपले हाता खाली शाहाणे केले माहादाजीपंत आसताच किल्याचा कारभार देखरेख करीत होते तो माहादाजीपंताचा काळ जाला शंकराजीपंत सर्व किल्याची येखत्यारीच करीत होते उभयेता बंधू येकत्रच होते त्यास निलोपंताची स्त्री दाष्टीक होती घ (र) चे उपाध्या व लोक गडकरी यास फिताऊन मिर्थीतार्थ केला कीं शंका नीपंत धाकटे आसता सर्व कारभार करितात हे उतम नाहीं ते वेलेस उपाध्ये लाले यानी आनुमोदन दिल्हे शंकाजीपंतास धरावे अगर मारावेसे केले परंतु संकाजीपंत हास्तगत होईनात कर्ते पुरुष पागा लोक होते

त्याजला स्वारीस पाठवावयासी लागले त्याज पौ चिलेमताचे खानेफत्रिले त्यानी सिबदीचा गवगवा करून वरते राहिले व बाकीचे लोक व पागा खाले स्वारीस पाठविली शंकराजीपंत किल्यावर दाहा पाचा लोकानिसी होते निलोपंताचे मिळताऊ लोक किल्यावर होते त्यानी निलोपंतानी ऐसा मजकूर केला हे शंक्राजीपंतास ठाऊक नाही प्राथःकाळी शंक्राजीपंत सदरेस तोड धूत बसलेत तो निलोपंतानी चाळीस पनास माणूस सुधा सदरेस हत्यारबंद चालून येऊन शंक्राजीपंतापासी दोनच्यार माणसे होती त्यासी मारामार केली तेव्हा शंक्राजीपंताचे जूज जाले निलोपंताकडील दोनच्यार माणसे ठार काही जखमी ऐसी जाली शंक्राजीपंतापासी जमीयेत नव्हती खासा जखमी जाहाले दाहा पंधरा जमखा आगावर होऊन घायाळ जाले माणसे होती ती काही मेली काही पळाली ऐसे आसतां निलोपंत वडील बंधु दया न येतां शंक्राजीपंत घायाळ पडले होते त्याचे डोके कापावयास तयार जाहाले तेथे कोण्ही मायेचे होते त्यानी निशेध करून सोडविले तेव्हा शंक्राजीपंताची स्त्री होती त्यानी उचलून घरात नेले निलापंतानी सदरेस बसून साखर वाटून दोन गडकरी याजबरोबर पत्रे देऊन सिवाजी माहाराज पुण्यात होते त्यास पत्र पाठविले की तुम्ही किल्यास येणे तुम्हास किला देतो सिवाजी राज्यास आवकाश होताच पत्र पावताच किल्यास गेले पाहाटेस निलोपंत आपल्या घरात निजलेच आहेत तो दरवाजे उघडताच दरवाज्यात जाऊन बंदोबस्त सदरेस लोकाचा बंदोबस्त करून निलोपंताचे घराभोवती चवकी ठेविली निलोपंत उठोन शोध करितात तो सिवाजी माहाराजानी आसे केले हे कलोन निलोपंत रागे भरोन सिवाजीराज्यावर हाला करावी ऐसा विच्यार करून वाड्याबाहेर यावे तो चवकी वाड्याभोवती बाहेर येऊ देईनात ऐसे निरोपाये जाले हे समजोन स्वस्त राहिले सिवाजी महाराजानी वाड्यातील वस्तवाणी बटकी चाकर सर्व मोजदाद करून सरकारांत ठेविले संक्राजीपंत जखमी पालखीत घालून व त्याची स्त्री व निलोपंत स्त्री सुधा राज्यानी आपले हाते खाली उतरली तो पुरात शंक्राजीपंती पागा चाकरीस पाठविली ती येऊन राहिली होती ती राज्यानी आगदी आपले सरकारांत लाविली तेथून संक्राजीपंत निलोपंत यास बरोबर पुणीयास आणिले लाल माहालात अटकेस कबिले सुधा ठेविले तबीब आणऊन शंक्राजीपताचे जखमाची बरदास्त करविली सक्राजीपंतास व निलोपतास राज्यानी रुबरु सागितले तुम्ही चाकर होऊन आपले बरे करून घेऊन चाकरी करावी शंक्राजीपंती जाबसाल [केला] की आम्ही पुरातन पातशाही चाकर त्यासी हरामखोरी करून तुमचे चाकर म्हणवीत नाहीं निलोपती जाबसाल केला कीं, आम्ही चाकर म्हणवितो आज्ञा करणे ती करावी तेव्हा पालखी दौलत निलोपंतास देऊन बायको सुधां चंदावर येथील मुलूक शाहाजी राजे यानी सोडविला होता त्या प्रांती रवाना केले निलोपती

शंक्राजीपंतासी जुजोन निमक हरामी करून वस्तवाणी घोडी दौलत वतन सरनाईकी सारी बुडऊन शंक्राजीपंतास जखमी अटकेत टेऊन आपले आपले दौलतीवर बन्यावर द्रृष्टि देऊन चंदावराकडे गेले शंक्राजीपंत जखमी बायको सुधा राज्यानी आटकेस ठेऊन जखमा वर्षा दो वर्षांत बऱ्या केल्या पुढे शंक्राजीपंत मर्द माणूस मातबर कर्ते पुरंधर बहूत दिवस कुमक नसतां रक्षिला हे चितात आणून घोडे बसावयास देऊन बराबर बाळगू लागले मुहुर्त करून राजे कामगारीस जात होते पाठीमागे शंक्राजीपंत घोड्यावर बसून होते याचे मागे नगारीयाचा उंट येत होता त्यास घोडा बुजोन भोयाच्या आंगावर गेला त्यानी घोड्यास काठी मारली शंक्राजीपती नगारची यास सांगितले तो मागे चालेना तेव्हा राग येऊन नगारची यास मारिले हे राज्यानी पाहून आपशकून जाणून माघारे आले शंक्राजीपंतास बराबर बाळगितो हे आपणासच आदावतीने मारतील हे जाणून मागती शंक्राजीपंतास आटकेस बेडी घालून ठेविले वर्ष सहा महिने लोटले पुढे शंक्राजी पंताची बहीण ती देव चिंचवडचे याची सून त्या नात्यामुळे देवानी सिवाजी माहाराजास सांगितले शंक्राजीपंतास आटकेस ठेऊ नये किल्यास व माहाराजास दंगा धोपा करणार नाही यास आम्ही जामीन आसो ऐसे बोलून राज्यानी याचे भिडेवर मोकळे केले परतु सरनाईकी व वतने दुमाला करीनात तेव्हा मागती देवानी रदबदल करून चाबळी व सुपाची पाटीलकी देविली बाकी वतने दिल्ही नाहीत सरनाइकी आदीकरून सिवाजी माहाराजानी सरकारात ठेविली शक्राजीपंत दोन्ही वतने चाबलीस आनभऊन होते शंक्राजीपंतास वडील पुत्र मनाजीपंत त्याचे याचे बनेना सबब वाईस सिरवली रोजगार करून होते गणे (श) पंत धाकटे पाच सात वर्षाचे होते मनाजीपंताची स्त्री याजपासी होती (ती) शंक्राजीपंताची धाकटीमुले ग (णे) शपंताहून येक कन्या व येक पुत्र ऐसी होती शाहादीखान याची धामधूम जाली घर लुटून नेले मुले लेकरे संभाळून पलून जावयास आवसर बनला नाही मोगलाने गणेशपंत व मनाजी पंताची स्त्री लाहाणच होते ती व दुसरी दोघी धाकटी मुले ऐसी च्यार मुले नेली त्यात लेक व धाकटी मूल या दोघीची गत काये जाली ही कलली नाही गणेशपंत मनाजीपंताची स्त्री एका सिपायास सापडली ते रात्रीची राहटीचे खाचापासी बाधोन ठेविली त्यानी रात्री येकमेकाचे हात सोडून पलून गेली ती खाबगावास उजाडावयास गेली तेथील पाटलास भेटली त्यानी पुरसीस करितां आमक्याची कलली तेव्हा मा[हा]र चाबलीस पाठविला शंक्राजीपंत बायकोसुधा आगोधर घरास आले होते शंक्राजीपंतास माहाराने वर्तमान सांगितल्यानंतर खामगावास जाऊन मुले आणिली मागे सिवाजी माहाराजास किला निलोपंती दिल्हा ते वेळेस घरदार आगदी सिवाजी माहाराजानी कैद केले यात वतनाचे कागदपत्र आगदी गेले होते काही थोडेसे उरले होते ते शाहादी-

खानाचे पळणीत गेले इनामाचे वगैरे कागदपत्र काही नाहीत चावलीचा इनाम व सुपाची पाटीलकी चालतच होती तेव्हा चाबलीस संक्राजीपंताचा काल जाला गणेशपंत वतन आनभऊन होते त्याकाळी पातशाहा औरंगजब या प्रांतास येऊन किले गड घेतले सिहीगडास येऊन सिहीगड घेतला ते वेळेस धारोजी कामथा चाबलीकर याने चुकली पातशाही कारभाऱ्यापासी केली की गणेशपंतापासी काही कागद पत्र नसतां इनाम खातात त्यावर इनाम आमानत जाहाले उपाये नाही भक्षावयास नाही ऐसें असतां गणेशपंत पातशाही लस्करांत खेळण्यास गेले वाटेनें नदी नाल्याचे थडीनें हाल फार जाहाले पातशाही मनसबदार बापूजी माहादेव याची भेट घेऊन वर्तमान सांगितले त्यानी पूर्वील मातबरी ऐकिली होती त्याजवरून रुपा करून साहा महिने ठेऊन घेऊन पातशाही सनद दिवाणी मोहरेची करून दीविली दरबार खर्च पडला त्याच्या वराताघरी चाथकोवर केल्या त्या कालांत दोन सेर धारण घरी येकली बाइको द्यावा यास नाही ऐसे आसतां जी वरात आली ती माघारी न टाकितां हाणमार सोसून एक गाये साता जागा विकली हे सर्वास ठावके आहे ऐसे सोसून कर्जवाम घेऊन वरातेचा पैका भरिला काही राहिला तो गणेशपंत सनदा घेऊन आले त्यानी दिल्हा त्यावर पातशाहानी शाहूराजे धरून नेले होते ते सुटोन खानदेशात आले तेव्हा चिमणोजी दामोदर याजबराबर दादोबा नीलकंठराव व गणेशपंत होते या उभयेतास चिमणाजीपंती स्वारीस पाठविले होते तेथे कुसंबीचे मुकामी शाहूमाहाराजाची भेट जाहाली राज्यापासी येक तट मात्र होते दादोबानी आपली ++ (पाल) खी बसावयास दिल्ही आपले वतनाची हाकीकत सांगितली तेव्हां माहाराजानी आश्वासन दिल्हे की स्वस्थलास गेल्यावर तुमचे वतन तुम्हास देऊ पुढे चिमणाजपिंताची राज्याची भेट जाहाली राजे पुण्यास आले तेथे कोणाचे जुज जाले ते स्मरणात नाही तेथे गोळी लागून दादोबा नीलकंठराव मृत्य पावले त्याजला सासवडास नेऊन आम्र दिल्हा बाईकोने सयागमन केले गणेशपंती कर्मांतर केले राजे सातारीयाकडे गेले तेव्हा बरोबर गणेशपंत गेले चाकरी चुकरी कष्ट मेहनत शरीरे करून फार केली राजे श्वराजी बसल्यावर विनती वतनाविसी केली तेव्हा माहादाजी येमाजी बोकील यास राजे काका म्हणत होते त्यास दाखला पुंसिला त्यानी प्राचीन गाष्टी मातगारीची सांगितली त्यावर सनद द्यावयाची परवानगी जाली किला तालोका सचिवाचा आमचे वग वसिले कोण्ही नाही दरबारखर्च व शेरीरकष्ट आर्जव करून सनद घेतली किल्यास येऊन काही दिवस वतन आनभविले तो शाहूमहाराज पुरंधरास येऊन दोन लग्ने आपली नारायेणाचे देवली आमचे आबराईत केली ते वेळेस कोली फिर्यादी सरनाइकी आमची म्हणून जाले राज्यानी माहादाजी

